CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ८१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



मानवाच्या सर्वांगीण विकासासाठीच भारत प्रयत्नशील राहिला. हीच भारतीय संस्कृती आहे आणि ती 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु'च्या आकांक्षेचे सार आहे. ही आकांक्षा मनात ठेवून देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढणारे सेनानी नेहमी सांगत राहिले की आमचे युद्ध हे केवळ स्वातंत्र्य मिळविण्यासाठी नव्हे तर विश्वात शांती स्थापण्यासाठी, सहयोगपूर्ण आणि प्रगतिशील जीवनाचा आदर्श नमुना जगासमोर ठेवण्यासाठी आहे.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# तरुणांच्या 'ब्रेनवॉशिंग'चा डाव उधळला

## • दहशतवादविरोधी पथकाची मोठी कारवाई • उमरखेड, पुसदसह २० ठिकाणी मध्यरात्री छापे

◆ **पुसद/उमरखेड, १५ फेब्रुवारी**

राज्यभरात अतिरेकी व जातीय भावना भडकविण्याच्या शक्यतेच्या पृष्ठभूमीवर दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) शनिवारच्या मध्यरात्रीनंतर मोठी कारवाई करीत उमरखेड, पुसदसह राज्यातील सुमारे २० ठिकाणी चौकशीसाठी छापे टाकल्याची माहिती आहे. अहिल्यानगर येथेही छापेमारी केल्याचे वृत्त आहे.

एटीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वात ही कारवाई पार पडली. स्थानिक पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात रात्रभर विविध ठिकाणी चौकशी सुरू होती. कारवाई अत्यंत गोपनीय पद्धतीची असल्याने अधिकृत माहिती मिळू शकली नाही. उमरखेडच्या ताजपुरा वार्डातील एका घराची तपासणी या पथकाने केल्याचे स्पष्ट झाले.

पुसद शहराच्या पार्वतीनगर परिसरातील ११ ठिकाणी तरुणांचे 'ब्रेनवॉशिंग' करून राज्यात घातपाती कारवाया घडवण्याच्या कट रचल्याच्या संशयावरून एटीएसने शनिवारी मध्यरात्रीपासून छापेमारी करून धडक कारवाई केल्याने शहरात खळबळ उडाली होती. एटीएसने डझनाहून अधिक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असल्याची माहिती आहे. उमरखेड परिसरात यापूर्वीही अतिरेकी संघटनांच्या हालचालींच्या नोंदी आढळल्यामुळे सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्याचे दिसून आले.

दरम्यान, उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी सांगितले की, ही संपूर्ण कारवाई वरिष्ठ पातळीवरून होत होती. आम्ही केवळ संरक्षणासाठी उपस्थित होतो. त्यामुळे अधिकृत तपशील आमच्याकडे उपलब्ध नाही.

प्राथमिक माहितीनुसार, अकोला येथील दहशतवाद विरोधी पथकाचा मोठा ताफा मध्यरात्री पुसदमध्ये दाखल झाला. ५ ते ६ डीवायएसपी दर्जाचे अधिकारी, विशेष पथकाचे अधिकारी, कर्मचारी, शेकडोंचा पोलिस ताफा आणि मोठ्या संख्येने वाहनांचा ताफा पुसद शहरात पोहोचला.



पुसद येथे कारवाई करताना दहशतवादविरोधी पथक

### महत्त्वाचे अनेक डिजिटल पुरावे जप्त

**या कारवाईदरम्यान एटीएस मुंबई आणि पुणे पोलिसांच्या पथकांनी एकाचवेळी शोधमोहीम राबवून नेटवर्कशी जोडलेले असल्याचा संशय असलेले डिजिटल पुरावे, दस्तावेज, इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली. काही संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. परंतु, अद्याप कोणतीही नवीन अटक किंवा जप्तीबाबत दुजोरा मिळालेला नाही.**

### दहशतवादी संघटनांशी संपर्क असल्याचा संशय

**काही तरुण दहशतवादी संघटनांच्या संपर्कात असून, ते सक्रिय होत असल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. या माहितीच्या आधारे एटीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वाखाली विविध पथके तयार करण्यात आली. या मोहिमेत वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि स्थानिक पोलिसांचीही मदत घेतली जात आहे.**

यानंतर लगेच पार्वतीनगर परिसरातील विविध भागांमध्ये एकाच वेळी छापेमारी सुरू करण्यात आली. प्राथमिक माहितीनुसार, पुसदमध्ये १० ते १२ ठिकाणी तपास व चौकशी सुरू आहे. या कारवाईत जप्त केलेल्या लॅपटॉप आणि मोबाईलमधून मोठी माहिती हाती लागण्याची शक्यता वर्तविण्यात आली. दहशतवाद विरोधी पथकाने अनेक संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे. अद्याप कोणालाही रीतसर अटक केलेली नाही. आक्षेपार्ह साहित्य आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पुढील पावले उचलली जातील, असे सूत्राकडून कळते.

ही कारवाई दहशतवादी संघटनांशी काही संबंध आहे म्हणून की पुसद, उमरखेडात काही घातपात होण्याची खबर एटीएसला मिळाली म्हणून असे प्रश्न नागरिक आणि प्रसार माध्यमांना पडले आहेत. मात्र, एटीएस पथकाच्या छाप्यांमुळे अनेकांचे दाबे दणाणले आहेत, हे मात्र नक्की. *(तभा वृत्तसेवा)*

### बिर्ला यांच्याविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर ९ मार्चला मतदान

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्ध काँग्रेसच्या खासदारांनी सादर केलेल्या अविश्वास प्रस्तावावर ९ मार्च रोजी चर्चा आणि मतदान होईल, अशी माहिती केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा महत्त्वाचा राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

रिजिजू म्हणाले, ९ मार्चपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरू होईल आणि पहिल्याच दिवशी सभापती बिर्ला यांच्याविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा व मतदान होणार आहे. अधिवेशनात अनेक महत्त्वाची विधेयके सादर केली जातील. यावेळी विरोधकांनी गोंधळ घातला, सभागृहाचे कामकाज चालू दिले नाही तर विशेषाधिकाराचा वापर केला जाईल आणि विधेयके चर्चेशिवाय मंजूर होतील. हा विरोधकांना मोठा धक्का असेल. जर विरोधकांनी चर्चेत भाग घेतला नाही तर ते त्यांचे स्वतःचे नुकसान करून घेतील. विरोधकांमध्ये फूट पडली आहे. तृणमूल काँग्रेसने सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर स्वाक्षरी केलेली नाही. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### तारिक रहमान उद्या घेणार पंतप्रधानपदाची शपथ

**ढाका :** बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा मंगळवारी, १७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय संसद भवनाच्या दक्षिण प्लाझा येथे शपथविधी होणार आहे. शपथविधीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह १३ देशांतील नेत्यांना आमंत्रित करण्यात आले. भारताकडून लोकसभेचे सभापती ओम बिर्ला शपथविधीसाठी जाणार आहेत. शपथविधी समारंभ बांगलादेशच्या अंतरिम सरकारकडून आयोजित केला आहे. अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी या खास प्रसंगी भारतासह १३ देशांच्या नेत्यांना आमंत्रित केले आहे. आमंत्रित देशांच्या यादीत भारत, चीन, पाकिस्तान, सौदी अरेबिया, तुर्की, संयुक्त अरब अमिराती, कतार, मलेशिया, ब्रुनेई, श्रीलंका, नेपाळ, मालदीव आणि भूतान यांचा समावेश आहे. राजधानी दिल्ली येथे एआय आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेत व्यस्त असल्याने पंतप्रधान मोदी शपथविधीला जाणार नाही. भारताकडून लोकसभा सभापती ओम बिर्ला शपथविधीसाठी जाणार आहे. १७ वर्षे निर्वासित राहिल्यानंतर तारिक रहमान यांनी बांगलादेशच्या राजकारणात झंझावाती पुनरागमन केले. त्यांच्या पक्षाने २९७ पैकी २०९ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले.

# अर्थसंकल्प हा विकासाचा पाया



## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

**या वर्षीचा अर्थसंकल्प हा 'आता नाही तर कधीच' नाही या भावनेतून नव्हे तर राष्ट्रविकासाची तत्परता आणि प्रेरणेतून निर्माण झालेला आहे. या अर्थसंकल्पातून विकसित राष्ट्र बनण्याची भारताची तत्परता प्रतिबिंबित होते, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले.**

आमच्या सरकारचा कोणताही अर्थसंकल्प हा 'वही खाते' कागदपत्रे तयार करण्याच्या दृष्टिकोनातून बनवलेला नाही. कारण, हा आमचा दृष्टिकोन नाही, असे नरेंद्र मोदी यांनी 'पीटीआय'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले. काही वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून 'यही समय है, सही समय है', अशी घोषणा केली होती. आमच्या सरकारमध्ये नेहमीच उद्देशाची भावना राहिली आहे, असे मोदी यांनी याची आठवण करून देताना सांगितले. आज आपल्या राष्ट्रात एक नवीन आत्मविश्वास निर्माण विविध प्रकारच्या आव्हानांच्या काळातही आपले राष्ट्रीय चारित्र्य प्रकट झाले आहे आणि कठीण जागतिक परिस्थितीतही आपण विकासाचे एक उज्ज्वल बिंदू आहोत.

महामारीनंतर जागतिक व्यवस्था भारतासाठी नवीन दरवाजे उघडत आहेत आणि देश व्यापार आणि नवोपक्रमात भागीदारी करण्यास उत्सुक आहे, असे नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारताच्या विकासाच्या पुढील टप्प्यात प्रवेश करण्यात भारत आता तयार आहे का आणि ही परिस्थिती आता नाही, तर कधीच नाही, अशी आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

आपल्याकडे तरुण आणि वाढत्या प्रमाणात कुशल लोकसंख्या आहे आणि आम्ही कमी चलनवाढ आणि आर्थिक स्थिरतेसह मजबूत वाढीवर लक्ष केंद्रित करीत आहोत. आमचे तरुण अंतराळ, क्रीडा स्टार्टअप्ससारख्या विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात कार्य करीत आहेत, असे नरेंद्र मोदी म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### अमृत महोत्सवाने दिली ध्येयाची भावना

या घडामोडींमुळे लोक याला भारतासाठी एक ऐतिहासिक संधी म्हणून पाहत आहेत. या घडामोटींना गती मिळत असतानाच, देशाने ऐतिहासिक स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवही पाहिला. या अमृत महोत्सवाने लोकांना ध्येयाची भावना दिली, असे मोदी यांनी लेखी मुलाखतीत सांगितले.

### मुलाखतीतील महत्त्वाचे मुद्दे

- सुधारणा ही सरकारची वचनबद्धता असून आम्ही ती करून दाखवली.
- आर्थिक परिवर्तनाच्या पुढील टप्प्यासाठी खाजगी क्षेत्र महत्त्वाचे. त्यांनी निर्णायक प्रतिसाद द्यावा.
- खाजगी क्षेत्राने नफ्याचे संरक्षण करण्यावर कमी लक्ष केंद्रित करावे आणि संशोधन, विकास पुरवठा साखळी, गुणवत्तेवर आक्रमकपणे गुंतवणूक करावी.
- विकसित भारताची पुढची झेप खाजगी क्षेत्राचा नवोन्मेष, दीर्घकालीन क्षमता आणि जागतिक स्पर्धात्मकतेमध्ये धाडसी गुंतवणुकीवर अवलंबून असेल.
- उत्पादकता वाढत असताना, खाजगी क्षेत्रातील मलकांनी कामगारांसोबत नफा योग्यरीत्या वाटून घ्यावा.
- यूपीआय मंचाद्वारे लोकांच्या व्यवहारातील मूलभूत सुधारणांमुळे भारत जगातील डिजिटल नेता.
- विकसित भारताच्या निर्मितीत महिलांची भूमिका महत्त्वाची.
- दशकभराच्या सुधारणांचे फळ 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये मिळाले.

# काँग्रेसवर शिवप्रेमी संतप्त

## सपकाळांविरोधात आंदोलन, पुण्यात दगडफेक

◆ **पुणे, १५ फेब्रुवारी**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी केल्यामुळे राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. त्यांच्या या विधानाचे तीव्र पडसाद रविवारी पुण्यात उमटले. भाजप व काँग्रेसचे कार्यकर्ते एकमेकांविरोधात रस्त्यावर उतरले होते. त्यात दोन्ही बाजूंनी एकमेकांवर दगडफेक करण्यात आली. यात दोन कार्यकर्त्यांसह एक पोलिस कर्मचारी आणि पत्रकारही जखमी झाले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे दिसताच पोलिसांनी हस्तक्षेप केला. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर भाजपाने त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. तसेच या प्रकरणी त्यांच्याविरोधात पुण्यात एक गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. रविवारी दुपारी १२ वाजता भाजपा कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या विरोधात येथील काँग्रेस भवनासमोर आंदोलन सुरू केले. भाजपच्या शेकडो कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करत सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारले. त्यांच्या विरोधात काँग्रेसचे कार्यकर्तेही रस्त्यावर उतरले. यावेळी दोन्ही पक्षांकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यादरम्यान दगडफेकही करण्यात आली. यामध्ये काही कार्यकर्ते, पोलिस आणि पत्रकार जखमी झाले. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. दरम्यान, पोलिसांच्या संरक्षणात भाजप कार्यकर्त्यांनी आंदोलन केल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. *(वृत्तसंस्था)*



### पुण्यात जे घडले ते अयोग्य : बिडकर

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना भाजपा नेते गणेश बिडकर म्हणाले, निश्चितच हा प्रकार पुण्याला साजेसा नाही. परंतु, काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी ज्या प्रकारचे वक्तव्य केलं ते राज्यातील वातावरण चिघळविणारे आहे. सर्वप्रथम आम्ही छत्रपती शिवरायांचे मावळे आहोत आणि शिवरायांची इतर कोणाशी तुलना हे कुठल्याही महाराष्ट्रातील शिवप्रेमीला न पटणारी आहे.

# पाकीटबंद खाद्यपदार्थांवर इशारा देणारी लेबल्स का नाहीत?

## सुप्रीम कोर्टाने एफएसएसएआयला फटकारले

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

बाजारात विक्री होणाऱ्या पाकीटबंद (बिस्किटे, चिप्स, शीतपेये इ.) पदार्थांमध्ये असणाऱ्या साखर, मीठ आणि चरबीच्या घातक प्रमाणाबद्दल पाकिटावर स्पष्ट इशारा असणारे लेबल (खूण) का नाहीत; नागरिकांच्या आरोग्याशी कुठलीही तडजोड आक्षेपार्ह आहे, आमच्या आदेशाला हलक्यात घेऊ नका, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अर्थात् एफएसएसएआयला फटकारले.

याचिकाकर्त्यांच्या सूचनांचा गांभीर्याने विचार करण्याचे आदेश यावेळी न्यायासनाने दिले. न्या. जे.बी. पार्डीवाला आणि न्या. के.व्ही. विश्वनाथन यांच्या न्यायासनाने ३एस आणि अवर हेल्थ सोसायटी या संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी घेतली. पाकिटबंद अन्न पदार्थांच्या पाकिटावर साखर, मीठ आणि चरबीयुक्त पदार्थ असल्याचा स्पष्ट इशारा देणारे लेबल असावे आणि यासंदर्भात आदेश देण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली. हा प्रकार नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि त्यांच्या माहितीच्या अधिकारासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले. यावर न्यायासनाने एफएसएसएआयला फटकारताना म्हटले की, आतापर्यंत तुम्ही जे काही केले, त्याचा कोणताही सकारात्मक परिणाम झालेला दिसत नाही. हा लोकांच्या आरोग्याशी निगडित अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे आणि तो केवळ चर्चेत अडकवून ठेवता येणार नाही. जगातील इतर देशांमध्ये अशा प्रकारे पाकिटाच्या समोरच्या बाजूला चेतावणी देणारी लेबल्स लावली जातात, मग भारतात का नाही, आरोग्याशी संबंधित दिरंगाई आम्ही खपवून घेणार नाही. *(वृत्तसंस्था)*

# आठवडाभरात पडणार जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा पट्टा

- **१५२ लाख मेट्रीक टन ऊस गाळप**
- **१३४ लाख क्विंटल साखर उतारा**

**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

ऊस गाळप हंगाम सुरु झाल्यापासून अवघ्या १०० दिवसांत सोलापूर, सांगली जिल्ह्यासह महाराष्ट्रात साखर कारखान्यांची धुराडी बंद होत आहेत. सोलापुरातील ३५ कारखान्यांचा पट्टा आठवडाभरात बंद होण्याच्या मार्गावर आहेत. जिल्ह्यातील खासगी आणि सहकारी साखर कारखान्यातून आजतागायत १५१ लाख ६४ हजार २४४ मे.टन उसाचे गाळप तर १३३ लाख ०७ हजार २९० क्विंटल साखरेचा उतारा मिळाला आहे.

### अतिवृष्टी, महापुराचा बसला फटका

यावर्षी अतिवृष्टी आणि महापुराचा ६ तालुक्यातील नदीकाठच्या उसाला फटका बसल्याने उसाचे उत्पादन कमी झाले आहे. यंदा गाळप हंगाम लवकर आटोपल्यामुळे शेतकऱ्यांना उसाच्या वाहतुकीसाठी चांगलीच धावपळ करावी लागली. दरम्यान, ऊस तोड करणारे अनेक कामगारही आता परतीच्या मार्गाला लागल्याचे दिसून येत आहे.

गेल्याच आठवड्यात माळशिरस तालुक्यातील सहकार महर्षी, शंकर, ओंकार शुगर, चांदापुरी आणि

(पान ३ वर...)

# भारताने पाकिस्तानला ६१ धावांनी नमविले

## टी-२० वर्ल्डकप : इशानच्या ७७ धावा, सुपर-८ मध्ये प्रवेश

**कोलंबो, दि. १५ फेब्रुवारी-**

टी-२० विश्वचषकात भारताने पाकिस्तानचा ६१ धावांनी पराभव केला. भारताने पाकिस्तानवर मिळविलेला हा सर्वात मोठा विजय आहे. या विजयासह भारतीय संघ सुपर ८ फेरीसाठी पात्र ठरला. सलग तीन विजयांसह भारत ग्रुप अ मध्ये पॉइंट टेबलमध्ये अव्वल स्थानावर आहे.

रविवारी कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या सामन्यात १७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने पाकिस्तानचा डाव १८ षटकांत ११४ धावांतच रोखला. उस्मान खानने सर्वाधिक ४४ धावा केल्या. भारताकडून हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती यांनी सांघिक खेळाचे प्रदर्शन करीत प्रत्येकी २ बळी टिपले. कुलदीप यादव व तिलक वर्मा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ७ गडी गमावून १७५ धावा केल्या. इशान किशनने ४० चेंडूंत ७७ धावा केल्या. त्याने १० चौकार आणि ३ षटकार लगावले. इशान बरोबरच कर्णधार सूर्यकुमार यादवने ३२ व तिलक वर्माने २५ धावांची साथ दिली. पाकिस्तानकडून सईम अयुबने ३ बळी टिपले. कर्णधार सलमान अली आगा, उस्मान तारिक आणि शाहीन शाह आफ्रिदीने प्रत्येकी एक गडी बाद केला.

धुरंधर चित्रपटातील रॅपर हनुमानकाइंडने नाणेफेकीपूर्वी सादरीकरण केले. रोहित शर्माही सामना पाहण्यासाठी आला होता. गेल्या वर्षीच्या आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारत आणि पाकिस्तान आमने सामने आले होते. २८ सप्टेंबर २०२४ रोजी भारताने पाकिस्तानचा ५ गडी राखून पराभव केला होता.

### इशान किशन

- ४० चेंडू
- ७७ धावा
- १० चौकार
- ३ षटकार
- स्ट्राईक रेट १९२.५०



# तीर्थक्षेत्र माचणूर येथे दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी





माचणूर : येथील श्री सिध्देश्वर मंदिरात भाविकांची दर्शनासाठी झाली गर्दी. दुसऱ्या छायाचित्रात पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचा देवस्थानच्यावतीने सत्कार करताना पुजारी. (छाया : प्रथमेशराजे,मंगळवेढा)

## पहाटेपासून मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने गेला दणाणून

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१५ फेब्रुवारी-**

तीर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वराच्या दर्शनासाठी महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर आंध्र,कर्नाटक,महाराष्ट्र,गोवा आदी राज्यातून लाखाच्या जवळपास भाविकांनी हजेरी लावून मनोभावे दर्शन घेतले. दरम्यान पहाटे पाच वाजता प्रांताधिकारी बी.आर माळी, तसेच तहसिलदार मदन जाधव व त्यांच्या सौभाग्यवती निशा जाधव यांच्या हस्ते श्री ची पुजा करुन दुग्धाभिषेक केल्यानंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खूले करण्यात आले. हर हर महादेवच्या जयघोषाने पहाटेपासून मंदिर परिसर दणाणून गेला होता.

सोलापूर पासून ४० कि.मी.,मंगळवेढ्यापासून १४ कि.मी. अंतरावर भीमा नदीच्या कडेकपारीत भव्य असे हेमाडपंथी माचणूर येथे श्री सिध्देश्वराचे पुरातन मंदिर असून प्रतिवर्षी महाशिवरात्रीला येथे ५ दिवस यात्रा भरली जाते. यात्रेनिमित्त येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजनही केले जाते. महाशिवरात्रीदिवशी माचणूर गावातील श्री ची पालखी सायंकाळी मंदिराकडे येते व या पालखीचा मंदिरात ५ दिवस मुक्काम असतो, पाचव्या दिवशी पुन्हा श्री ची पालखी माचणूर गावाकडे मार्गस्थ होते. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर भाविकांनी भीमा नदीत पहाटे स्नान करुन काही भक्तांनी ओल्या पडद्याने दर्शन घेतले. मंदिर परिसरात मेवा मिठाई,रसपानगृह,स्टेशनरी दुकाने, नारळ,फुल विक्रेते , विविध पाळणे व अन्य छोटीमोठी दुकाने परिसरात थाटली आहेत. कर्नाटक,आंध्र,महाराष्ट्रातील कानाकोपर्यातून लगत असलेल्या सोलापूर,मोहोळ,पंढरपूर,सांगोला व अन्य भागातून दिवसभर दर्शनासाठी भाविकांची रिघ असल्याने लांबलचक मंदिरात भाविकांच्या रांगा लागल्याचे चित्र होते. श्री च्या पालखीचे आगमन झाल्यानंतर सायंकाळी मंदिर परिसरात आरत्याचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी नवसापोटी भाविकांनी पेढा,साखर आदींचे वाटप करुन आनंद व्दिगुणीत केला. काही भाविकांनी नवसापोटी मंदिराच्या वेशीपासून ते नदी पर्यंत प्रत्येक पायरीला नारळ फोडून आपले बोललेले नवस पुर्ण केल्याचे दिसून येत होते. मंगळवेढा एस.टी. आगाराने माचणूर यात्रेसाठी ज्यादा गाड्या सोडून भाविकांची सोय केली होती. पंचक्रोशीतील भाविक हे पारंपारिक पध्दतीने बैलांना रंगवून त्यांच्यावर झुल घालून बैलगाडीतून कुटूंबासह दर्शनाला येत असल्याचे चित्र होते. काही भाविकांनी मोटर सायकलवर कुटूंबासह येणे पसंत केले. दरम्यान यात्रेसाठी डी.वाय.एस.डी.डॉ.बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी पोलीस निरीक्षक,सहाय्यक पोलीस निरीक्षक,पोलीस उपनिरीक्षक तीन,एस.सी.बीचे एक पथक,वाहतूक शाखेचे दहा पोलीस पथक,तीस अंमलदार, १५ होमगार्ड,आर.सी.पी.प्लॅटून एक राखीव फोर्स असा पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता. कुठेही अनुचित प्रकार न घडता यात्रेचा पहिला दिवस शांततेत पार पडला.

> पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी श्री सिध्देश्वराचे मनोभावे दर्शन घेवून महापालिका,जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूका शांततेत पार पाडल्या. भविष्यातही जिल्ह्यात शांतता नांदो अशी श्री सिध्देश्वराला प्रार्थना केली.

## महत्वाचे...




### भागाईवाडी शैक्षणिक वाटचालीस दिशादर्शक : प्रेमराज वाघ

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

भागाईवाडी गावात पाणी आणि माती विषयक नागरिकांमध्ये असलेली जागृती आम्हास शैक्षणिक दृष्ट्या उपयुक्त व आमचे शैक्षणिक वाटचालीस दिशादर्शक ठरणारी असून, गाव जरी छोटं असले तरी नागरिकांचे विचार मोठे असल्याचे कौतुक प्रेमराज वाघ या विद्यार्थ्याने केले. वडाळा येथील लोकमंगल बीएससी कृषी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी भागाईवाडी येथे दोन महिने रावे प्रशिक्षणासाठी होते; या प्रशिक्षणाचा समारोप करताना नागरिकांच्या वतीने प्रेमराज वाघ कर्जत याने वरील विचार व्यक्त केले. यावेळी वाघ याच्यासह तन्मय जगताप जेजुरी, हर्षवर्धन संपकाळ जत, ऋतुराज कवडे, कुर्डुवाडी, स्वराज मगर, धाराशिव, ओम मासाळ, मोहोळ या सहा विद्यार्थ्यांचा सत्कार करुन त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आम्हास भागाईवाडी गाव प्रशिक्षणासाठी दिले तेव्हा आपली सोय होईल का? नागरीकांचे सहकार्य मिळेल का? अशी धाकधुक होती. मात्र गावातील लोकांचे सहकार्य, विचार, शेतीची माहिती ऐकुन व प्रत्यक्षात शेतीत केलेला अवलंब पाहुन आम्हास हे गाव प्रशिक्षणासाठी मिळालं हे आमचं भाग्य समजतो. आपण केलेला सन्मान व दिलेले आशीर्वाद आमचे शैक्षणिक वाटचालीस प्रेरणा व नवी उर्जा देणारी असल्याचे प्रेमराज वाघ यांनी सांगितले यावेळी माजी सरपंच तथा सरपंच परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्षा कविता घोडके पाटील यांनी पाणी फाऊंडेशन, जलयुक्त शिवार स्वच्छता अभियान, स्मार्ट गाव नागरीकांच्या योगदानामुळे झाल्याचे सांगुन आपण ज्या ध्येयाने आपण शैक्षणिक करिअर घडवत आहात याचं खरं बळ तुमचे आई वडील व शैक्षणिक गुरु आहेत त्यांचे कष्ट व इच्छा यांची जाणीव ठेवून खुप शिका, यशस्वी व्हा आणि जेव्हा तुम्ही मोठ्या पदावर जाल तेव्हा भागाईवाडीची आठवण ठेवा अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक लहु घोडके यांनी केले. सुत्रसंचलन श्रीकांत पाटील व विक्रम घोडके यांनी केले. यावेळी भरत पाटील, अंकुश घोडके, जयसिंह चौधरी, अनंत हावळे, बब्रुवाहन घोडके आदींसह गावकरी उपस्थित होते.



### संस्कार, संस्कृती व ज्ञान देणारी संस्था म्हणजे एन.के. किड्स स्कूल : उपमहापौर देवकर

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी -**

संस्कार, संस्कृती आणि ज्ञान देणारी संस्था म्हणजे एन. के. किड्स स्कूल असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी बाळे येथील एन. के. किड्स स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आयशा. इनामदार, संतोष कुमार घोडके, अमोल ढेपे, राजाभाऊ अलुरे, संस्थेच्या प्रिन्सिपल श्वेता कस्तुरे, अमोल घाडगे, मनोज देवकर, मंजुषा डोईफोडे व संस्थेचे अध्यक्ष विकास कस्तुरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कै. नागेश करजगी यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. वर्षभरात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच पालक प्रतिनिधींचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी हेड शिक्षिका दिपाली कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीनाक्षी भगरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अश्विनी शिंगण, पुनम कळसाईत, सेविका संगीता हेगडकर व सुरेखा शिंदे यांनी परिश्रम घेतले.



### पुस्तकांमुळे माणसाचे जीवन समृद्ध होते : साहित्यिक गोविंद काळे यांचे प्रतिपादन

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

वाचनामुळे व्यक्तिमत्त्व विकास, ज्ञानवृद्धी व विचारसरणी समृद्ध होते त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित वाचन करण्याचे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक गोविंद काळे यांनी केले. हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने श्रद्धेय श्रीमान भाऊसाहेब गांधी जन्मशताब्दी महोत्सव २०२५ निमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, एमबीए विभाग प्रमुख डॉ. प्रितम कोठारी तसेच ग्रंथपाल डॉ. संदीप लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. नवराज काळदाते यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक बी. आर. पाटील यांनी केले. पुस्तक प्रदर्शनामध्ये अभ्यासक्रमाशी संबंधित पुस्तके, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक पुस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच विविध विषयांवरील ज्ञानवर्धक साहित्य मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रंथपाल डॉ. संदीप लोखंडे यांनी आभार मानले.

# तोरणी व अरळी येथे जल अर्पण दिवस साजरा






## प्रभातफेरी, गावसभा, जलप्रतिज्ञा व पाणी शुद्धीकरण प्रात्यक्षिकाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला कायमस्वरूपी शुद्ध व पुरेसे पिण्याचे पाणी मिळण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत योजना गावाला हस्तांतरण दिवस जल अर्पण दिवस म्हणून तोरणी (ता. अक्कलकोट) व अरळी (ता. मंगळवेढा) येथे विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

जिल्ह्यात प्रत्येक कुटुंबाला कायमस्वरूपी शुद्ध पुरेसे पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची काम प्रगती पथावर सुरू आहेत.गावातील जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झालेल्या योजना ग्राम पंचायतीकडे हस्तांतरण करण्यात येत आहे

त्यानुसार तोरणी व अरळी या गावातील पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झालेल्या या गावात सदरची योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली जल अर्पण दिवस गावात साजरा करण्यात आला. यावेळी गावातील पाणी पुरवठा योजनेची संपूर्ण माहिती गावसभेमध्ये ग्रामस्थांना देऊन योजना कायमस्वरूपी ठेवण्यासाठी देखभाल दुरुस्तीची हमी घेण्यात आली. गावात उत्सव साजरा करताना पाण्याचे महत्व ग्राम स्थांना कळावे यासाठी शालेय विद्यार्थ्यांची गावातून रॅली, जल प्रतिज्ञा, गावातून विद्यार्थी, ग्राम पंचायतचे पदाधिकारी व ग्राम स्थ यांची प्रभातफेरी काढण्यात आली. तसेच शुद्ध पाण्यासाठी किटचे प्रात्यक्षिक दाखवून शुद्ध पाण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

तोरणी येथे झालेल्या या कार्यक्रमासाठी सरपंच बसम्मा मनगोळी, उपसरपंच चंद्रशा जिरोले, ग्रामपंचायत सदस्य तसेच उपअभियंता विद्याधर राठोड, कनिष्ठ अभियंता प्रवीण चव्हाण, ग्रामपंचायत अधिकारी सिद्धेश्वर जक्क़ीकोरे, पी एमसी नाबार्डचे जमादार, गट समन्वयक सतिश शिंगे, सी.आर.सी. प्रियांका संगमनेरकर आदी उपस्थित होते. अरळी येथे प्रभातफेरी, गावसभा, जलप्रतिज्ञा व एफ.टी.के.च्या माध्यमातून पाणी शुद्धीकरणाचे प्रात्यक्षिक, कलश पूजन आदी उपक्रम राबविण्यात आले. तसेच दत्तात्रय येडवे व संजय बिदरकर या शिक्षक कलावंत यांनी नाटीकेच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजना, देखभाल दुरुस्ती, शुद्ध पाणी, स्वच्छता आदी प्रबोधन केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेचे सदस्य रमेश भांजे, पंचायत समिती सदस्या जयश्री कवचाळे, सरपंच लक्ष्मीबाई रजपूत, उपसरपंच उबरावती तोरणे, उपअभियंता प्रसाद काटकर, कनिष्ठ अभियंता दत्ता घुले ग्रामपंचायत अधिकारी विठ्ठल लिगाडे, प्रज्वल गायकवाड, पाणी गुणवत्ता सल्लागार गुरुदेव चौगुले, दया वाकडे, संजय बिदरकर, एस.एम.बिराजदार, के.पी.कुंभार, पाणी गुणवत्ता तज्ञ मिरजे आदी उपस्थित होते.




## आपदा मित्र सखींनी सिद्धेश्वर तलावात केला बोट चालविण्याचा सराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने सिद्धेश्वर तलाव येथे आपदा मित्र सखींना बोट चालवण्याचा सराव घेण्यात आला. आपत्तीजनक परिस्थितीत बचाव कार्यासाठी बोट महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे सातत्यपूर्ण सरावातून गुणवत्तापूर्ण कामगिरी साध्य होऊन बचाव कार्य अधिक प्रभावीपणे करता येईल, असा उद्देश या उपक्रमामागे आहे, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी दिली.

सामाजिक बांधिलकीतून चडचणकर पेट्रोल पंपाचे योगेश चडचणकर यांनी सरावासाठी लागणारे पेट्रोल उपलब्ध करून दिले. त्यामुळे सराव कार्य सुरळीत पार पडले. आपत्तीकाळात मनवहानी टाळण्यासाठी वारंवार सराव शिबिरांचे आयोजन होणे गरजेचे असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने स्पष्ट केले. तसेच आपदा मित्र सखी टीमच्या वतीने सरावासाठी लागणारे पेट्रोल सामाजिक बांधिलकीतून दानशूर व्यक्तींनी उपलब्ध करून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाची बैठक उत्साहात



> **समाजाच्या नूतन नगरसेवकांचा २८ फेब्रुवारीला सत्कार**
>
> सोलापूर व अहिल्यानगर येथील निवडून आलेल्या समाजाच्या १९ नगरसेवकांचा तसेच अधिकारी पी. नरहरी, तिरुमला तिरुपती देवस्थानच्या संचालिका जानकीदेवी आदींचा सत्कार २८ फेब्रुवारी रोजी सोलापुरात करण्याचा तसेच शांती चौकातील महापालिकेच्या हिंदू स्मशानभूमीमध्ये विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, महापालिकेच्या कौन्सिल हॉलमध्ये पद्मशाली समाजाचे कुलदैवत महर्षी मार्कंडेय महामुनींचे तैलचित्र लावणे हे तीन ठराव या बैठकीत करण्यात आले.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

पद्मशाली ज्ञाती संस्थेची ५८ एकर जागा असून या जागेत महर्षी श्री मार्कंडेय यांच्या नावे मेडिकल कॉलेज उभारण्यात यावे, अशी पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघ तसेच पद्मशाली समाजाची मागणी आहे. यासाठी पद्मशाली ज्ञाती संस्था व मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी व्यक्त केली. संघाची पहिली बैठक रविवारी मार्कंडेय मंदिरात पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी संघाचे कार्याध्यक्ष व्यंकटेश चाटला, उपाध्यक्ष अंबादास बिंगी, यल्लप्पा गड्डम, प्रधान सचिव वासुदेव इप्पलपल्ली, सरचिटणीस दयानंद मामड्याल, खजिनदार श्रीनिवास चिलका, विशेष निमंत्रित संतोष सोमा, पेंटप्पा गड्डम, रमेश विडप आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# महाशिवरात्रीनिमित्त ब्रह्माकुमारी विद्यालयात शिवध्वजारोहण

## व्यर्थ संकल्पमुक्तीचे व्रत करण्याचे संगीतादिदींचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१५ फेब्रुवारी**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या बार्शी सेवाकेंद्रामध्ये महाशिवरात्री निमित्त शिवध्वजारोहण कार्यक्रम नूतन उपनगराध्यक्ष रोहित पाटील व नगरसेविका कांचन मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

यावेळी सेवाकेंद्र संचालिका संगीता दिदींनी युवाशक्ती व नारीशक्ती प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिल्याचा आनंद व्यक्त करत महाशिवरात्रीचे आध्यात्मिक रहस्य स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, सध्याच्या काळात सुखप्राप्तीची अनेक साधने उपलब्ध आहेत; परंतु शांतीच्या अभावामुळे हे सुख क्षणभंगुर ठरते. शांती ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज असून प्रत्येक जण तिच्या शोधात आहे. शांतीसाठी व्यर्थ संकल्पांपासून मुक्त राहणे आवश्यक आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी उपवास करून



आहार बदलाचे व्रत केले जाते, त्याचप्रमाणे व्यर्थ व नकारात्मक संकल्पांपासून कायम स्वरूपी दूर राहण्याचे व्रत अंगीकारावे. शांतीची प्राप्ती झाल्यानंतर अविनाशी सुखाची अनुभूती आपोआप मिळते. जेव्हा धर्मग्लानी होते तेव्हा परमात्मा सत्यधर्माची स्थापना करण्यासाठी अवतरित होतो. निराकार ज्योतिर्बिंदू शिव परमात्म्याचा मातृगर्भातून जन्म होत नाही, तर १९३६ साली प्रजापिता ब्रह्माबाबांच्या शरीरात परकाया प्रवेशाद्वारे परमात्म्याचे दिव्य अवतरण झाले. तेव्हापासून शिव परमात्मा अखिल विश्वात ज्ञानप्रकाश पसरवत आहे. अज्ञानाच्या अंध:कारमय रात्री ज्ञानसूर्याचा हा दिव्य जन्म असल्यामुळे त्याला शिवरात्री असे म्हटले जाते.

वैराग उपसेवाकेंद्र संचालिका मीरा दिदींनी उपस्थितांकडून दृढ प्रतिज्ञा करून घेतल्या. साक्षीभावात राहणे, शुभभावना ठेवणे, मधुर वाणीने व्यवहार करणे, चिंता व व्यर्थ चिंतनापासून मुक्त राहणे, स्वराज्य अधिकारी बनून मन-बुद्धीवर नियंत्रण ठेवणे, तसेच परचिंतन व परमतापासून दूर राहणे अशा संकल्पांचा त्यात समावेश होता.

ब्र. कु. अनितादिदी करवा यांनी सूत्रसंचालन करत निर्देशित ध्यान गाईडेडमेडाटेशन करून घेतले.

# अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या केंद्रीय अध्यक्षपदी राजा माने







## महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी सतीश सावंत, महासचिवपदी विकास भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१५ फेब्रुवारी -**

अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या केंद्रीय अध्यक्षपदी वरिष्ठ संपादक राजा माने यांची बिनविरोध निवड केंद्रीय व राज्य कार्यकारणी समितीच्या कोल्हापूर येथे झालेल्या बैठकीत करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी सांगोला सोलापूर येथील सतीश सावंत, राज्य महासचिवपदी कराड येथील विकास भोसले, प्रदेश उपाध्यक्षपदी अहिल्यानगर येथील इकबाल शेख, केंद्रीय उपाध्यक्षपदी महेश कुगावकर व अमोल पाटील यांची तर राष्ट्रीय सचिवपदी तेजस राऊत, संघटनेच्या साप्ताहिक विभागाच्या प्रदेशाध्यक्षपदी संजय कदम, गोवा प्रदेशाध्यक्षपदी अनिल पाटील तर मध्य प्रदेश प्रदेशाध्यक्षपदी प्रवीण कुमार खारीवाल यांच्या देखील निवडी करण्यात आल्या. यावेळी प्रतिबिंब प्रतिष्ठानचे विश्वस्त दीपक नलवडे, संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुहास पाटील, धनंजय पानसांडे, संघटक विनायक कलढोणे, राज्य कार्यकारणी सदस्य सचिन भिलारे, समन्वयक गणेश बोतालजी, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष सुभाष चिंधे, सातारा जिल्हाध्यक्ष संतोष शिराळे, जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ साखरे, सांगली जिल्हाध्यक्ष मनोहर पवार, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब फास्के, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष रमेश नेटके यांच्यासह राज्याभरातून आलेल्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

> संस्थेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष राजा माने यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व पत्रकारांना न्याय देऊन त्यांच्या मागण्या शासन दरबारी मांडून सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. माझ्यावर जो विश्वास दाखवला त्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ न देता महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात व गावात पत्रकारांच संघटन बळकट करू
>
> **- सतीश सावंत, प्रदेशाध्यक्ष**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/





काश्मीरमधील श्रीनगर येथे असलेल्या शंकराचार्य मंदिरात महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहत साजरा करण्यात आला. ३७० कलम हटविल्यानंतर मंदिरांमध्ये पूजाअर्चा सुरू झाली. दुसऱ्या छायाचित्रात प्रयागराज येथील मंदिरात जल अर्पण करताना भाविक तर तिसऱ्या छायाचित्रात अमृतसर येथील भोलेनाथाच्या भव्य मूर्तीसमोर दोन्ही हात जोडून प्रार्थना करताना महादेव भक्त

# मणिपुरात दोन महिलांसह तीन बंडखोरांना अटक

**इम्फाळ, १५ फेब्रुवारी**

मणिपूरच्या दोन जिल्ह्यांमध्ये प्रतिबंधित दोन वेगवेगळ्या संघटनांशी संबंधित दोन महिलांसह तीन बंडखोरांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली.

ही कारवाई तेंग्नौपाल आणि पूर्व इम्फाल जिल्ह्यात शनिवारी करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. तेंग्नौपाल जिल्ह्यातील सनराईज ग्राऊंडच्या परिसरातून सुरक्षा दलांनी प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) संघटनेच्या दोन महिला बंडखोरांना अटक केली. अकोईजाम साखेनही आणि चोंगथम हेम्बाबी अशी त्यांची नावे आहेत. पूर्व इम्फाळ जिल्ह्यातील नापेटपल्ली येथून बंदी घातलेल्या प्रेपाक (प्रो) संघटनेशी संबंधित बंडखोराला अटक करण्यात आली. इंगुडम इंगोचा सिंह असे त्याचे नाव आहे आणि त्याच्याकडून पाच काडतुसांनी भरलेले .३२ पिस्तूल जप्त करण्यात आले. (वृत्तसंस्था)

# भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वांत वेगवान

> “ एआय शिखर परिषदेसाठी योग्य ठिकाण - अँटोनियो गुटेरेस ”

**संयुक्त राष्ट्रे, १५ फेब्रुवारी**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी भारताचे कौतुक केले आणि आजच्या घडीला भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात



उदयोन्मुख आणि वेगवान वाढणारी आहे. जागतिक घडामोडींमध्ये भारताचा प्रभाव सातत्याने वाढत आहे. त्यामुळेच आगामी एआय शिखर परिषदेचे आयोजन करण्यासाठी भारत हे योग्य ठिकाण असल्याचे संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस म्हणाले.

एआय अर्थात् कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदेचे राजधानी दिल्ली येथे सोमवार,१८ फेब्रुवारीपासून आयोजन करण्यात आले. या पृष्ठभूमीवर गुटेरस यांनी जारी केलेल्या संदेशात भारताच्या विकासाचे आणि अर्थव्यवस्थेचे कौतुक करताना म्हटले की, बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताचा प्रभाव सातत्याने वाढत आहे.

### भविष्यात भारत देणार जगाला दिशा

**शिखर परिषदेचे आयोजन केल्याबद्दल मी भारताचे मनापासून अभिनंदन करतो. एआय विकासाचा सर्वांना फायदा होणे अत्यंत आवश्यक आहे आणि जागतिक दक्षिणेतील देशांनीही एआयच्या फायदा मिळावा यासाठी भारताकडून होणारे प्रयत्न कौतुकास्पद आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत भविष्यात भारत जगाला दिशा देणारा ठरेल यात दुमत नाही. मानवतेच्या फायद्यासाठी एआय एक सार्वत्रिक साधन बनवणे अत्यंत आवश्यक आहे.**

एआय संपूर्ण जगासाठी लाभदायक असावे आणि केवळ विकसित देशांसाठी किंवा दोन महासत्तांचे त्यानवर वर्चस्व असू नये, या उद्देशाने भारताने आयोजित केलेली एआय शिखर परिषद भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणार आहे. जागतिक घडामोडींमध्ये महत्त्वपूर्ण प्रभाव असलेली अत्यंत यशस्वी उदयोन्मुख अर्थव्यवस्था भारताची आहे आणि एआय शिखर परिषदेचे आयोजन करण्यासाठी हे योग्य ठिकाण आहे.

आतापर्यंत तीन जागतिक एआय शिखर परिषदा झाल्या आहेत. २०२३ मध्ये युकेमधील ब्लेचली पार्क येथे झालेल्या एआय सुरक्षा शिखर परिषदेने याची सुरुवात झाली. २०२४ मध्ये दक्षिण कोरियामध्ये एआय सोल शिखर परिषद झाली. गेल्यावर्षी फेब्रुवारीमध्ये फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये एआय ॲक्शन शिखर परिषद आयोजित करण्यात आली. दिल्लीतील भारत मंडपम येथे होणारी एआय इम्पॅक्ट शिखर परिषद या मालिकेतील चौथा आणि सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. लोक, ग्रह आणि प्रगती यावर आधारित ही परिषद आहे.

### महासत्तांचे वर्चस्व मोडित काढणे गरजेचे

एआय कुणाचीही मक्तेदारी असता कामा नये, यावर महासत्तांचे वर्चस्व मोडित काढणे गरजेचे असून, यासाठी भारताने सुरू केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. अविकसित आणि विकसनशील देशांना देखील नवतंत्रज्ञान, एआयचा लाभ होणे आवश्यक आहे. एआयसाठी नियम असावे यासाठी जागतिक स्तरावर चर्चा होणे काळाची गरज असून, याची सुरुवात भारतातून होत असल्याचा आनंद असल्याचे गुटेरस म्हणाले. (वृत्तसंस्था)

### आजपासून दिल्लीत जागतिक नेत्यांची मांदियाळी




१६ ते २० फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या एआय शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ४५ देशांमधील २० राष्ट्रप्रमुख आणि मंत्री भारतात येणार आहे. यामध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा, स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेड्रो सांचेझ पेरेझ-कास्टेजॉन, अबू धाबीचे क्राउन प्रिन्स, भूतानचे पंतप्रधान, क्रोएशियन पंतप्रधान, एस्टोनियाचे राष्ट्राध्यक्ष, फिनलंडचे पंतप्रधान, ग्रीकचे पंतप्रधान, कझाकस्तानचे पंतप्रधान आणि मॉरिशियन पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांचा समावेश आहे.

# हल्ल्यांसाठी डॉक्टरांनी स्थापन केली होती ‘अन्सार अंतरिम’

**व्हाईट कॉलर्ड दहशतवाद प्रकरण**

**नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

व्हाईट कॉलर्ड दहशतवादी मॉड्युल प्रकरणात अटक केलेले डॉक्टर २०१६ पासून कट्टरपंथी होते आणि त्यांनी केंद्रशासित प्रदेश तसेच अंतर्गत भागात विध्वंसक कारवाया करण्यासाठी ‘अन्सार अंतरिम’ नावाची एक नवीन दहशतवादी संघटना स्थापन केली होती, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले.

१० नोव्हेंबर रोजी लाल किल्ल्याबाहेर स्फोट घडवलेल्या कारचा चालक डॉ. उमर उन नबीने २०१६ आणि २०१८ मध्ये दहशतवादी गटांमध्ये सहभागी होण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता, असे एनआयएच्या तपासात आढळल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

आरापी डॉक्टर मुझमिल गनी, उमर उन नबी, आदिल राथेर, त्याचा भाऊ मुझफ्फर राथेर (फरार), मौलवी इरफान, कारी आमिर आणि तुफैल गाझी एप्रिल २०२२ मध्ये श्रीनगरच्या मध्यभागी असलेल्या ईदगाहमध्ये भेटले होते, असे तपासा



आढळले आहे.

या बैठकीत त्यांनी अन्सार अंतरिम ही दहशतवादी संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये आदिलला गटाचा अमीर (प्रमुख), मौलवी इरफानला उपअमिर, आणि गनीला कोषाध्यक्ष म्हणून नियुक्त केले होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अतिरेकी गटांमध्ये अन्सार सामान्यतः जागतिक पातळीवर बंधी घातलेली दहशतवादी संघटना अल-कायदाशी संबंधित आहे.

सक्रिय दहशतवाद्यांपाशी असलेले त्यांचे सर्व संपर्क तुटल्यामुळे एक नवीन गट तयार करण्याची गरज निर्माण झाली. बैठकीदरम्यान सदस्यांना भूमिका आणि ऑपरेशनल कोड देण्यात आले, असे अटक केलेल्या डॉक्टर आणि मौलवीने सांगितल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. (वृत्तसंस्था)

### आयईडी तयार करण्यासाठी ऑनलाईन प्रशिक्षण

आयईडी कसे तयार करायचे, हे शिकण्यासाठी उमरने ऑनलाईन व्हिडीओ पाहण्यास सुरुवात केली आणि ट्रायएसिटोन ट्रायपॅरॉक्साईड तयार करण्यात यश मिळवले. हे सर्वांत उल्लेखनीय पॅरॉक्साईड स्फोटकांपैकी एक आहे. अनेक दहशतवादी हल्ल्यांसाठी स्फोटक भरण्यासाठी ते वापरले गेले होते.

### हरयाणातून केली खतखरेदी

उमर समन्वयकाची भूमिका पार पाडायचा, तर गनी आर्थिक बाबी आणि खरेदी हाताळायचा. २०२३ मध्ये या गटाने हरयाणातील सोहना आणि नूंह या भागातून खत खरेदी करण्याचा निर्णय घेतला. उमरच्या सूचनेनुसार फरिदाबादमधील एका रसायन दुकानातून पोटॅशियम नायट्रेटही खरेदी करण्यात आले.

# प्राध्यापकांची सर्वाधिक नियुक्ती तामिळनाडूत

**महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर**

**यूजीसीचा डेटा**

**नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये वर्गात वास्तविक जगाचे अनुभव देण्यासाठी उद्योग तज्ज्ञांना प्राध्यापक म्हणून नियुक्त करण्यात तामिळनाडूने आघाडी घेतली आहे. त्यानंतर महाराष्ट्र आणि गुजरातचा क्रमांक लागतो, असे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने २०२२ मध्ये शैक्षणिक संस्था आणि उद्योग यातील दरी भरून काढण्यासाठी वर्गातील वातावरणात व्यावसायिक बुद्धिवंतांना आणण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापकांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती.

हे पद पूर्णपणे तात्पुरते असून ते मंजूर पदांची जागा घेत नाही. पात्रतेसाठी किमान १५ वर्षांचा संबंधित अनुभव आवश्यक आहे. आतापर्यंत ३४९ उच्च शिक्षण संस्थांनी १,८४१ पीओपींना नियुक्त केले आहे, त्यापैकी सर्वाधिक ३९४ तामिळनाडूमध्ये आहेत, असे आकडेवारीवरून स्पष्ट झाले.

महाराष्ट्रात १९३ पीओपी नियुक्त करण्यात आले आहेत, तर गुजरात आणि कर्नाटकने अनुक्रमे १७९ आणि १७० व्यावसायिकांची नियुक्ती केली आहे. शैक्षणिक कार्यबलात उद्योग व्यावसायिकांना नियुक्त करण्यात खाजगी विद्यापीठे आघाडीवर आहेत, तर केंद्रीय विद्यापीठांनी आतापर्यंत केवळ १५ पीओपी नियुक्त केले. (वृत्तसंस्था)

### ४५ हजारांपेक्षा जास्त महाविद्यालयांचा समावेश

भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात ५६ केंद्रीय, ४६० राज्य, १२८ अभिमत विद्यापीठे आणि ५१० खाजगी विद्यापीठे, ४५ हजारांपेक्षा जास्त महाविद्यालयांचा समावेश आहे. या माध्यमातून केंद्रीय विद्यापीठांमध्ये पीओपी नियुक्त्यांचा मर्यादित प्रसार दिसून येतो.

# नाईकांना स्मृतिभ्रंश झाला : श्रीकांत शिंदे

**मुंबई, १५ फेब्रुवारी**

भाजप नेते गणेश नाईक यांनी नगरविकास खात्याने भूखंड बिल्डरांच्या घशात घातल्याचा आरोप करत अप्रत्यक्ष एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. आता या आरोपांना एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. गप्प राहण्यासाठी मंत्रीपद स्वीकारलेले नाही, असे नाईकांनी म्हटले होते, ज्यावर शिंदे यांनी नाईकांना स्मृतिभ्रंश झाल्याचा प्रतिवाद केला. श्रीकांत शिंदे यांनी गणेश नाईक यांना थेट इशारा देत ‘माझ्या नादी लागू नका’ असे सुनावले आहे. दोन्ही नेत्यांमध्ये खडाजंगी सुरू आहे. (वृत्तसंस्था)



प्रकृतीच्या कारणामुळे काही दिवसांपूर्वी काही सदस्य परत आल्यानंतर सात अवकाशवीर १४ फेब्रुवारीला आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रावर दाखल झाले आहेत. यामध्ये रशियन आणि अमेरिकन सदस्यांचा समावेश आहे. अंतराळ स्थानकाशी जुळल्यानंतर नासाने जारी केलेले छायाचित्र

# अहमदाबाद विमान अपघाताची चौकशी सुरुच

**मुरलीधर मोहोळ यांची माहिती**

**सांगली, १५ फेब्रुवारी**

मागील वर्षी अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमानाबाबत विदेशी माध्यमांनी वार्तांकनात केलेल दावे नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी फेटाळले असून, या अपघाताची चौकशी अद्याप सुरू असल्याची माहिती दिली.

अपघाताची चौकशी करणाऱ्या यंत्रणांनी सादर केलेल्या अहवालात वैमानिकांना दोषी ठरवले असल्याचा दावा एका इटालियन वृत्तपत्राने केला होता. तपास यंत्रणा या प्रकरणाची चौकशी करीत आहेत, इतकेच मी सांगू इच्छितो. आपण आपल्या तपास यंत्रणांवर विश्वास ठेवायचा की बाहेरच्यांवर? असा प्रश्न उपस्थित करताना यंत्रणांकडून तपास सुरू असल्याचे मोहोळ यांनी स्पष्ट केले.

अंतिम अहवाल तयार झाल्यावरच त्यावर भाष्य करणे योग्य ठरेल, असे त्यांनी पुढे सांगितले. १२ जून २०२५ रोजी अहमदाबाद येथून लंडनला जाणारे एअर इंडियाचे बोईंग ७८७-८ विमान उड्डाण क्रमांक एआय-१७१ वर असताना कोसळल्याने भारतातील सर्वांत भीषण विमान अपघातांपैकी एक झाला होता. यात २४१ प्रवाशांसह एकूण २६० जणांचा मृत्यू झाला होता. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### तुरुंगात असलेल्या राजपालची फी वाढली

चित्रपट निर्माते प्रियदर्शन यांनी त्यांच्या आगामी चित्रपटासाठी राजपाल यादव यांना केवळ भूमिकाबद्धच केले नाही तर तर मानधनातही वाढ केली आहे. राजपाल सध्या चेक बाऊन्स प्रकरणात तिहार तुरुंगात आहे. एका मुलाखतीत प्रियदर्शनने सांगितले, ‘‘मी त्याला २० वर्षांहून अधिक काळापासून ओळखतो. मी त्याला पहिल्यांदा ‘जंगल’ चित्रपटात पाहिले होते. त्याच्या अभिनयाने मला आश्चर्यचकित केले होते. त्याच्यासोबत माझा पहिला चित्रपट ‘मालामाल वीकली’ होता. त्यानंतर ते माझ्या बहुतेक चित्रपटांमध्ये दिसले. मी माझ्या पुढील चित्रपटाचे निर्माते जुबिली फिल्म्स यांना सांगितले की, त्यांची सध्याची परिस्थिती पाहता राजपालला सामान्यपेक्षा जास्त मानधन द्यावे. आम्हाला त्यांना वाचवायचे आहे. निर्माते सहमत झाले आहेत. माझ्या चित्रपटात ते खलनायकाची भूमिका साकारत आहेत.’’



### ‘ओ रोमियो’ची दोन दिवसांची कमाई २३.५१ कोटी




शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी अभिनीत ओ रोमियो चित्रपटाने दोन दिवसांत तब्बल २३.५१ कोटींचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले आहे. या चित्रपटाने ९ कोटी रुपयांचे ओपनिंग कलेक्शन केले होते. बॉक्स ऑफिस ट्रॅकर वेबसाइट सैकनिल्कनुसार, १३ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालेल्या ओ रोमियो चित्रपटाने ९ कोटी रुपयांचे कलेक्शन केले होते. त्यानंतर चित्रपटाने १४.५० कोटी रुपयांची कमाई केली. चित्रपटाने एकूण २३.५१ कोटी रुपयांची कमाई केली. ओपनिंग डेच्या तुलनेत चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनमध्ये ४५ टक्के वाढ दिसून आली आहे. चित्रपट देशभरात ४७०० हून अधिक स्क्रीन्सवर प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाची प्रेक्षकसंख्या सुमारे १९.३ टक्के आहे. रविवारीही चित्रपट चांगली कामगिरी करू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# कर्करोगाच्या विळख्यात कोमेजते बालपण

**नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

भारतीय मुलांमध्ये कर्करोगाचा धोका झपाट्याने वाढत आहे. दरवर्षी, १५ वर्षांखालील ५० हजार मुले कर्करोगाच्या विळख्यात अडकत असल्याचे एका अहवालातून उघड झाले आहे. प्रदूषण, खाण्याच्या चुकीच्या सवयी यासाठी कारणीभूत ठरत आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेने जारी केलेल्या अहवालातून भारतात वाढत्या कर्करोग रुग्णांच्या आकडेवारीवर चिंता व्यक्त करण्यात आली. कर्करोग हा जगभरातील सर्वात गंभीर आणि प्राणघातक आजार आहे. सामान्यतः असे मानले जाते की हा आजार फक्त तरुण आणि प्रौढांनाच होतो, परंतु बालपणातील कर्करोगाच्या वाढत्या घटना आरोग्य तज्ज्ञांसाठी आव्हाने ठरत आहेत. खराब जीवनशैली, पर्यावरणीय प्रदूषण, खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि अनुवांशिक घटक हे मुलांमध्ये वाढत्या कर्करोगाच्या घटनांसाठी कारण मानले आहे. लहान वयात होणारा कर्करोग केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक आणि सामाजिक विकासावरही परिणाम करत असल्याचे अहवालात नमूद आहे. मुलांमध्ये वाढत्या कर्करोगाच्या दराला रोखण्यासाठी, कर्करोगाने ग्रस्त मुलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना भेडसावणाऱ्या आव्हानांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि आधार देण्यासाठी सरकारने उपाययोजना करावी, अशीही सूचना अहवालातून करण्यात आल्या.

दिल्ली एम्सच्या बालरोग विभागाच्या ऑन्कोलॉजी विभागाच्या प्रमुख डॉ. रचना सेठ यांच्या नेतृत्वाखालील एका अभ्यासात उपचारानंतर पाच वर्षांनी अंदाजे ९५ टक्के मुले पूर्णपणे निरोगी जीवन जगत असल्याचे समोर आले. (वृत्तसंस्था)



**भारतात दरवर्षी ५० हजार मुलांना निदान**

### मुलांमध्ये कोणत्या प्रकारचे कर्करोग आढळतात ?

**अहवालानुसार मुलांना ल्युकेमियाचा सर्वाधिक धोका असतो, ज्यामध्ये तीव्र लिम्फोब्लास्टिक ल्युकेमियाचे सर्वाधिक निदान होत आहे. ल्युकेमिया हा रक्त कर्करोगाचा एक प्रकार आहे जो अस्थिमज्जामध्ये सुरू होतो. मुलांमध्ये दिसणाऱ्या इतर कर्करोगांमध्ये हॉजकिन लिम्फोमा (१२.९ टक्के), रेटिनोब्लास्टोमा (७.४ टक्ते), हाडांचा ट्यूमर (८.४ टक्ते), मूत्रपिंडाचा ट्यूमर (४.६१ टक्के) यांचा समावेश आहे.**

### ल्युकेमिया, लिम्फोमा, ब्रेन ट्यूमरचे सर्वाधिक प्रमाण

**भारतात दरवर्षी ५०,००० हून अधिक नवीन मुलांना कर्करोगाचे निदान होते. आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की मुलांमध्ये कर्करोग हा प्रौढांच्या कर्करोगापेक्षा वेगळा आहे. तो अनेकदा अनपेक्षितपणे आढळतो. ल्युकेमिया, लिम्फोमा आणि ब्रेन ट्यूमर हे मुलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगाचे सर्वाधिक प्रकार आहेत.**

# व्यावसायिकाला ४१ लाखांचा गंडा

**मुंबई, १५ फेब्रुवारी**

तीन महिन्यात लाखोंचा फायदा करून देतो, असे आमिष दाखवत एका भामट्याने व्यावसायिकाला ४१ लाख रूपयांचा गंडा घातला. शिपिंग व्यावसायिक अनिस खान, असे फसगत झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे.

याप्रकरणी अनिस खान यांच्या तक्रारीवरून जे जे मार्ग पोलीस ठाण्यात झाकिरुद्दीन सय्यद, त्यांची मुले शाहबाज सय्यद आणि जबिल सय्यदवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिपिंग व्यावसायिक अनिस खान यांना झाकिरुद्दीन सय्यद आणि त्यांची मुले शाहबाज सय्यद आणि जबिल सय्यद यांनी अनिस खान यांच्याकडून व्यावसायिक कर्जाच्या नावाखाली तब्बल ४१ लाख रुपये घेतले. या बदल्यात २० लाख व्याज देण्याचे आमिष दिले होते. (वृत्तसंस्था)

## पान १ वरुन...

### आठवडाभरात पडणार जिल्ह्यातील...

पंढरपूर तालुक्यातील काही कारखान्यांची धुराडी बंद झाली आहेत. यंदा अतिवृष्टी अन् महापुराने शेतकरी बांधवांसह साखर कारखानदारांचेही मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, गतवर्षी उशिराने बिले अदा केलेल्या साखर कारखान्यांकडे यंदा ऊस उत्पादकांनी पाठ फिरविल्याने त्यांना गाळपासाठी ऊस मिळविताना तारेवरची कसरत करावी लागली.

जिल्ह्यातील १२ सहकारी साखर कारखान्यांमध्ये ६३ लाख ७० हजार ७९६ मेट्रीक टन ऊस गाळप, ५५ लाख ४० हजार ९२५ क्विंटल साखर उत्पादन, ८.७ टक्के साखर उतारा तर खासगी साखर कारखान्यांमध्ये ८७ लाख ९३ हजार ४४८ मे.टन ऊस गाळप आणि ८.८३ टक्के साखर उतारा असे जिल्ह्यातील एकूण ३५ साखर कारखान्यांमध्ये आजतागायत १५१ लाख ६४ हजार २४४ मे. टन उसाचे गाळप, १३३ लाख ०७ हजार २९० क्विंटल साखरेचे उत्पन्न आणि सरासरी ८.७८ टक्के साखर उतारा झाला आहे.

### वजन अन् उतारा घटला

शेवटच्या टप्प्यात गाळपासाठी पुरेसा ऊस उपलब्ध झाले नसल्याने अनेक कारखाने वेळेआधीच बंद पडत आहेत. सोलापूर जिल्ह्यात यंदा उसाचे क्षेत्र जास्त होते. मात्र, उसाला जास्तीचे तुरे आल्याने वजन भरले नाही. उसाच्या फक्त बुडाला जास्तच पाण्याचे प्रमाण होते. यंदा ६ तालुक्यातील नदीकाठच्या उसालाही सीना-भीमा नदीच्या महापुराचा मोठा फटका बसल्याने तोही ऊस गाळपास सापडला नाही. सरासरी साखर उतारा कमी पडल्याने कारखानदारांचेही नुकसान झाले, असे पुणे विभागाचे प्रादेशिक संचालक प्रकाश आष्टेकर यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# सपकाळांचा निषेधार्ह प्रताप

२००७ मध्ये गुजरातमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती. काँग्रेसच्या तत्कालीन अध्यक्षा सोनिया गांधी यांनी पक्षाच्या प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. त्यावेळी सोहराबुद्दीन चकमक आणि गुजरात दंगलीचे मुद्दे प्रचारात जोरात उचलले जात होते. नागरिकांच्या धार्मिक भावना चेतविण्यासाठी आणि अल्पसंख्यकांची मते आपल्या झोळीत पडावीत यासाठी काँग्रेसचे पुढारी भारतीय जनता पक्ष आणि गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका करीत होते. १ डिसेंबर २००७ रोजी गुजरातमधील एका प्रचारसभेत नरेंद्र मोदी यांना, सोनिया गांधी यांनी 'मौत का सौदागर' असे संबोधले. त्यांच्या या वक्तव्यामुळे काँग्रेसचे नेते गदगद झाले. नरेंद्र मोदींचे राजकीय जीवन आता संपलेच समजा, अशा स्वप्नात ते रमले होते. अशा प्रकारची जहाल आणि समाजात भेद निर्माण करणारी विधाने केल्याने आपल्याला राजकीय फायदा होईल, अशी अटकळ काँग्रेस नेत्यांनी बांधली असावी; पण झाले उलटेच! मोदींना 'मौत का सौदागर' संबोधणे काँग्रेसच्या चांगलेच अंगलट आले. सोनिया गांधी यांच्या या विधानाचा फायदा होण्याऐवजी काँग्रेसलाच मोठा फटका बसला. भारतीय जनता पक्ष ११७ जागा घेत पुन्हा सत्तेवर आला तर काँग्रेसला फक्त ५९ जागा मिळाल्या. मोदी पुन्हा एकदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले. मोदींना शिव्याशाप देण्याची ही परंपरा २००७ पासून सुरू झाली, ती हर्षवर्धन सपकाळ यांच्यापर्यंत आजतागायत सुरू आहे. हिंदूंना डिवचणे, त्यांच्या श्रद्धास्थानांचा मुद्दाम अपमान करण्यात काँग्रेसला एक वेगळेच मानसिक समाधान मिळत असल्याचे दिसून येते. बरं, अशी विधाने करणारी नेतेमंडळी काही नवखे कार्यकर्ते नाहीत. सोनिया गांधी, दिग्विजयसिंह, राहुल गांधी, जयराम रमेश, मल्लिकार्जुन खडगे, पृथ्वीराज चव्हाण, हर्षवर्धन सपकाळ हे अनुभवी, ज्येष्ठ आणि मोठ्या पदावरील नेते आहेत. समाज त्यांच्याकडे आशेने पाहतो. पण, याच नेत्यांनी काँग्रेस पक्षाला रसातळाला नेण्याचे काम केले आहे. २०१४ नंतर केंद्रात काँग्रेस पक्ष सातत्याने पराभूत होत आला आहे. पण, हिंदू धर्माला शिव्या देण्यात, हिणवण्यात काँग्रेसचे नेते धन्यता मानत आलेले आहेत. २०१४ नंतर या देशातील राजकीय आणि सामाजिक समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. युवावर्ग जागृत झाला असून हिंदू धर्माला शिव्या देत सत्तेवर येण्याचे दिवस आता संपले आहेत. गुजरात दंगल का घडली, हे सर्वांना माहीत असताना त्यासाठी नरेंद्र मोदींना जबाबदार ठरविण्याचे सारे प्रयत्न काँग्रेसने करून पाहिले. केंद्रात सत्तेवर असताना नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांचे खच्चीकरण करण्याचा कटही आखला गेला होता. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयाने मोदी-शाह यांना सर्वच आरोपातून मुक्त केले.

वास्तविक पाहता कारसेवा करून परत येणाऱ्या रामभक्तांवर गोधरा रेल्वे स्थानकावर हल्ला करून त्यांना जाळून ठार केल्यानंतरची प्रतिक्रिया म्हणजे गुजरात दंगल होती. कारण, गुजरातचा इतिहास पाहता तेथे हिंदू सातत्याने मार खात आला होता. सुरत, अहमदाबाद येथे तर सातत्याने जातीय दंगली व्हायच्या. कारण, दंगलखोरांना काँग्रेस सरकार पाठीशी घालत होते, पण गोधरा जळीत कांड हा हिंदूंच्या संयमाचा अंत होता. दुर्दैवाने काँग्रेस आणि तथाकथित धर्मनिरपेक्षवादी पुढारी गुजरात जातीय दंगलीचा उल्लेख वारंवार करतात; पण गोधरा जळीत कांड सोईस्करपणे विसरतात किंवा त्याचा उल्लेख करायचे टाळतात. काँग्रेसचे वर्तमान अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान मोदींना विषारी साप संबोधले होते. या विधानावर सडकून टीका झाली; पण, भाजपच्या द्वेषाने पछाडलेल्या काँग्रेस नेत्यांवर याचा काहीच फरक पडत नसल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. राफेल लढाऊ विमानाच्या खरेदीवरून पंतप्रधान मोदींवर टीका करताना 'चौकीदार चोर है' असे म्हटल्याबद्दल राहुल गांधी यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले होते आणि त्यांना याबद्दल माफीही मागावी लागली होती. 'काँग्रेसने माझा ९१ वेळा शिवराळ भाषेत उल्लेख केला,' असे खुद्द पंतप्रधान मोदींनी २०२३ मध्ये कर्नाटकमधील एका सभेत सांगितले होते. असाच 'प्रताप' आता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्याबाबतीत अपशब्द उच्चारणे अथवा त्यांची तुलना एखाद्या रक्तपिपासू आणि धर्मवेड्या शासकासोबत करणे कोणताही स्वाभिमानी आणि शिवप्रेमी खपवून घेणार नाही. हे सर्व काही माहीत असताना काही लोक धर्मांध आणि जातीयवादी जगाच्या इतिहासातील सर्वांत क्रूर आणि धर्मवेडा बादशहा औरंगजेब आणि म्हैसूरचा शासक टिपू सुलतानचे उदात्तीकरण करीत असतात याचे आश्चर्य वाटते. मुस्लिमबहुल मालेगाव येथे इस्लाम पार्टी आणि समाजवादी पक्षाने सत्ता स्थापन केली. उपमहापौरांच्या दालनात घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी अथवा अन्य महान विभूतींची छायाचित्रे लावण्याऐवजी मुद्दाम धर्मांध वृत्तीचे प्रदर्शन करीत क्रूरकर्मा म्हैसूरचा शासक टिपू सुलतानचे छायाचित्र लावले गेले. भारतीय जनता पक्षासह हिंदुत्ववादी संघटनांनी टिपूच्या छायाचित्राला विरोध दर्शविला. वाढता विरोध पाहता आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून टिपूचे छायाचित्र हटविण्यात आले. टिपूवरून निर्माण झालेली स्फोटक परिस्थिती निवळत असताना हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपूची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांसोबत करण्याचा करंटेपणा केला. 'शौर्याच्या बाबतीत टिपूला शिवाजी महाराजांच्या बरोबरीने समजले पाहिजे आणि त्याने कोणत्याही विखारी आणि विषारी विचारांना जवळ केले नाही,' असा अफलातून शोध सपकाळांनी लावला. मलबार आणि कुर्ग भागातील हजारो हिंदू नागरिकांना बळजबरीने धर्मांतर करण्यास भाग पाडणारा आणि ज्यांनी नकार दिला त्यांची कत्तल करणारा टिपू सुलतान सपकाळांना कोणत्या मापदंडाने सर्व धर्मीयांचा आदर करणारा शासक वाटत असावा?

साऱ्या समाजाला सोबत घेऊन जाणे आणि सामाजिक सौहार्द जपले जाईल, असे वर्तन आणि व्यवहार करणे हे मोठ्या पदावरील नेत्याकडून अपेक्षित असते. पण, सपकाळ यांना याचे भान राहिले नाही अथवा मुस्लिमांचे लांगूलचालन करण्यासाठी त्यांनी हेतुपूर्वक हे विधान केले असावे. शककर्ते शिवराय आणि हिंदूंची कत्तल करणारा, धर्मपरिवर्तन करणारा टिपू सुलतान यांची कशी बरोबरी होऊ शकते, याची जाण त्यांना नसावी? टिपूने मलबार आणि कुर्ग भागात हजारो हिंदू नागरिकांचे बळजबरीने धर्मांतर केल्याचे ऐतिहासिक पुरावे आहेत. विशेषत: नायर आणि कोडवा या हिंदू समुदायातील हजारो नागरिकांना अटक करून त्यांना श्रीरंगपट्टण येथे आणले आणि त्यांचे बळजबरीने धर्मांतर केले. टिपूचा बाप हैदरअली हा सुद्धा गद्दार होता. म्हैसूरवर वोडियार घराण्यातील राजे राज्य करीत होते. हैदरने बेईमानी आणि दगाबाजीने म्हैसूरचे राजा कृष्णराज वोडियार आणि पंतप्रधानाला कैद करीत सत्ता हस्तगत केली होती. अशा या बेईमान आणि तुच्छ सरदाराचा टिपू हा पुत्र होता. त्यामुळे, टिनपाट, धर्मांध, क्रूर आणि रक्तपिपासू टिपूची तुलना शिवरायांसोबत करून सपकाळांनी काँग्रेसवाले राजकारण आणि मतांसाठी किती खालच्या पातळीला जाऊ शकतात, हे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याचे संतप्त पडसाद राज्यभर उमटत आहेत. शिवप्रेमी संतप्त झाले असून राज्यात ठिकठिकाणी सपकाळांविरोधात आंदोलन सुरू झाले आहे. एवढे होऊनही सपकाळ महाशय यांनी अजूनही माफी मागितली नाही किंवा साधा खेदही व्यक्त केला नाही. उलट, माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनीही शिवरायांचा अवमान केल्याचे उदाहरण देत, मीच कसा बरोबर आहे, हे सांगण्याचा प्रयत्न सपकाळ करीत आहेत. सपकाळांचा हा प्रताप हिंदू समाजाने अजिबात सहन करू नये. काँग्रेस प्रदेशाध्यक्षाच्या या कृतीचा जेवढा निषेध करावा तेवढा कमीच आहे. तो जितका जोरात होईल, तेवढी अशा पिलावळीची हिंमत खचेल, हे समस्त हिंदू समाजाने लक्षात ठेवले पाहिजे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# रणकंदन - एका पुस्तकावरून!

'फोर स्टार डेस्टिनी' या एका पुस्तकावरून लोकसभेत रणकंदन झाले. प्रकरण लोकसभा सभापतींवर अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यापर्यंत गेले. हे सारे अनावश्यक होते. हे पुस्तक अद्याप प्रसिद्ध झालेले नाही. एका साप्ताहिकाने त्यातील काही अंश प्रसिद्ध केले आहेत. यापूर्वीही ते प्रसिद्ध झाले आहेत. त्यामुळे या पुस्तकाबाबत पुन्हा झालेला वाद वा वादंग खरोखरीच अनाकलनीय आहे. पुस्तकातील काही अंश समाज माध्यमांवर सांगितले जात आहेत. दिल्ली पोलिसांनी याबाबत एफआयआर नोंदविला आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या पुस्तकाची डिजिटल आवृत्ती साऱ्या जगात यापूर्वीच प्रसारित झाली आहे. दुसरीकडे पुस्तकाचे प्रकाशन करणाऱ्या 'पेंग्विन इंडिया'ने याबाबत खुलासा करून हे अंश आमच्याजवळ असलेल्या मजकुरातील नसल्याचे म्हटले आहे. प्रत्येक युद्धाचा इतिहास लिहिला जातो. पुस्तकांच्या माध्यमातूनच लिहिला जातो. त्यात चुकीचे असे काहीच नाही. यातून नवनवी माहिती समोर येत असते आणि नवा धडाही शिकला जात असतो.

**पहिल्या युद्धाचा ताळेबंद** : भारत-पाकिस्तान यांच्यात १९४७-४८ मध्ये झालेल्या पहिल्या युद्धाचा इतिहास तर सरकारी दस्तावेजातच लिहिण्यात आला आहे. त्यात भारताला कोणत्या भागात यश मिळाले, कुठे अपयश मिळाले याची माहिती देण्यात आली आहे. पाकिस्तानातील कोटली व मीरपूर यांना जोडणारा झांजड भाग भारताने कसा गमावला याचे सविस्तर वर्णन सरकारी दस्तावेजात करण्यात आले आहे. पाकिस्तानने कसा शर्थीचा लढा देत हा भाग जिंकला याची ती कथा आहे. यात लपविण्यासारखे काहीच नव्हते.

**प्रधान यांचे पुस्तक** : माजी सरंक्षण मंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचे खाजगी सचिव राम प्रधान यांनी चव्हाण यांनी युद्धकाळात लिहिलेल्या डायरीचा आधार घेत, '१९६५ वॉर द इनसाईड स्टोरी' हे पुस्तक लिहिले. त्यात १९६५ चे युद्ध पंतप्रधानांच्या संमतीशिवाय सुरू झाल्याची माहिती देण्यात आली आहे. पंतप्रधानांच्या संमतीविना सुरू झालेले हे बहुधा एकच युद्ध असावे. हा केवढा मोठा खुलासा आहे.

**हरबक्षसिंग यांचे गौप्यस्फोट** : १९६५ च्या युद्धाबाबत लेफ्ट. जनरल हरबक्षसिंग यांनी, 'इन द लाईन ऑफ ड्युटी' हे फार सुंदर पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांनी अनेक गौप्यस्फोट केले आहेत. यात एक रोचक प्रसंग सांगण्यात आला आहे. ते लिहितात, मी एका वरिष्ठ अधिकाऱ्यास भेटावयास गेलो. मी खुर्चीत बसण्यापूर्वी त्यांनी मला विचारले, ''तुम्ही स्वत:ला राष्ट्रपती वगैरे समजता काय?'' त्यांचा दुसरा प्रश्न होता, ''तुम्हाला तुमच्या वाहनावर लाल दिवा लावून फिरण्याची हौस आहे काय?'' वरिष्ठ लष्करी अधिकारी आपल्या कनिष्ठाशी कसे वागतात हे सांगण्याचा प्रयत्न हरबक्षसिंग यांनी केला होता. १९६५ च्या युद्धकाळात जनरल चौधरी हे लष्करप्रमुख होते, पण भारत हे युद्ध जिंकला त्यात सिंहाचा वाटा लेफ्ट. हरबक्षसिंग यांचा होता हे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते. त्यात अनेक किस्से- कहाण्या सांगण्यात आल्या आहेत. जनरल नरवणे यांच्या पुस्तकात जे सांगण्यात आले आहे, त्यापेक्षा अधिक गंभीर माहिती हरबक्षसिंग यांच्या पुस्तकात १९६५ च्या युद्धाबाबत देण्यात आली आहे.

**हिमालयन ब्लँडर** : १९६२ च्या भारत-चीन युद्धाबाबत ब्रिगेडियर दळवी यांनी लिहिलेले 'हिमालयन ब्लँडर' हे पुस्तक तर बॉम्बपेक्षा कमी नाही, एवढी स्फोटक माहिती त्यात देण्यात आली आहे. १९६२ च्या युद्धासाठी भारतीय लष्कर कसे तयार नव्हते, लष्करी अधिकारी कशा चुका करीत होते याचे सविस्तर वर्णन या गाजलेल्या पुस्तकात करण्यात आले आहे. त्याकाळात, बहुधा हे सर्वाधिक खपाचे पुस्तक ठरले असावे.

**सरेंडर ॲट ढाका** : १९७१ च्या युद्धाबाबत लेफ्ट. जनरल जेकब यांनी 'सरेंडर ॲट ढाका' हे पुस्तक लिहीत त्यात त्यांनी मोठा गौप्यसफोट केला आहे. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना १९७१च्या एप्रिल महिन्यात लष्करी कारवाई हवी होती. पण, तत्कालीन लष्करप्रमुख जनरल माणेकशॉ यास कसे तयार नव्हते याचा तपशील पुस्तकात देण्यात आला आहे. तत्कालीन सरंक्षण मंत्री जगजीवनराम यांनी माणेकशॉ यांना राजी करण्याचा प्रयत्न केला. पण, माणेकशॉ तयार झाले नाहीत. अखेर इंदिरा गांधींनी माघार घेत, जनरल माणेकशॉ यांना त्यांचे वेळापत्रक ठरविण्याचा अधिकार दिला आणि डिसेंबर महिन्यात युद्ध झाले. हा सारा तपशील या पुस्तकात देण्यात आला आहे. केंद्रात वाजपेयी सरकार आल्यानंतर जनरल जेकब यांना राज्यपाल नियुक्त करण्यात आले होते.

**कारगिल युद्ध** : १९९९ च्या कारगिल युद्धाबाबत तत्कालीन लष्करप्रमुख जनरल वेद मलिक यांनीही आपल्या आठवणी एका पुस्तकात शब्दबद्ध केल्या आहेत. 'कारगिल : फ्रॉम सरप्राईज टू व्हिक्टरी' या पुस्तकात जनरल मलिक यांनीही धक्कादायक खुलासे केले आहेत. कारगिल कारवाई सुरू झाली २६ मे रोजी. पण, तीन महिने अगोदर २१ व २२ फेब्रुवारी रोजी तत्कालीन सरंक्षण मंत्री जार्ज फर्नांडिस व गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी हे आपल्याला कसे वारंवार दूरध्वनी करून माहिती घेत होते हे त्यांनी नमूद केले आहे. युद्धाच्या दुसऱ्या दिवशी २७ मे रोजी भारताने दोन मिग विमाने गमावली तर नंतरच्या दिवशी एक हेलिकॉप्टर गमावले. हा भारतासाठी मोठा धक्का होता हेही जनरल मलिक यांच्या पुस्तकात लिहिण्यात आले आहे.

**गल्वानचा संघर्ष** : जनरल नरवणे यांनी आपल्या पुस्तकात गल्वान संघर्षाबद्दल लिहिले असल्याचे म्हटले जाते. हे संपूर्ण पुस्तक काही गल्वान संघर्षावर नाही. जनरल नरवणे यांनी आपल्या एकूणच लष्करी जीवनावर ते लिहिले आहे. अशा पुस्तकांना सरंक्षण मंत्रालयाची हिरवी झेंडी आवश्यक असते आणि ते बरोबरही आहे. जनरल नरवणे यांनी आपल्या पुस्तकाचा मसुदा मंजुरीसाठी अगोदरच सादर केलेला आहे. त्यास मंजुरी मिळाल्यावर हे पुस्तक रीतसर प्रसिद्ध होईल. पण, त्यापूर्वीच त्यावर वादंग होत, त्याला प्रसिद्धी मिळत आहे. काही पुस्तके प्रसिद्ध झाल्यावर 'प्रसिद्ध' होतात. जनरल नरवणे यांच्या पुस्तकाला प्रसिद्धीपूर्वीच प्रसिद्धी मिळत आहे.

**केवळ प्रसिद्धितंत्र?** : जनरल नरवणे यांच्या पुस्तकात तसा काहीही 'दम' नाही. पण, पुस्तक अद्याप प्रसिद्ध झालेले नाही याचाच फायदा उठविला जात आहे असे दिसते. सरंक्षण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनास एकदाची परवानगी देऊन टाकावी म्हणजे जनरल नरवणे यांनी काय लिहिले आहे ते सर्वांसमोर येईल.

**मात्र इतिहास...** : सरंक्षण मंत्रालयातील 'बाबू' हे होऊ देतील काय? जनरल हरबक्षसिंग यांनी सेवानिवृत्त झाल्यावर १९६५ च्या युद्धाबाबत 'वॉर डिस्पॅसेच' या शीषर्काचे दोन खंड लिहून काढले. ते त्यांनी स्वत: सरंक्षणमंत्री जगजीवनराम यांना दिले. लष्करातील नवोदित अधिकाऱ्यांना याचा फायदा व्हावा या उदात्त हेतूने त्यांनी हे केले होते. २५ वर्ष त्यावर काहीच कारवाई झाली नाही. नंतर हरबक्षसिंग यांनी आणखी एक सरंक्षणमंत्री कृष्णचंद्र पंत यांची भेट घेत त्यांना याची आठवण करून दिली. पंत यांनी याबाबत लवकर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. सरंक्षण मंत्र्यांची भेट घेऊन परतताना हरबक्षसिंग यांनी मंत्रालयातील एका सचिवाची भेट घेऊन त्याला स्पष्ट सांगितले, ''मंत्रालयाने याबाबत १५ दिवसांत निर्णय न केल्यास, मी ते स्वत: प्रसिद्ध करेन.'' अपेक्षेप्रमाणे १५ दिवसांत त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. अखेर हरबक्षसिंग यांनी स्वत: ते खंड प्रसिद्ध केले. जनरल नरवणे यांच्या पुस्तकाच्या बाबतीत याचीच पुनरावृत्ती होईल काय? कारण, सरंक्षण मंत्रालयातील बाबू मंडळींनी नवीन नियम करण्याचे ठरविले आहे. त्यास भरपूर वेळ लागणार आहे आणि काळ तर थांबत नसतो.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# सूर्यग्रहण आणि धार्मिक मान्यता

चंद्र अथवा सूर्याला ग्रहण लागणे या खगोलीय घटना असतात. परंतु, ग्रहणांबाबत काही धार्मिक मान्यतासुद्धा आहेत. जीवसृष्टी पंचतत्त्वांनी बनलेली आहे. त्यामुळे ग्रहणांचा परिणाम जीवसृष्टीवर होतो. २०२६ मध्ये दोन सूर्यग्रहणे आणि दोन चंद्रग्रहणे अनुभवता येणार आहे. यातील तीन ग्रहणे भारतातून दिसणार नसली तरी ३ मार्च रोजीचे खग्रास चंद्रग्रहण आपल्याला पाहता येणार आहे. सूर्यग्रहण उघड्या डोळ्यांनी पाहिल्याने दृष्टी गेल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे आवश्यक सुविधा आणि तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय ग्रहण उघड्या डोळ्यांनी पाहू नये. १७ फेब्रुवारी रोजी यंदाचे पहिले सूर्यग्रहण लागणार आहे. ही एक खगोलीय घटना असली तरी हिंदू धर्मात अशा घटनेला राहू-केतुमुळे निर्माण होणारी अशुभ घटना मानले जाते. या काळात अन्न आणि पाणी ग्रहण अथवा कुठलेही शुभकार्य वर्ज्य असते. कारण, ग्रहण काळात नकारात्मक ऊर्जेचा संचार होतो, अशी धार्मिक मान्यता आहे. या काळात मंदिरे बंद ठेवली जातात. परंतु, १७ फेब्रुवारीचे सूर्यग्रहण भारतात दिसणार नसल्याने वेधादी नियम पाळण्याची गरज नसल्याचे अभ्यासकांनी स्पष्ट केलेले आहेत. जेव्हा पृथ्वी आणि सूर्याच्या अगदी मधोमध चंद्र येतो तेव्हा सूर्याला ग्रहण लागते. ही घटना अमावास्येला घडते. सूर्य, चंद्र आणि पृथ्वी एका रेषेत आल्याने सूर्य झाकला जातो आणि याच घटनेला सूर्यग्रहण म्हणून ओळखले जाते. जेव्हा पृथ्वीची सावली चंद्रावर पडते तेव्हा चंद्राला ग्रहण लागते.



भारतात अशा घटनांना धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. या काळात मंत्रजप, ध्यान किंवा दानधर्म केला जातो. सूर्यग्रहणाच्या काळात झोप घेणे निषिद्ध मानले जाते. कारण, या काळात वातावरणात हानिकारक किरणे पसरतात. ग्रहणकाळात झोप घेतल्याने पचनसंस्था बिघडण्याची शक्यता असते.

२०२६ मध्ये एकूण चार ग्रहणे लागतील. यात दोन सूर्यग्रहणे तर दोन चंद्रग्रहणांचा समावेश आहे. १७ फेब्रुवारी रोजी लागणारे सूर्यग्रहण रिंग ऑफ फायर अर्थात कंकणाकृती स्वरूपाचे असेल. हे सूर्यग्रहण प्रामुख्याने अंटार्टिका, दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण भागात दिसेल. हे सूर्यग्रहण दुपारी ३.२६ वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ७.५७ पर्यंत त्याचा प्रभाव राहील. त्यानंतर ३ मार्च रोजी चंद्रग्रहण आहे. हे चंद्रग्रहण खग्रास स्वरूपाचे अर्थातच पूर्ण चंद्राला लागेल. हे चंद्रग्रहण भारतात दिसणार असून सायंकाळी ६.२७ सुरू होईल आणि त्याचा प्रभाव ७.५३ वाजेपर्यंत राहील. हे ग्रहण फाल्गुन पौर्णिमेच्या औचित्यावर येत असल्याने होळी साजरी करण्यासाठी पंचांगाचा आधार घेण्याबाबत जाणकारांकडून सांगितले जात आहे. यानंतर १२ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा सूर्याला ग्रहण लागणार आहे. हे सूर्यग्रहण खग्रास स्वरूपाचे असल्याने संपूर्ण सूर्य झाकला जाईल. हे सूर्यग्रहण भारतात दिसणार नसल्याने वेधादी नियम पाळण्याची गरज नाही. त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी यंदाचे दुसरे चंद्रग्रहण लागेल. हे ग्रहण खंडग्रास स्वरूपाचे असून ते अमेरिका, आफ्रिका आणि युरोपात दिसेल. खरे तर ब्रह्मांडात अशा असंख्य घटना रोजच घडतात. परंतु, मनुष्य जगताशी त्यांचा संबंध येत नाही. आपण ज्या आकाशगंगेत राहतो तिला मिल्की वे अर्थातच मंदाकिनी म्हणून ओळखले जाते आणि आपल्या आकाशगंगेचा व्याप १ लाख प्रकाश वर्षे अंतरात आहे. १ लाख प्रकाश वर्षे म्हणजे प्रकाश १ लाख वर्षात जितका प्रवास करेल, तितके अंतर होय. प्रकाशाचा वेग प्रतिसेकंद ३ लाख किलोमीटर इतका आहे. सूर्य पृथ्वीपासून १४ कोटी ९६ लाख किलोमीटर अंतरावर आहे. व्यासाचा विचार केला तर सूर्य पृथ्वीपेक्षा १०९ पट मोठा आहे आणि त्यात १३ लाख पृथ्वी सामावू शकतात. सूर्यमालेच्या एकूण वस्तुमानापैकी एकट्या सूर्याचे वस्तुमान तब्बल ९९.८६ टक्के इतके आहे आणि तरीही चंद्रासारखा किरकोळ ग्रह आडवा आल्याने सूर्याला ग्रहण लागते! खरे तर सूर्याला ग्रहण लागतच नाही! फक्त चंद्र आडवा आल्याने सूर्य आपल्याला दिसत नाही, एवढीच ही खगोलीय घटना असते. आपल्या सूर्यमालेत बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरू, शनी, युरेनस, नेपच्युन असे एकूण आठ प्रमुख ग्रह आणि अनेक उपग्रह आहेत. प्लुटोला २००६ पूर्वी नववा ग्रह मानले जात होते. परंतु, त्याला शास्त्रज्ञांनी आता बटू ग्रह म्हणून वर्गीकृत केले आहे. ग्रहण फक्त पृथ्वीवरच अनुभवास येत नाही. तर ज्या मुख्य ग्रहांचे चंद्र ठरावीक कालावधीत सूर्यासमोर येतात तेव्हा त्या ग्रहांवरूनसुद्धा ग्रहणाचा अनुभव येतो. ब्रह्मांड गतिमान असल्याने या घटना घडतात आणि अशा घटनांचे जीवसृष्टीत मोठे योगदान आहे.

९८८१७१६०२७

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# शेवटी मदांध तख्त फोडते मराठी...!

८ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. समाज माध्यम, पत्रकारिता, कलाकार इत्यादी मान्यवरांनी सरसंघचालकांना प्रश्न विचारले आणि त्या प्रश्नांवर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी उत्तम मार्गदर्शन केले. १९२५ साली स्थापन झालेली एक संघटना, या संघटनेने १०० वर्षे पूर्ण केलीत. या १०० वर्षांच्या कालावधीत काही वेळा बंदीचे सावट आले, प्रचंड टीका झाली. लोकशाही मूल्यांचे पालन करीत असतानाही लोकशाहीविरोधी, संविधानविरोधी असे आरोप झालेत. अनेक स्वयंसेवकांच्या जिवावर बेतेल असे प्रसंग आले. केरळमधील परिस्थिती सर्वांच्याच परिचित आहे. देशाच्या आपत्तीमध्ये सर्वांत प्रथम उपस्थिती लावूनही थट्टेचा सामना करावा लागला आणि इतकं सगळं होऊनही या संघटनेने अधिकृतपणे कोणाविरुद्ध कारवाई केली नाही किंवा साधी टीकाही केली नाही. इतक्या प्रचंड प्रतिकूल परिस्थितीतून १०० वर्षे पूर्ण करणे हे अग्निपरीक्षा देण्यापेक्षा काही कमी नव्हते. अशा परिस्थितीत कुणी संघाचे विरोधक जरी असले, तरी या सर्व गोष्टींचा विचार करायला हवा. या सामाजिक संघटनेविषयी तरुणांमध्ये इतके आकर्षण का आहे? याचाही विचार व्हायला हवा. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट, संघाची स्थापना महाराष्ट्राच्या भूमीत झाली. ज्यावेळी भारतभर ग्लानी पसरली होती, परकीय आक्रमकांनी हैदोस माजवला होता, जिहादी अतिरेकी प्रवृत्तीचं प्राबल्य वाढत होतं, त्यावेळी मराठी मातीने आपलं तिसरं नेत्र उघडलं... १५-१६ वर्षांच्या एका कोवळ्या मुलाने हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याची शपथ घेतली आणि पुढे त्या महामानवाने स्वराज्य स्थापन करून दाखवलं. परकीय आक्रमकांच्या विरोधात अनेक लोक लढतच होते. कुठे ना कुठे उठाव होतंच होता. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी माणसामध्ये एक विश्वास निर्माण केला. ही भूमी आपली आहे, हिंदूंची आहे. इथे हिंदूंचे राज्य असले पाहिजे. स्वराज्य असले पाहिजे.

पुढे मराठ्यांनी भारतावर भगवा फडकवला. जिथे जिथे मराठ्यांची सत्ता होती, तो भाग आज भारत म्हणून ओळखला जातो. ही मराठी माणसाची ताकद आहे. हिंदुत्वाचं काय होणार असा प्रश्न जेव्हा जेव्हा निर्माण झाला, तेव्हा तेव्हा मराठी माणूस तलवार घेऊन सर्वांत आधी आणि सर्वांत पुढे गेला आहे. पण ज्या मराठी माणसांनी ग्लानीत असलेल्या भारताला जागं केलं, त्याच मराठी माणसाला ग्लानी आली होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांनंतर असा एकही मोठा मराठी नेता झाला नाही, ज्याने मराठी माणसाला योग्य मार्गदर्शन केले असेल. स्वातंत्र्य चळवळीचं नेतृत्व मराठी माणसाने केलं होतं. मग ही ग्लानी का आली? भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषिक राज्यांनुसार भारताची रचना झाली तेव्हा महाराष्ट्रापासून मुंबईला तोडण्याचा कट काँग्रेसने रचला. नेहरू हे मराठीद्वेष्टे होते, असं काही जणांचं मत आहे. पण मराठी माणसाने नेहरूंच्या विरुद्ध उठाव करून मुंबई मिळवलीच. त्यासाठी १०५ हुतात्म्यांना बलिदान द्यावे लागले. त्यानंतर मराठी राजकारण्यांनी मुंबई केंद्र ठेवून महाराष्ट्राचं राजकारण केलं. काही राजकारण्यांना मुंबईच्या समस्या या सबंध महाराष्ट्राच्या समस्या वाटू लागल्या. त्यातूनच मुळातच समृद्ध असलेल्या मराठी भाषेबाबत भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. कदाचित या गोष्टी मुद्दाम केल्या गेल्या नसतील, पण न्यूनगंडातून त्या झाल्या असतील. या सर्व गोष्टींची आठवण काढण्याची दोन कारणं आहेत. एक, संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमावर स्वत:ला आधी मराठी हृदयसम्राट म्हणून घोषित केलेले नंतर हिंदुजननायकमध्ये बदली झालेले व तिथून काही प्राप्त न झाल्याने आता पुन्हा मराठी हृदयसम्राट झालेले राज ठाकरे यांनी टीका केली आहे. भविष्यात ते कोणत्या प्रकारचे हृदयसम्राट किंवा जननायक होतील, याची आत्ताच शाश्वती देता येत नसली, तरी सध्या आपण त्यांच्या सन्मानार्थ मराठी हृदयसम्राटच मानू. बरं, ते मराठी हृदयसम्राट का आहेत, तर ते जावेद अख्तर व इतर मराठी न येणाऱ्या बॉलिवूड कलाकारांसोबत वावरतात आणि अधूनमधून ते मराठीचे मुद्दे उपस्थित करीत असतात. त्यांचे कार्यकर्ते यूपी-बिहारमधल्या लोकांना मारहाण करतात, त्यांच्यावर टीका करणाऱ्या अस्सल मराठी मुलांनाही मारहाण करतात. कारण तेच मराठीचे तारणहार असल्याने त्यांच्यावर केलेली टीका ही मराठीवर केलेली टीका असे गृहीत धरून त्यांचे कार्यकर्ते झुंडीने जाऊन एका नि:शस्त्र व्यक्तीला बेसावध असताना मारतात. हा त्यांच्या दृष्टीने फार मोठा पराक्रम होय! या अशा अनेक सद्गुणांसाठी ते मराठी हृदयसम्राट आहेत. असो. तर या मराठी हृदयसम्राटांनी सरसंघचालकांवर टीका केली. याच कार्यक्रमात सरसंघचालकांनी मातृभाषेबद्दल भाष्य केले. संघ मातृभाषेविषयी आग्रही आहे, असे स्पष्ट केले. इंग्रजीचा द्वेष नाही, जिथे जिथे इंग्रजीची आवश्यकता आहे, तिथे तिचा वापर अस्खलित करायचा. पण संघाची भूमिका भारतीय भाषांविषयी आहे, हे त्यांनी स्पष्ट केल्यानंतर मराठी हृदयसम्राटांनी टीका करण्याचे काहीच कारण नव्हते. कदाचित त्यांनी तेवढीच क्लिप बघितली असावी. असो.

या गोष्टी आठवण्याचं दुसरं कारण म्हणजे, २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन आहे. १९६० ला महाराष्ट्राची नव्याने निर्मिती झाली. या ६६ वर्षांत बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत. मराठी शाळा आता दुर्मिळ होऊ लागल्या आहेत. आपल्याला मराठी भाषेविषयी आग्रही राहायचे आहे, म्हणजे नेमके काय करायचे आहे? तर, सर्वांत आधी प्राधान्य मराठीला द्यायचे आहे. मराठी शाळांना प्राधान्य द्यायला हवे. त्यानंतर आपण आवर्जून मराठी बोललं पाहिजे. मुलांना मराठी पुस्तके वाचायला लावली पाहिजेत, ऑडिओ पुस्तके ऐकायला लावली पाहिजेत. सोसायटींमध्ये मराठीविषयक कार्यक्रम आयोजित झाले पाहिजेत. दुसरी गोष्ट, मराठी तरुणांनी आंदोलनांपासून दूर राहिलं पाहिजे आणि स्वत:ची प्रगती साध्य केली पाहिजे. नोकरी, उद्योग, स्वयंरोजगार यावर लक्ष केंद्रित केलं पाहिजे. सरकारी नोकरीतही टक्का कसा वाढेल याकडे लक्ष दिलं पाहिजे. त्यामुळे सौम्य वाटणाऱ्?या अशा अनेक गोष्टी आहेत, ज्याद्वारे मराठी भाषेचे जतन करता येईल आणि मराठी संस्कृतीही जपता येईल.

मराठी माणसाला राजकारणाचं खूप वेड आहे. सर्वांत आधी तो पक्षाचा झेंडा खाली ठेवून छत्रपतींचा भगवा झेंडा हाती घेतला पाहिजे. म्हणजे स्वकर्तृत्वाने जग काबीज करण्याचं ध्येय हाती घेतलं पाहिजे. 'साहेब' इत्यादी लोकांपासून चार हात लांब राहिलं पाहिजे. काही मोजके लोक सोडले तर बहुसंख्य मराठी माणूस हुशारच आहे. म्हणूनच मदांध झालेल्या लोकांना मराठी माणसाने महाराष्ट्रभरात विविध निवडणुकींत त्यांची जागा दाखवून दिली आहे. मदांध तख्त मराठी माणसाने फोडलं आहे. महाराष्ट्रात स्थापन झालेल्या संघटनेने १०० वर्षे पूर्ण केली आहेत. आज हे संघटन केवळ देशभरात नव्हे तर जगभरात पसरले आहे. ही मराठी माणसाची ताकद आहे.

writerjayeshmestry@gmail.com

### नागपूरहून सिंगापूर, बँकॉक विमान सेवा सुरू व्हावी


केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील रिकार्पेटिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर आता नागपूर ते सिंगापूर, बँकॉक आणि क्वालालम्पूर थेट विमान सेवा सुरू करण्याची मागणी संदर्भात पत्र दिले आहे. प्रमुख आंतरराष्ट्रीय स्थळांसाठी थेट विमानसेवा सुरू करण्याची विनंती असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी केली होती. तसेच याबद्दल सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याने आगामी काळात नागपुरातून विमान सेवा सुरू होण्याची दाट शक्यता आहे. मध्यवर्ती औद्योगिक केंद्र म्हणून नागपूर एक महत्त्वाचे व्यवसाय आणि वेगाने उदयास येत असलेले शहर झाले आहे. टीसीएस, पर्सिस्टंट सिस्टिम्स, ग्लोबल लॉजिक टेक्नॉलॉजी, टेक महिंद्रा, एक्सेंचर, इन्फोसिस आणि इन्फोसेप्ट्स यासारख्या प्रमुख आयटी कंपन्यांनी नागपुरात युनिट सुरू केल्याने, हवाई कनेक्टिव्हिटी वाढण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

नागपुरात ७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत असल्याने आगामी काळात पेर्नोड रिकार्ड, अवाडा ग्रुप आणि कोरियन ग्रुपसारख्या जागतिक कंपन्यांचे जाळे वाढणार आहे. विमान प्रवासी संख्या वाढत असल्याने देशांतर्गत कनेक्टिव्हिटी सुधारण्याची गरज निर्माण झाली आहे. याच बरोबर इंडोनेशियातील बाली या टुरिस्ट प्लेससाठीही नागपूरहून थेट विमानसेवा सुरू करण्यात यावी. नागपूरवरून बालीला जाण्यासाठी सिंगापूर, बँकॉक किंवा क्वालालम्पूरला जाऊन नंतर बालीला विमानसेवा उपलब्ध आहे. तसेच अमेरिकेला जाण्याकरिता नागपूरहून पहिले दोहाला विमानाने जाऊन नंतर दोह्याहून अमेरिकेला जावे लागत आहे. आता नागपूर येथील धावपट्टीच्या पुनर्बांधणीचे काम पूर्ण झालेले असल्यामुळे ते कोणतेही निर्बंध राहिलेले नाही. त्यामुळे कनेक्टिव्हिटी सुधारण्याची गरज निर्माण झाली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागरी विमान वाहतूक मंत्र्यांना दिलेल्या पत्रानुसार नागपूरहून सिंगापूर, बँकॉक, क्वालालम्पूर, बाली व अमेरिका येथे थेट विमान सेवा सुरू व्हावी, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

### देशभक्ती जागवणारा 'वंदे मातरम्'चा निर्णय स्वागतार्ह



भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने 'वंदे मातरम्' या देशभक्तिपर गीताबाबत घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. हा निर्णय देशाचा अभिमान वाढवणारा असून जनतेमध्ये राष्ट्रप्रेम आणि देशभक्ती अधिक दृढ करणारा ठरेल. स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारकांचा घोष मंत्र म्हणजे 'वंदे मातरम्.' या गीतामुळे अनेकांच्या मनात मातृभूमीप्रेम जागृत झाले आणि त्यांनी देशासाठी बलिदान दिले. स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षांनंतर या गीताला योग्य तो मान मिळाला, ही आनंदाची बाब आहे. केंद्र शासनाने शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि सरकारी कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत 'जन गण मन' पूर्वी 'वंदे मातरम्' म्हणणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये देशाविषयी आदर आणि प्रेम अधिक वाढेल, यात शंका नाही. या राष्ट्रहिताच्या निर्णयाबद्दल भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचे मन:पूर्वक अभिनंदन! वंदे मातरम्!

**रमा देशमुख**/नागपूर

### 'गरज, नाईलाज की अपरिहार्यता?' योग्य मूल्यमापन

'गरज, नाईलाज की अपरिहार्यता?' हा 'रोखठोक'मधील लेख महाराष्ट्रातील आजच्या राजकीय परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करतो. भारतातील सर्वांत जुना पक्ष काँग्रेसही अनेकदा फुटला आणि आता खरा काँग्रेस पक्ष म्हणजे काँग्रेस (आय) हाच आहे कारण इतर विभागलेले एक तर अस्तंगत झाले वा विलीन झाले आहेत. त्याच धर्तीवर जनता पक्ष स्थापन झाला. त्याची शकले झाली. जनता पक्षातून बाहेर पडल्यावर भाजपा स्थापन करून आता सलग गेली १२ वर्षे केंद्रात व अनेक राज्यांत सत्तेत आहे, पण या भाजपने सुद्धा लोकसभेत २ ही संख्या पाहिली आहे आणि स्वत:च्या कार्यपद्धतीत बदल करत आजचा भाजप दिसतो आहे. आवश्यक तिथे प्रादेशिक पक्षांशी युती, त्यांना सत्तेत प्रामाणिकपणे वाटा देऊन यश बघितले आहे. पण काँग्रेस काय वा आता प्रादेशिक झालेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काय घराणेशाही जोपासण्याच्या प्रयत्नात मागे पडले आहेत. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणात तर निव्वळ अपरिहार्यता भरून राहिलेली आहे. काँग्रेस पक्षाला योग्य नेताच नसल्याने पक्षाची फरपट चालली आहे. महाराष्ट्र त्याला अपवाद नाही. जोपर्यंत अपरिहार्य होत नाही तोपर्यंत ना मित्र टिकत ना राजकीय पक्ष, विलीनीकरण ही फक्त मलमपट्टी असते.

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### भारतीय महिला संघाचा पाकिस्तानवर विजय

**बँकॉक** : येथील टेर्डथाई क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या महिला आशिया चषक रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेत गट अ सामन्यात रविवारी भारत अ महिला संघाने पाकिस्तान अ संघावर ८ गड्यांनी पराभव केला. पाकिस्तान अ संघाला १८.५ षटकांत ९३ धावांत गुंडाळल्यानंतर भारत अ संघाने केवळ १०.१ षटकांत हे माफक लक्ष्य पूर्ण केले. उजव्या हाताची सलामीवीर वृंदा दिनेशने २९ चेंडूत ५५ धावा फटकावल्या आणि भारत अ संघाचा पाठलाग सुरू केला. साईमा ठाकोर (२-१४), कर्णधार राधा यादव (२-११) आणि प्रेमा रावतने (२-१६) आपापसात सहा बळी घेऊन गतविजेत्या संघाला या स्पर्धेतील पहिला विजय मिळवून देण्यासाठी पाया रचला. भारत अ संघाकडून मिन्नू मणी आणि जिंतीमणी कलितानेही प्रत्येकी एक बळी घेतला. अनुष्का नवव्या षटकात २४ धावांवर बाद झाली असली तरी, वृंदा पुढे सरकली आणि २५ चेंडूत तिने १२ चौकार ठोकले आणि त्यानंतर नवव्या षटकात डावखुरी फिरकी गोलंदाज मोमिना रियासतने तिला बाद केले. तेजल हसबनीसने भारत अ संघासाठी अनुक्रमे एक षट्कार आणि चौकार मारत शानदार विजय मिळवला. त्यांनी ५९ चेंडू शिल्लक असताना लक्ष्य पूर्ण केले.

### चांगली गोलंदाजी करण्याचा प्रयत्न करतोय् : जेसन होल्डर

**मुंबई** : मी केवळ स्वतःलाही अंदाज लावता येणार नाही अशी गोलंदाजी करण्याचा प्रयत्न करीत आहो, असे वेस्ट इंडीजचा वरिष्ठ वेगवान गोलंदाज जेसन होल्डर म्हणाला. रविवारी टी-२० विश्वचषकाच्या सामन्यात होल्डरने सर्वोत्तम गोलंदाजी केली. या स्पर्धेत तीन सामन्यांत सात बळी घेणाऱ्या ३४ वर्षीय होल्डरने २७ धावांत ४ बळींसह वेस्ट इंडीजला नेपाळवर नऊ गड्यांनी सहज विजय मिळवून दिला. मी कोन बदलण्याचा प्रयत्न करतो, माझ्यासाठी, ते फक्त जास्त अंदाज लावता येणार नाही असा प्रयत्न करत आहे. मी केवळ क्रीजवरील पोझिशन्स बदलत आहे आणि काही अधिक यॉर्कर टाकण्याचा प्रयत्न करत आहे,'' होल्डर सामन्यानंतरच्या सादरीकरणात म्हणाला.

### गुलवीर तिसऱ्या क्रमांकाचा सर्वांत वेगवान धावपटू

**विन्स्टन-सालेम** : येथे आयोजित साउंड इनव्हाईट या जागतिक ॲथलेटिक्स इनडोअर टूर रौप्य-स्तरीय स्पर्धेत भारताच्या गुलवीर सिंगने पुरुषांच्या ५००० मीटर शर्यतीत १३:१५.८४ वेळ नोंदवित तिसरे स्थान पटकावले आणि भारतीय लांब पल्ल्याच्या धावपटूच्या हंगामाच्या सुरुवातीच्या कामगिरीत तो तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

### बालाजी-ओबरलीटनरला तेरेगा ओपन विजेतेपद

**नवी दिल्ली** : भारताच्या एन. श्रीराम बालाजी आणि ऑस्ट्रियाच्या नील ओबरलीटनरने फ्रान्समधील पॉ येथे झालेल्या तेरेगा ओपन पॉ पायरेनीज टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीचे विजेतेपद पटकावत एटीपी चॅलेंजर सर्किटवर आपली प्रभावी घोडदौड सुरू ठेवली. एटीपी चॅलेंजर १२५ स्पर्धेत अव्वल मानांकित म्हणून स्पर्धा करणाऱ्या या इंडो-ऑस्ट्रियन जोडीने ७७ मिनिटे चाललेल्या नाट्यमय अंतिम सामन्यात दुसऱ्या मानांकित जाकुब पॉल आणि मातेज वोसेल यांचा ६-१, ३-६, १३-११ असा पराभव केला. दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सेट जिंकल्यानंतर सुपर टायब्रेकमध्ये सामन्याचा निर्णय घेण्यात आला. बालाजी आणि ओबरलीटनर यांनी शानदार सुरुवात केली आणि सामन्याच्या सुरुवातीलाच नियंत्रण मिळवले. त्यांनी पहिल्या सेटमध्ये अनेक वेळा त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना मोडून काढत ६-१ असा सहज विजय मिळवला. दुसऱ्या सेटमध्ये पॉल आणि व्होसेल या स्विस-चेक जोडीने महत्त्वाच्या संधींचा फायदा घेतला. तिसऱ्या सेटमध्ये बालाजी आणि ओबरलीटनरने टायब्रेकमध्ये ४-१ अशी आघाडी घेतली व नंतर मागे वळून बघितले नाही.

### फलंदाजीत अपयशी ठरलो : कर्णधार पौडेल

**मुंबई** : रविवारी वानखेडे स्टेडियमवर वेस्ट इंडीजविरुद्धच्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेत वेस्ट इंडीजकडून नऊ गड्यांनी पराभव झाल्यानंतर नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलने मान्य केले. आमचा संघ फलंदाजी विभाग म्हणून कमकुवत ठरला. पॉवरप्लेमध्ये ३ बाद २२ पासून सावरल्यानंतर नेपाळने ८ बाद १३३ धावा केल्या, परंतु वेस्ट इंडीजने केवळ १५.२ षटकांत त्याचा पाठलाग करून सुपर एटमध्ये आपले स्थान निश्चित केले. हे एक आव्हान होते, विशेषतः ज्या पद्धतीने फोर्डे, अकील आणि जेसन पॉवरप्लेमध्ये गोलंदाजी करत होते. मला वाटते की ते परिस्थितीचा खरोखरच चांगला वापर करत होते. मला वाटते की आम्ही फलंदाजी विभाग म्हणून पुन्हा अपयशी ठरलो. आम्हाला पुढे जाण्याची गरज आहे, असे पौडेल सामन्यानंतर म्हणाला.

# वेस्ट इंडीज सुपर एटमध्ये

## होल्डर, होपची चमकदार कामगिरी ● नेपाळ स्पर्धेबाहेर







**◆ मुंबई, १५ फेब्रुवारी**

पॉवरप्लेमध्ये प्रभावी गोलंदाजी व फलंदाजीच्या दमदार कामगिरीमुळे वेस्ट इंडीजने स्पर्धेतील तिसरा विजय मिळविला व सुपर एटमध्ये आपले स्थान निश्चित केले. नेपाळविरुद्ध सामन्याच्या पहिल्या षटकापासून शेवटच्या षटकापर्यंत वेस्ट इंडीजने पूर्ण नियंत्रण मिळवित ९ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. त्यामुळे नेपाळचे प्रगतीचे स्वप्न उध्वस्त झाले.

वेस्ट इंडीजच्या मॅथ्यू फोर्डने गोलंदाजीत चमक दाखवली, तर जेसन होल्डरने चार बळ टिपण्याची किमया केली. होल्डरला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दीपेंद्र सिंग ऐरीने नेपाळसाठी एक चमकदार अर्धशतक झळकावले आणि त्यांना ८ बाद १३३ धावांपर्यंत पोहोचवले, परंतु वेस्ट इंडीजच्या ताकदवान संघाविरुद्ध ते पुरेसे नव्हते. वेस्ट इंडीजचा कर्णधार शाय होपने वेगवान अर्धशतक झळकावले, तर शिमरॉन हेटमायरने १६ व्या षटकांत वेस्ट इंडीजसा विजयाचे लक्ष्य गाठून दिले. शाय होपने ४४ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ६१ धावांची, तर हेटमायरने ३२ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ४६ धावांची खेळी केली.

वेस्ट इंडीजच्या अकील होसेनने नेपाळला पहिला धक्का दिला. त्याने पहिल्याच षटकांत नेपाळचा सलामीवीर कुशल भुर्तेलचा (१८) त्रिफळा उडविलरा. होसेनने आतापर्यंत एकमेकांशी झालेल्या चार टी-२० सामन्यांमध्ये भुर्तेलला चार वेळा बाद केले आहे . ◂(वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियाचा स्मिथला खेळविण्याचा विचार

**◆ पल्लेकेले, १५ फेब्रुवारी**

दुखापतग्रस्त ऑस्ट्रेलिया सोमवारी येथे होणाऱ्या टी-२० विश्वचषक गट ब च्या महत्त्वाच्या सामन्यात श्रीलंकेचा सामना करताना आपले भाग्य स्वतःच्या हातात ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवून अनुभवी स्टीव्ह स्मिथला संघात आणण्याचा विचार करू शकते.


मिचेल मार्श


स्टीव्ह स्मिथ


दासून शनाका

गत सामन्यात झिम्बाब्वेविरुद्ध २३ धावांनी धक्कादायक पराभव पत्करल्यानंतर ऑस्ट्रेलियाला लवकर बाहेर पडण्याचा धोका आहे. इतर निकालांवर अवलंबून न राहता सुपर एटमध्ये जाण्यासाठी त्यांना आता ओमान आणि श्रीलंकेविरुद्धच्या उर्वरित गट सामन्यांमध्ये विजय मिळवण्याची आवश्यकता आहे.

ऑस्ट्रेलिया सध्या गट ब गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे आणि दोन सामन्यांमधून दोन गुण मिळवले आहेत.

दुखापतींनी ग्रासलेल्या २०२१ च्या विजेत्या ऑस्ट्रेलिया संघाला झिम्बाब्वेविरुद्धच्या नाट्यमय अव्वल फळीच्या अपयशानंतर १४६ धावांतच बाद करण्यात आले.डावाची सुरुवात करणारा कर्णधार मिचेल मार्श ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या सामन्यात खेळू शकला नाही, कारण तो दुखापतग्रस्त आहे. त्याच्या जागी आता स्टीव्ह स्मिथ संघात सहभागी झाला आहे, परंतु ३६ वर्षीय खेळाडूला अद्याप १५ जणांच्या टी-२० विश्वचषक संघात अधिकृतपणे समाविष्ट केलेले नाही. वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड दुखापतीमुळे बाहेर पडल्यानंतर त्यांच्याकडे एक जागा असल्याने ऑस्ट्रेलिया कोणालाही न बदलता त्याचा समावेश करू शकते.

फिरकी गोलंदाजीविरुद्ध स्मिथचा मजबूत रेकॉर्ड व उत्साहवर्धक फॉर्ममुळे ऑस्ट्रेलियाची फलंदाजी मजबूत होऊ शकते.वेगवान अष्टपैलू मार्कस स्टोइनिसला तंदुरुस्त मानले गेले आहे.तथापि, ऑस्ट्रेलियाला मिचेल स्टार्क (निवृत्त), पॅट कमिन्स (जखमी) आणि हेझलवूड या प्रसिद्ध वेगवान त्रिकूटाची अनुपस्थिती देखील जाणवत आहे.

नॅथन एलिसने प्रभावित केले असले तरी, डावखुरा वेगवान गोलंदाज बेन द्वारशुइस व वेगवान गोलंदाज झेवियर बार्टलेट महागडे ठरले आहेत.२०२३ मध्ये आम्ही काही पराभव आणि दुखापतींसह ते पाहिले. आमच्याकडे काही खेळाडू आहेत, जे २०२३ मध्ये भारतात होते आणि आम्ही या परिस्थितीतून मार्ग काढण्याचा आणि त्या व्यूहरचनेचा वापर करण्याचा प्रयत्न करू, असे झिम्बाब्वेविरुद्धच्या पराभवानंतर हंगामी कर्णधार ट्रॅव्हिस हेड म्हणाला.

दुसरीकडे, सह-यजमान श्रीलंका ओमान आणि आयर्लंडविरुद्ध आरामदायी विजयांसह गटात अव्वल स्थानावर आहे. तथापि, त्यांनाही धक्का बसला आहे. स्टार फिरकी गोलंदाज वानिंदू हसरंगा दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर झाला आहे. त्याच्या अनुपस्थितीत, श्रीलंका घरच्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी महेश थिकेशना व फिरकी गोलंदाज दुनिथ वेलागेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहील. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**अफगाणिस्तान वि. युएई**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : सकाळी ११.०० वाजतापासून

**इंग्लंड वि. इटली**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**ऑस्ट्रेलिया वि. श्रीलंका**
**स्थळ** : पल्लेकेले स्पोर्टस क्लब, पल्लेकेले
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# यूएईचा मधल्या फळीतील खेळाडूंवर भर

**◆ नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

सोमवारी येथे टी-२० विश्वचषकातील गट ड मध्ये जिंकणे आवश्यक असलेल्या सामन्यात यूएई आपल्या मधल्या फळीतील कमकुवतपणा, विशेषतः फिरकी गोलंदाजांविरुद्ध, दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे.

गत सामन्यांमध्ये परस्परविरोधी निकालांनंतर दोन्ही संघ स्पर्धेत उतरतील. यूएईने कॅनडाला हरवून पहिला विजय नोंदवला, तर अफगाणिस्तानने शेवटचा सामना दोन सुपर ओव्हरमध्ये ढकलला असूनही त्यांना हृदयद्रावक पराभव पत्करावा लागला.

दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड अनुक्रमे सहा व चार गुणांसह गटात अव्वल दोन स्थानांवर आहेत, त्यामुळे यूएईच्या पात्रता फेरीतील आशा विजय व इतरत्र अनुकूल निकालांच्या संयोजनावर अवलंबून आहेत.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वेदनादायकपणे जवळ आल्यानंतर अफगाणिस्तान आपले खाते उघडण्यास उत्सुक आहे. त्यांना उर्वरित सामने खात्रीपूर्वक जिंकण्याची गरज नाही तर स्पर्धेत टिकण्यासाठी इतर निकालांवर देखील अवलंबून राहावे लागेल.

न्यूझीलंडने युएईला यापूर्वी १० गड्यांनी पराभव पत्करावा लागला होता व १५० धावांचा पाठलाग करताना कॅनडाने १३ व्या षटकात ४ बाद ६६ अशी मोडीत काढली तेव्हा त्यांना आणखी एका पराभवाची चाहूल लागली. त्यांच्या वरच्या व मधल्या फळीला फिरकी गोलंदाजांविरुद्ध संघर्ष करावा लागला, परंतु सलामीवीर आर्यनश शर्मानि (५३ चेंडूत ७४ धावा) पाठलाग यशस्वी केला. त्यानंतर सोहेब खानच्या अखेरच्या लाटेने (२९ चेंडूत ५१ धावा) त्यांना उल्लेखनीय वळण पूर्ण करण्यास मदत केली.

तथापि, अफगाणिस्तानच्या कर्णधार रशीद खान, मुजीब उर रहमान व मोहम्मद नबी या जबरदस्त फिरकीपटू त्रिकुटाविरुद्ध युएईच्या फलंदाजीची अधिक कठोर परीक्षा असेल.


रशीद खान


मोहम्मद वसीम

मला वाटते की आम्हाला ७ ते १५, १६ व्या षटकात मधल्या षटकांमध्ये आमची फलंदाजी सुधारावी लागेल व लक्ष ठेवावे लागेल, असे युएईचा कर्णधार मोहम्मद वसीम कॅनडाविरुद्धच्या विजयानंतर म्हणाला होता.

कॅनडाविरुद्ध युएईच्या गोलंदाजी विभागाला लय मिळाली. वेगवान गोलंदाज जुनैद सिद्दीकीने पाच बळी घेतले, परंतु रहमानुल्ला गुरबाज, गुलबदिन नायब व अझमतुल्ला उमरझाईसारख्या गोलंदाजांना रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असेल.

२३ वर्षीय गुरबाजने गत सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली, त्याने ४२ चेंडूत ८४ धावा करत अफगाणिस्तानला नियमानुसार १८७ धावांपर्यंत पोहोचवले. त्यानंतर दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये त्याने सलग तीन षटकार मारले पण तो कमी पडला कारण अफगाणिस्तान पराभूत झाला. उमरझाईनेही तीन बळी घेतले, तर रशीदने दोन बळी घेतले. ◂(वृत्तसंस्था)

### डेहरादूनच्या फिट इंडिया सायकलमध्ये हजारो लोक

**डेहराडून** : डेहरादूनच्या शांत परिसरापर्यंत आणि देशभरातील जवळजवळ सर्व जिल्ह्यांपर्यंत, फिटनेस उत्साही हजारो लोक फिट इंडिया संडेज ऑन सायकलच्या (एसओसी) ६१ व्या आवृत्तीत सहभागी झाले होते.

# सुपर एटमध्ये स्थान मिळविणे इंग्लंडचे लक्ष्य

**◆ कोलकाता, १५ फेब्रुवारी**

सोमवारी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत दोन वेळा विजेता इंग्लंड व पदार्पण करणाऱ्य इटलीविरुद्धच्या आपल्या शेवटच्या गट क साखळी सामन्यात खेळणार आहे. हा सामना जिंकून सुपर एट फेरीत आपले स्थान निश्चित करण्याचे इंग्लंडचे लक्ष्य आहे.

इंग्लंड आणि इटली हे फुटबॉलमधील कट्टर प्रतिस्पर्धी आहे, त्याचप्रमाणे आता या क्रिकेट सामन्याकडे बघू लागले आहे. तथापि, सोमवारी प्रेक्षक पहिल्यांदाच फुटबॉलऐवजी क्रिकेटकडे वळेल व ईडन गार्डन्सवरील या सामन्यात प्रेक्षकांची गर्दी उसळेल.

स्कॉटलंडवर दबावाखाली विजय मिळवल्यानंतर इंग्लंड वेगाने खेळत आहेत व हळूहळू त्यांना लय सापडत आहे. स्कॉटलंडविरुद्ध विजय मिळविताना चौथ्या क्रमांकावर खेळणाऱ्या टॉम बँटनने अर्धशतक झळकावले आणि इंग्लंडची मोहीम जिवंत ठेवली.

आपल्या आक्रमक बॅझबॉल शैलीसाठी ओळखले जाणारे इंग्लंड आतापर्यंत सावध दिसत आहे, जसे वेस्ट इंडिजविरुद्धच्या पराभवानंतर कर्णधार हॅरी ब्रुकने देखील मान्य केले होते.

आम्ही या स्पर्धेत आतापर्यंत जितके सोपे केले असते तितके सोपे केले नाही, परंतु सोमवारपासून इटलीविरुद्धच्या सामन्यापासून सुरुवात करून आपण थोडी सोपी धाव घेऊ शकू, असे ब्रुक स्कॉटलंडविरुद्धच्या विजयानंतर म्हणाला.फिल साल्ट, जोस बटलर आणि ब्रूक स्वतः अजूनही सातत्याने कामगिरी करत नाहीत.


हॅरी ब्रूक


वेन मॅडसेन

बटलरलाही आपली खेळी मोठ्या धावसंख्येत रूपांतरित करता आली नाही. गोलंदाजीत, जोफ्रा आर्चरने पॉवरप्लेमध्ये वेगवान व उसळी प्रभावीपणे वापरली, तर फिरकीद्वय आदिल रशीद व लियाम डॉसनने मधल्या षटकांमध्ये धावा रोखल्या आणि ते इटलीविरुद्धही त्याच पद्धतीच्या गोलंदाजीचे अनुसरण करण्याचे लक्ष्य ठेवतील.

दुसरीकडे, इटलीने नेपाळवर १० गड्यांनी विजय मिळविला. त्यामुळे पदार्पण करणाऱ्या संघांचा आत्मविश्वास उंचावला आहे. हा त्यांचा स्पर्धेतील पहिला विजय आहे. कर्णधार मॅडसेन आपल्या पुनरागमनाबद्दल आशावादी आहे आणि ४२ वर्षीय खेळाडू इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात पुनरागमन करतो की नाही हे पाहणे शिल्लक आहे. नेपाळविरुद्धच्या सामन्यात जस्टिन आणि अँथनी या मोस्का बंधूंनी नाबाद अर्धशतके झळकावली व इटलीच्या फलंदाजीत त्यांनी महत्त्वाचे स्थान मिळवले. हॅरी आणि बेन या मॅनेंटी बंधूंनी फलंदाजी व गोलंदाजी दोन्हीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ऑफ-स्पिनर बेनही प्रभावी ठरला आहे, तर श्रीलंकेचा वंशाचा लेग-स्पिनर क्रिशन कलुगामेजने आपल्या आक्रमणात विविधता आणली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# अमेरिकेच्या सुपर एटच्या आशा कायम

## नामिबियाचा ३१ धावांनी पराभव

## संजय कृष्णमूर्तीची चमकदार कामगिरी

**◆ चेन्नई, १५ फेब्रुवारी**

शॅडली व्हॅन शाल्कविकने आपला शानदार फॉर्म कायम ठेवला आणि दोन महत्त्वपूर्ण बळी टिपले. रविवारी प्रतिष्ठित एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या टी-२० विश्वचषक २०२६ च्या गट साखळी फेरीत आपल्या शेवटच्या सामन्यात अमेरिकेने नामिबियाला २० षटकांत ६ बाद १६८ धावांवर रोखले आणि ३१ धावांनी दमदार विजय मिळवला. या विजयाबरोबरच अमेरिका चार गुणासह अ गटात तिसऱ्या स्थानावर आहे. नामिबिया शून्यासह तळाच्या स्थानी आहे.




सलामीवीर, कर्णधार मोनांक पटेल व चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या संजय कृष्णमूर्तीने झळकावलेल्या अर्धशतकांच्या बळावर अमेरिकेने २० षटकांत ४ बाद १९९ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना नामिबियाला २० षटकांत ६ बाद १६८ धावांपर्यंतच मजल मारता आली.

मोनांक पटेलने ३० चेंडूंत ३ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ५२ धावांची, तर संजय कृष्णमूर्तीने ३३ चेंडूंत ४ चौकार व ६ षट्कारांसह नाबाद ६८ धावांची खेळी केली, त्यालाच सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नामिबियाकडून धावांचा पाठलाग करताना सलामीवीर लार्कन स्टीनकॅम्पने ३९ चेंडूंत ५८ धावांची खेळी करत विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले. जॅन निकोल लॉफी-इटॅनने २८ व जेजे स्मितने ३१ धावंची भर घातली, परंतु त्यांची ही खेळी संघाला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही व नामिबियाला ३१ धावांनी पराभव पत्करावा लागला. व्हॅन शाल्कविकने २ बळी, अली खान, सौरभ नेत्रावळकर व शुभम संजनेने प्रत्येकी एक बळी टिपला.

अमेरिकेचा या स्पर्धेत सलग दुसरा विजय आहे आणि यासह, त्यांनी सुपर ८ टप्प्यात पोहोचण्याच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. तथापि, अमेरिकेला त्यांचे उर्वरित दोन्ही गट टप्प्यातील सामने चांगल्या फरकाने गमावण्यासाठी भारत किंवा पाकिस्तानपैकी एकाची आवश्यकता असेल. ◂(वृत्तसंस्था)

# केएल राहुल, देवदत्त पडिक्कलचे शतक

## रणजी करंडक क्रिकेट ● कर्नाटक २ बाद ३५५

**◆ लखनौ, १५ फेब्रुवारी**

येथे रविवारपासून प्रारंभ झालेल्या रणजी करंडक उपांत्य सामन्यात सलामीवीर केएल राहुल (१४१) व देवदत्त पडिक्कलने झळकावलेल्या दमदार शतकाच्या बळावर कर्नाटकने उत्तराखंडविरुद्ध पहिल्या दिवस अखेर पहिल्या डावांत ९० षटकांत २ बाद ३५५ धावा उभारल्या. राहुल व देवदत्तने दुसऱ्या गड्यासाठी २७८ धावांची मोठी भागीदारी केली. पहिल्या दिवसाच्या शेवटच्या तासापूर्वी राहुल १४१ धावांवर बाद झाला, तर पडिक्कल १४८ धावांवर नाबाद राहिला.




सकाळी उत्तराखंडने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या वेगवान गोलंदाजांना नवीन चेंडू हाताळायला मिळाला. अठरा वर्षीय आदित्य रावतने मयंक अग्रवालला ५ धावांवर बाद केले. कर्नाटकने नऊ षटकांत केवळ १८ धावा एक मोहरा गमावला. मात्र त्यानंतर राहुल व देवदत्तने डावखुरा फिरकी गोलंदाज मयंक मिश्राला लक्ष्य केले व षट्कार मारले. सकाळच्या सत्राच्या दुसऱ्या भागात उत्तराखंडने अतिरिक्त धावाही सोडण्यास सुरुवात केली, त्यामुळे राहुल व देवदत्तने खेळपट्टीवर आपला चांगला जम बसविला.

राहुल ९९ धावांवर असताना, उत्तराखंडने २८ व्या षटकात पार्टटाइम गोलंदाज अवनीश सुधाला मैदानात उतरवून त्याचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला. पण राहुलने ऑफस्पिनरला शांतपणे एका फाइन लेगवर एक धाव घेऊन या हंगामात आपले सलग दुसरे शतक पूर्ण केले.

पण अखेर आदित्य रावतने आपल्याच गोलंदाजीत राहुलचा झेल पकडला व २००५-०६ नंतर कर्नाटकची दुसऱ्या गड्यासाठीची दुसरी सर्वोच्च भागीदारी मोडून काढली. नंतर करुण नायर आला व त्याने ६५ चेंडूत ५ चौकार व एका षट्कारसह नाबाद ३७ धावा केल्या. देवदत्तने २३६ चेंडूंत १६ चौकार व २ षट्कारसह नाबाद १४८ धावा केल्या. या दोघांनी दिवस अखेरपर्यंत तिसऱ्या गड्यासाठी नाबाद ५९ धावांची भागीदारी केली. ◂(वृत्तसंस्था)

# सुदीप कुमार घरामीचे नाबाद शतक; बंगाल ५ बाद २४९

**◆ कल्याणी, १५ फेब्रुवारी**

येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील जम्मू-काश्मीरविरुद्धच्या पहिल्या उपांत्य सामन्यात सुदीप कुमार घरामीच्या नाबाद १३६ धावांच्या खेळीच्या बळावर बंगालने पहिल्या दिवस अखेर पहिल्या डावांत ७९.५ षटकांत ५ बाद २४९ धावा उभारल्या.

जम्मू-काश्मीरने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधार पारस डोगराचा निर्णय योग्य ठरवित जम्मू-काश्मीरच्या गोलंदाजांनी प्रारंभीच प्रभावी मारा केला आणि बंगालला दुसऱ्याच षटकांत पहिला हादरा दिला. डावखुरा मध्यम गती गोलंदाज सुनील कमारनेसलामीचा जोडीदार सुदीप चॅटर्जीला (०) पुनदीनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. मात्र त्यानंतर कर्णधार अभिमन्यू ईश्वरन्‌ने सुदीप कुमार घरामीच्या साथीने दुसऱ्या गड्यासाठी ८५ धावांची भागीदारी केली.




अर्धशतक पूर्ण करण्यास एक धाव कमी असताना अभिन्यूला अकिब नबीने बाद केले. अभिमन्यूने ९६ धावांत ४९ धावांची खेळी केली. पुढे सुदीपला साथ देण्यास आलेल्या सुरज सिंधू जयस्वालला (०) अकिब नबीने बाद केले. सुदीपने अनुस्तुप मजुमदार (१४) व शाहबाज अहमदच्या (४२) साथीने दिवस अखेर बंगालला ५ बाद २४९ धावांचा टप्पा गाठून दिला. सुदीप कुमार घरामीने २२७ चेंडूंत नाबाद १३६ धावांची खेळी केली, यात त्याने १९ चौकार व एक षट्कार खेचला. यापूर्वी उपांत्य सामन्यात सुदीप कुमार घरामीने द्विशतक झळकावले होते.

जम्मू-काश्मीरच्या अकिब नबी व सुनील कुमारने प्रत्येकी २ बळी , तर आबिद मुश्ताकने एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...



### मंद्रूपमध्ये सेवालाल जयंती उत्साहात

**दक्षिण सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**
बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती मंद्रूपमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. नाईक नगर तांड्यातील बंजारा समाज बांधवांकडून सेवालाल महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच अनिता कोरे, माजी जिल्हा परिषद सदस्या विद्युलता कोरे, माजी पंचायत समिती सदस्या शालन चव्हाण, ग्रामपंचायत सदस्या शांताबाई चव्हाण , उपसरपंच भगवान व्हनमाने, जिल्हा दूध संघाचे माजी संचालक प्रभाकर कोरे व माजी ग्रामपंचायत सदस्य अमृत चव्हाण यांच्या हस्ते सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कारभारी खुबा चव्हाण, नाईक अर्जून चव्हाण, दक्षिण सोलापूर संजय गांधी निराधार योजेनेचे माजी अध्यक्ष प्रशांत कडते, बाळासाहेब चव्हाण, शिवाजी चव्हाण, विलास चव्हाण, कस्तुर चव्हाण, बाबूराव चव्हाण, संजय राठोड, महादेव पवार, विनोद चव्हाण उपस्थित होते. यावेळी महाप्रसाद वाटप करण्यात आले.



### 'यशकल्याणी'तर्फे नगरसेवक महेश इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.१५ फेब्रुवारी-**
येथील वटवृक्ष मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांची सहाव्यांदा नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल यशकल्याणी सेवाभावी संस्थेतर्फे संचालक प्रा.गणेश करे-पाटील यांनी पदाधिकाऱ्यांसह त्यांचा पुष्पहार, पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देवून सत्कार केला. यावेळी प्रथमेश इंगळे, सोलापूर जिल्हा इंग्लिश टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष बाळकृष्ण लावंड, माजी जिल्हा अध्यक्ष प्रा.गुरुनाथ मुचंडे, अक्कलकोट तालुकाध्यक्ष प्रा.बसय्या हिरेमठ, पक्षीमित्र प्रा.कल्याणराव साळुंके, जीवन शिक्षण फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.जयेश पवार, प्रा.सुरेश पिरगुंडे, प्रा.सचिन काटे, जीवन शिक्षण फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.जयेश पवार, प्रा.सुरेश पिरगुंडे, प्रा.सचिन काटे, यशवंत परिवाराचे प्रा.विष्णू शिंदे, प्रा.गोपाळ तकिक, प्रा.मारुती जाधव, प्रा.विजयकुमार वणवे, प्रा.निवृत्ती बांडे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, मंदीर समितीचे विश्वस्त तथा करमाळा पंचायत समितीचे सभापती संपतराव उर्फ भारत मामा शिंदे, अ अंकूश केत, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, संतोष पराणे, मनोज इंगुले, सुनिल पवार, बाबा सुरवसे, श्रीकांत मलवे, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, प्रसाद पाटील, विपूल जाधव उपस्थित होते.

### झिंजेवस्ती येथे आज प्रात्यक्षिक ऊस प्लॉट पाहणी व मार्गदर्शन कार्यक्रम

**पिलीव, दि. १६ फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती (६५ फाटा) येथील माजी सरपंच विठ्ठल हरी मदने यांच्या ऊस प्लॅट पाहणी कार्यक्रम अंतर्गत भुमी चार्जर टेक्नॉलॉजी या कंपनीमार्फत भुमी आमृत खत वापरलेल्या प्रात्यक्षिक प्लॉटची विशेष पाहणी कार्यक्रम तसेच ऊस पिकाची जोमदार वाढ तसेच भविष्यातील उत्पादन वाढ व व्यवस्थापन यावर शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन व चर्चा सत्र १६ फेब्रुवारी रोजी झिंजेवस्तीचे माजी सरपंच विठ्ठल हरी मदने यांच्या ६५ फाटा येथील शेतामध्ये मोहन कोरके यांचे मार्गदर्शन होणार आहे. तरी परिसरातील शेतकऱ्यांनी सकाळी दहा वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन विठ्ठल मदने, प्रा. सुग्रीव लेंगरे व विजय झिंजे यांनी केले.

### कुणबी दाखल्यांबाबत मंगळवारी कुर्डूवाडी प्रांत कार्यालयात बैठक

**करमाळा, दि.१५ फेब्रुवारी-**
सकल मराठा समाजाच्या वतीने कुणबी दाखल्यासंदर्भात अडवणूक होत असल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. त्याची दखल घेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशाने मंगळवारी दि. १७ फेब्रुवारी रोजी कुर्डूवाडीच्या प्रांत कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे अभिनंदन करण्यात येत असून सकल मराठा समाजाच्यावतीने आभार व्यक्त केले आहेत. कुणबी दाखल्या संदर्भात ज्यांना अडचणी असतील त्यांनी अडचणीच्या कागदपत्रांसहित मंगळवारी दि.१७ फेब्रुवारीला कुर्डूवाडी येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वृत्त...

### राजेंद्र घोरपडे



**अकलूज, दि. १५ फेब्रुवारी-**
शंकरनगर येथील शिवरत्न कंट्रक्शन कंपनीचे जनरल मॅनेजर राजेंद्र विठ्ठल राव घोरपडे (वय ६३) यांचे अल्पशा आजाराने आज रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी निधन झाले त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे आई-वडील, एक भाऊ, भावजई, असा परिवार आहे.

### डॉ. सुधा फडके



**सोलापूर दि. १५ फेब्रुवारी-**
दमाणी नगर येथील डॉक्टर सुधा किरण फडके यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ५५ वर्षाच्या होत्या, त्यांच्यावर देगाव येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती किरण, एक मुलगा, मुलगी, सून असा परिवार आहे. नाट्य कलावंत आणि जनता बँकेतील माजी अधिकारी किरण फडके यांच्या सुधा या पत्नी होत्या.







# वैराग नगरीत महाशिवरात्रीचा अभूतपूर्व उत्साह

## मल्लिकार्जुन मंदिरासह शिवधुनीने आसमंत दुमदुमला; अग्निहोत्र आणि प्रवचनाने रंगला भक्तीचा सोहळा

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग, दि.१५ फेब्रुवारी-**
'ओम नमः शिवाय... ओम नमः शिवाय...' अशा शिवनामाच्या जयघोषाने आज अवघी वैराग नगरी आणि परिसर भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली. म हाशिवरात्रीच्या निमित्ताने येथील प्राचीन व ऐतिहासिक मल्लिकार्जुन मंदिर, महादेव माळ, श्री क्षेत्र केदार्लिंग मंदिर आणि परिसरातील सर्वच शिवमंदीरात भाविकांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती. आज दि. १५ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या उत्सवाने 'भक्ती आणि शक्ती'चा अनोखा संगम घडवून आणला.

**अग्निहोत्र आणि प्रवचनाचा आध्यात्मिक संगम**

यावर्षीच्या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे मल्लिकार्जुन मंदिराच्या आवारात महिलांनी केलेले 'अग्निहोत्र'. महिलांनी विधीवत अग्नि प्रज्वलित करून, होम-हवन करत महादेवाप्रती आपली अढळ श्रद्धा व्यक्त केली. या शिवधुनीमुळे आणि होम-हवनामुळे संपूर्ण वातावरण चैतन्यमय झाले होते. याच सोहळ्याचे औचित्य साधून मंदिर परिसरात विशेष प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

**नयनरम्य सजावट आणि विद्युत रोषणाई**

वैरागचे श्रद्धास्थान असलेल्या प्राचीन मल्लिकार्जुन मंदिराला महाशिवरात्रीनिमित्त आकर्षक फुलांची आणि मनमोहक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. संपूर्ण मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला होता. या विद्युत रोषणाईमुळे मंदिराला एक वेगळेच दिव्य स्वरूप प्राप्त झाले होते, जे भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले. पहाटेपासूनच महादेवाला अभिषेक आणि पूजा करण्यासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

**विविध मंदिरांमध्ये भाविकांची मांदियाळी**

केवळ मल्लिकार्जुन मंदिरच नव्हे, तर परिसरातील इतर तीर्थक्षेत्रांवरही भक्तीचा पूर ओसांडून वाहत होता:
महादेव माळ या ठिकाणी परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. श्री क्षेत्र केदार्लिंग मंदिर येथे विशेषतः महिला भाविकांची लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळाली. मंदिर प्रशासनातर्फे भाविकांसाठी महाप्रसादाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते. श्री संतनाथ महाराज मंदिरात भाविकांनी आपल्या ग्रामदैवताच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. सायंकाळी पाच वाजल्यापासून भाविकांची गर्दी अधिकच वाढत गेली. यामध्ये विशेषतः महिला आणि युवतींची उपस्थिती लक्षणीय होती. रात्री ८ वाजेपर्यंत दर्शनाच्या रांगा कायम होत्या. महिलांनी मोठ्या उत्साहात अग्नी प्रज्वलित करून धार्मिक विधी पार पाडले, ज्यामुळे उत्सवाचा आनंद द्विगुणित झाला.

शहरातील सर्व प्रमुख मंदिरांमध्ये महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी याचा लाभ घेतला. अलोट गर्दी असूनही मंदिर प्रशासन आणि स्वयंसेवकांच्या मदतीने हा सोहळा अत्यंत शांततेत आणि मंगलमय वातावरणात पार पडला. ठिकठिकाणी भजनांचे आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याने संपूर्ण शहर शिवमय झाले होते.

**श्रद्धेचा अनमोल ठेवा**

वैरागचे मल्लिकार्जुन मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून ते प्राचीन परंपरेचा अनमोल ठेवा आहे. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत आणि वैरागसह आसपासच्या गावातील हजारो भक्तांनी या सोहळ्यात सहभागी होऊन महादेवा चरणी लीन झाले. या उत्सवामुळे वैराग नगरीत चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# अॅड. यशराजे साळुंखे-पाटील पराभवानंतरही जनतेच्या दारी

## जवळा जि.प गटातील मतदारांचे मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१५ फेब्रुवारी-**
सांगोला तालुक्यात नुकत्याच पार पडलेल्या जि.प व पं.स निवडणुकांमध्ये संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या जवळा जि.प गटातून अॅड.यशराजे दिपकराव साळुंखे-पाटील यांचा अल्प मतांनी पराभव झाला. मात्र पराभवाने खचून न जाता त्यांनी जवळा जि.प गटातील १३ गावांमध्ये जाऊन मतदारांचे आभार मानले.

यशाने यंदा हुलकावणी दिली असली तरी अपयशाने मी खचणार नाही. आमच्या साळुंखे-पाटील कुटुंबाच्या रक्तातच जनसेवा आहे. लोकसेवेची बांधिलकी भविष्यातही तेवढ्याच ताकदीने जपणार आहे.
**- अॅड. यशराजे साळुंखे-पाटील**

या दौऱ्यादरम्यान अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. काहींच्या डोळ्यांत अश्रू तर काहींच्या आवाजात जिद्द दिसून आली. कार्यकर्त्यांच्या भावना हीच माझी खरी शिदोरी आहे. पराभव झाला म्हणून घरात बसणार नाही; तुमच्या सुख-दुःखात कायम उभा राहीन. झालेला पराभव विसरून आपण विकासाच्या दिशेने एकत्र वाटचाल करूया, असे आवाहन अॅड.साळुंखे पाटील यांनी केले. यावेळी वाढेगाव पं.स गणातून वंदना भरत शेळके तसेच जवळा पं.स गणातून पुनम सुदर्शन इंगवले ह्या विजयी झालेल्या सदस्यांनी विविध गावांमध्ये उपस्थित राहून मतदारांचे आभार मानले. जनतेने दाखविलेल्या विश्वासाचे रूपांतर विकासकामांमध्ये करून दाखवू असा विश्वास व्यक्त करत आगामी काळातही एकत्रितपणे काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली.



# आवताडे शुगरच्या गळीत हंगामाची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १५ फेब्रुवारी**
तालुक्यातील नंदूर येथील आवताडे शुगर अॅण्ड डिस्टीलरीज प्रा.लि कारखान्याने यंदाच्या गळीत हंगामात ४ लाख ८ हजार ९०० मे.टन ऊस गाळप करून हंगामाची सांगता केली असल्याचे जाहीर केले. कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक व मार्केट कमिटीचे माजी सभापती सोम नाथ आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके व सरव्यवस्थापक सुधीर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गळीत हंगाम सांगता समारंभ पार पडला.



तसेच यावेळी साखर कारखान्यातील उत्पादित ४ लाख २५ हजार ५५५ साखर पोत्यांचे पूजन अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा ह.भ.प.पार्वतीताई आवताडे यांच्या हस्ते व सुनीता पवार, अंजलीताई आवताडे, सुकेशिनी आवताडे, जि.प.सदस्या करुणा शिवशरण, नगरसेविका सावित्री कोंडूभैरी, प्रतीक्षा मेटकरी, विजया गुंगे, तरन्नुम दारुवाले, यशोदा पतसंस्थाच्या चेअरमन निला आटकळे, जिजामाता पतसंस्थाच्या चेअरमन आशा नागणे, सौ. खवतोडे, रोहिणी यादव, आसावरी भजनी मंडळाच्या प्रमुख शुभदा जोशी, श्रीराम भजनी मंडळाच्या संगीता आवताडे यांच्या उपस्थित संपन्न झाला.

ऊस टंचाई असूनही कारखाना प्रशासनाने दिवसरात्र काम करत उच्चांकी गाळप करत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे व मार्गदर्शक आ. समाधान आवताडे यांनी कारखान्यास सहकार्य केलेल्या सर्व यंत्रणांचे आभार मानले. यावेळी कारखाना कर्मचाऱ्यांना ७ दिवसाचा पगार बक्षीस म्हणून देण्यात येत असल्याची घोषणा केली. चेअरमन संजय आवताडे यांनी सांगितले की, चालू हंगामात कारखान्याने एकूण ४,०८,८९० मे.टन ऊस गळीत करून सरासरी १०.५० टक्के साखर उतारा साध्य केला असून ४,२५,५५५ क्विंटल साखर उत्पादन केले आहे. आपल्या कारखान्याची शासनाने निश्चित केलेली ऋछझ २५०० रुपये प्रति मे.टन असताना कारखान्याने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून ३००० रुपये प्रति मे.टन एकरकमी दर देण्याचा निर्णय घेतला. यावेळी नूतन जिल्हा परिषद सदस्य रमेश भांजे, मि. हणमंत दुधाळ, प्रदीप खांडेकर, मि. जनार्धन शिवशरण, नूतन पंचायत समिती सदस्य विनायक यादव, अर्जुन म्हल्लाळे, मि. श्रीकांत गणपाटील, मि.बाळासाहेब ताड व नगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या नूतन नगरसेवक सोमनाथ हुशारे, मि.अरुण गुंगे, बाबा कोंडूभैरी यांचाही कारखान्यातर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी दामाजी शुगरचे माजी संचालक भारत निकम, संजय पवार, विजय माने, लेबर फेडरेशनचे संचालक शाम पवार, बिरा कोळेकर, अशोक आसबे, राजू यादव, भीमराव आसबे, बटू आप्पा पवार, ऋतुराज बिले, अशोक भिंगे, शिवाजी मोहिते, शिवाजी पटाप, चंद्रकांत गोडसे, गोविंद भोरकडे, अंबाना ढाणे, बिराप्पा ढाणे, धनंजय पवार, जावेद इनामदार, दत्तात्रय गंगमई आदी उपस्थित होते.

### चिकमहूद येथे उद्या रंगणार निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१५ फेब्रुवारी-**
चिकमहूद (ता.सांगोला) येथील ग्रामदेवता तामजाईदेवी यात्रेनिमित्त उद्या मंगळवार दि. १७ फेब्रुवारी रोजी दु.२ वा. निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये १ लाख रु. इनामासाठी विकास पवार (दिघंची) विरुद्ध उदयसिंह खांडेकर (बामणी), समर्थ चौरे (कोल्हापूर) विरुद्ध सनी राऊत (केतकी निमगांव), रोहित जाधव (महूद) विरुद्ध प्रशांत चंदनकर (कुर्डूवाडी), ७५ हजार रु. इनामासाठी ओम माने (खुडूस) विरुद्ध रोहन जाधव (बारामती), रणजीत आगलावे (आटपाडी) विरुद्ध चैतन्य टिकोळे (खुडूस), अतुल काळेल (विटा) विरुद्ध कल्याण नाईकनवरे (कोल्हापूर), ५१ हजार रु. इनामासाठी शुभम हाके (वाखरी) विरुद्ध दादा घुले (अकलूज), अमर रणदिवे (दिघंची) विरुद्ध बालाजी जाधव (वाखरी), विराज दिघे (महूद) विरुद्ध पवन शिंदे (वाखरी), रणजित मदने (बंडगरवाडी) विरुद्ध संभाजी चव्हाण(अकलूज), प्रदीप मदने (बंडगरवाडी) विरुद्ध दादा यम गर (केतकी निमगांव), ३१ हजार रु. इनामासाठी सुमित महारनवर (महूद) विरुद्ध पियुष वाडेकर (खवासपूर), २१ हजार रुपयांच्या इनामासाठी करण नागणे (बामणी) विरुद्ध सुजित अटकळे (खवासपूर), पृथ्वीराज मरगर (महिम) विरुद्ध गणेश लोखंडे (खुडूस) यांच्यात कुस्ती होणार आहे.

# महात्मा बसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान विषयावरील राष्ट्रीय परिषद उत्साहात

## झाडबुके कॉलेज व विद्यापीठाच्या अध्यासन केंद्राचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१५ फेब्रुवारी**
येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने म हात्मा बसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान आणि सामाजिक विचारधारा या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषद महाविद्यालयाम ध्ये झाली. परिषदेस प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि विविध महाविद्यालयांतील अभ्यासक यांचा प्रतिसाद लाभला. अध्यक्षस्थान बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या खजिनदार तथा संचालिका वर्षा ठोंबरे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून अभ्यासक, व्याख्याते डॉ. राजशेखर सोलापूरे उपस्थित होते. उद्घाटक म्हणून समाजशास्त्रज्ञ, लेखक डॉ. सूर्यकांत घुगरे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा तसेच महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर गार्डी यांनी परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या. परिषदेच्या पहिल्या सत्राची सुरुवात नोंदणी व संशोधन निबंध सादरीकरणाने झाली. उद्घाटन सत्रात डॉ. विशाल लिंगायत यांनी प्रास्ताविक केले. परिषदेची सुरुवात प्रा. अंकिता घाटे यांनी स्वागत गीताने केली.

डॉ. सूर्यकांत घुगरे यांनी त्यांचे बसवेश्वरांविषयीचे तत्वज्ञान या विचारांच्या मांडणीतून केली. दुसऱ्या सत्रातील परिषदेचे प्रमुख वक्ते बिजभाषक डॉ. राजशेखर सोलापूरे यांनी अनुभव मंटप आणि कायक विचार याद्वारे बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान सांगितले. बसवेश्वरांना पाच सुतक संकल्पना अमान्य होती. याविषयीची संकल्पना देखील त्यांनी स्पष्ट केली. 'कायक' आणि 'दासोह' या संकल्पना आजच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेतही तितक्याच महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही समाजाची उन्नती मोजायची असेल तर तो समाज किती मूल्यांवर उभा आहे हे मोजावे लागेल अशा शब्दात बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान त्यांनी सांगितले. परिषदेच्या उद्घाटनाच्या अध्यक्षीय भाषणात वर्षा ठोंबरे यांनी मानवता हाच खरा धर्म आहे. आपल्या भाषणात त्यांनी लिंगायत संप्रदायातील गळ्यातील लिंग व विभूती (त्रिपुंड्रा) याविषयीची संकल्पना स्पष्ट केली.

परिषदेच्या तिसऱ्या सत्रात डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी बसवेश्वरांचे तत्वज्ञान स्पष्ट करताना स्त्रियांना सन्मान देण्याचे कार्य बाराव्या शतकात बसवेश्वरांनी केले असे सांगितले. विभूतीचे महत्व सांगत असताना बसवेश्वरांनी ब्रह्म, विष्णू, महेश एकच आहेत असे प्रतिपादन केले. विचारांपेक्षा भावना आणि माणूस महत्त्वाचे हे परखड शब्दात त्यांनी बसवेश्वरांचे विचार सांगितले. परिषदेच्या चौथ्या सत्रात डॉ. मल्लिकार्जुन तंगावार यांनी सदाचार, कायक, दासोह हे महत्त्वाचे तत्त्वज्ञान आहे आणि ते आपण अंमलात आणले पाहिजे असे त्यांनी सांगितले. त्यांनी बसवेश्वरांची इष्टदेव संकल्पनाही स्पष्ट केली. देव इतरत्र शोधण्यापेक्षा तो आपल्यातच आहे, असे बसवेश्वरांचे तत्वज्ञान त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. विविध संशोधकांनी बसवेश्वरांचे स्त्रीविषयक विचार, भारतीय संविधानाशी संबंध, सामाजिक उद्योजकता, शरण तत्वज्ञान आदी विषयांवर संशोधन निबंध सादर केले. तसेच परिषदेच्या अनुषंगाने महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचे ग्रंथ प्रदर्शन देखील महाविद्यालयाच्या वतीने भरविण्यात आले होते. या ग्रंथप्रदर्शनात महात्मा बसवेश्वर यांच्यावर आधारित अनेक ग्रंथांचा समावेश करण्यात आला होता. परिषदेचे सूत्रसंचालन प्रा. युवराज बारबोले आणि प्रा अंकिता घाटे यांनी केले. तर समन्वयक म्हणून डॉ. पी. एस. गांधी व सहसंयोजक डॉ. के. टी. व्हनहुवे यांनी काम पहिले. समारोप सत्रात सहभागी संशोधकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

**नावात बदल**

मी माझ्या नावात बदल करत असून फातिमा अब्दुल रशीद समस्ती असे होते. ते आता फातिमा बेगम अब्दुल रशीद समस्ती असे कागदपत्रानुसार पासपोर्ट जारी करण्यासाठी केले आहे.

# भीमा-सीना नदीच्या कृतज्ञतेसाठी कुडल येथे संगम आरती

## काशीच्या धर्तीवर पार पडली संगम आरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

भीमा व सीना नदीच्या संगमात काटोकाठ भरलेले निळेशार पाणी, घाटावर साकारण्यात आलेली सुंदर रंगावली, हजारो दिव्यांनी उजळलेले प्रकाश, सूर्य मावळतीला जातानाचा सोनेरी रंगाचा पडलेली छाया, मुखी नमामि गंगे हर हर गंगे चा गजर, संगमेश्वर महाराजांचा जयजयकार अशा भक्तिमय वातावरणामध्ये रविवारी सायंकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास हत्तरसंग कुडल येथे संगम आरती करण्यात आली.

नद्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रविवार, दि.१५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी संगम आरती आयोजित करण्यात आली होती. मल्लिकार्जुन बिराजदार यांच्याहस्ते संकल्प पूजा करून संगम आरती करण्यात आली. प्रा. निलेश भिडे, सिद्धेश्वर बिराजदार, राजू लेंगरे यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन तर विठ्ठल विजापूरे यांच्या हस्ते ओटी भरून नदीला नैवेद्य अर्पण करण्यात आले.



कृषी संस्कृतीचा विकास व्हावा, भीमा-सीना संगम नद्यांमध्ये पाण्याचा प्रवाह अखंड वाहत रहावा, नद्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संगमेश्वर देवस्थान समिती आणि भक्त मंडळांच्या वतीने संगम आरती आयोजित करण्यात आली होती. यंदा आरतीचे सातवे वर्ष होते. यावेळी काशिनाथ कुडले, मल्लिकार्जुन पाटील, संगप्पा केरके, आडत व्यापारी मल्लिनाथ बिराजदार, अण्णाराव पाटील, बसवराज बिराजदार, मधुकर बिराजदार हणमंत बगले, पंडित पुजारी, चिदानंद पुजारी, मल्लप्पा पाटील आदी उपस्थित होते.

# वाढेगावच्या त्रिवेणी संगमावर भाविकांची अलोट गर्दी






**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १५ फेब्रुवारी-**

सांगोला तालुक्यातील वाढेगाव येथील त्रिवेणी संगमावरील पुरातन महादेव मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. येथे माण, कोरडा आणि अपरूपा या तीन नद्यांचा पवित्र त्रिवेणी संगम आहे. यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे नदी पात्रात मुबलक पाणी उपलब्ध आहे. निसर्गरम्य परिसर आणि वाहत्या पाण्यामुळे या परिसराचे सौंदर्य अधिकच खुलले असून महाशिवरात्रीनिमित्त येथे भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. श्रावण महिना, महाशिवरात्र आणि प्रत्येक सोमवारी या ठिकाणी भाविकांची मांदियाळी असते. या पवित्र क्षेत्राचे पावित्र्य जपण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक वैजीनाथकाका घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली नदी पात्रात आणि मंदिर परिसरात स्वच्छतेचे मोठे कार्य सातत्याने राबवले जात आहे. त्यांच्या या कार्याचे भाविकांकडून कौतुक होत आहे. तसेच महाशिवरात्रीनिमित्त देवस्थान समितीच्या वतीने दर्शनासाठी आलेल्या भाविकांना मोठ्या प्रमाणावर प्रसादाचे वाटप करण्यात आले.

### चैतन्य हास्य योग मंडळाची निसर्ग सहल

महाशिवरात्रीचे औचित्य साधून सांगोला येथील चैतन्य हास्य योग मंडळातर्फे या त्रिवेणी संगम परिसरात एकदिवसीय निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. कृष्णा इंगोले, प्रा. राजेंद्र ठोंबरे, बाळासाहेब वाघमारे, भीमाशंकर पैलवान, नारायण विसापूरे, भाऊसाहेब पवार, सुधाकर म्हेत्रे, जयसिंग खडतरे, गजानन खडतरे, सुभाष महिमकर, शंकर डोंबे, सुरेश कांबळे, देवदत्त केदार, विश्वेश्वर कोठावळे, जयंत तेली तसेच महिला सदस्य मंगल इंगोले, स्मिता इंगोले, गंगुबाई पवार यांनी सहभाग नोंदवला.

## महत्वाचे...

### शहराच्या मध्यवर्ती भागातून चोरीला गेली दुचाकी

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

शहराच्या मध्यवर्ती भागातून २० हजार रुपयांची काळी रंगाची सीबी युनिकॉर्न मोटरसायकल चोरीला गेली आहे. बाबतचा गुन्हा पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. दिनांक ४ फेब्रुवारी रोजी स्मृती मंदिर सोलापूर येथे सोमनाथ पेंटप्पा कस्तुरी राहणार १६ शास्त्रीनगर यांची २० हजार रुपयांची काळी रंगाची सीबी युनिकॉर्न मोटरसायकल क्रमांक एम एच १३ बीटी १२६६ स्मृती मंदिर येथे पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. सदर बाझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास चव्हाण करत आहेत.



### पायी चालत जाताना कारचालकाने दिली धडक

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

पायी चालत जात असताना, पांढऱ्या रंगाच्या कार चाकीने धडक देऊन एक व्यक्ती जखमी झाले. कारचालक हा तेथे न पसार झाला असून फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी हॉटेल आंबेसेडर समोर पायी चालत जात असताना, जुना पुना नाकाकडून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या कार चालकाने वाहन हायगायीने, निष्काळजीपणे चालवून सचिन भरत सुरवसे वय ४५ राहणार जुना कारंबा नका यांना धडक देऊन त्यांना डाव्या पायास गंभीर जखम झाली, कारचालक हा तेथे न थांबता निघून गेला. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मुलाणी करत आहेत.

### बोअरमधील पाण्याच्या पाच मोटर नेल्या चोरून

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

८५ हजारांच्या पाच एचपी हिरव्या रंगाची बोर मधील पाण्याची इलेक्ट्रिक मोटर व काळ्या, भगव्या रंगाची केबल, स्टार्टर, बोर्ड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे घटना विजापूर पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, दि. १२ फेब्रुवारी रोजी विक्टरी हॉर्टिकल्चर अँड फार्मासिटिकल प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीची जमीन एस आर पी कॅम्प सोरेगाव, विजापूर रोड येथे ८५ हजारांची टेक्समो कंपनीचे पाच एचपी हिरव्या रंगाची असणारे बोर मधील पाण्याची इलेक्ट्रिक मोटर व काळ्या, भगव्या रंगाची केबल, स्टार्टर, बोर्ड अज्ञात चोरट्याने इरेश मल्लिनाथ मंटूरकर ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर यांची चोरून नेली आहे. याबाबत विजापूर नका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास शिर्के करीत आहेत.




### महिलेला रिक्षा चालकांने दिली धडक

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

राहत्या घरापासून दर्शन घेऊन संतोषी माता मंदिर येथे दर्शनासाठी रस्ता ओलांडून जात असताना रिक्षा चालकाने भरधाव वेगाने एका महिलेस धडक दिली. त्यामध्ये महिला गंभीर जखमी झाल्या. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, दि.१ फेब्रुवारी रोजी गोविंदश्री मंगल कार्यालय शिवगंगा नगर येथील संतोषी माता मंदिर येथे रणजीतसिंह अशोक पाटील, वय ४० राहणार ब्रह्मपुरी ता. मंगळवेढा, जि. सोलापूर यांची आई रत्नप्रभा अशोक पाटील या राहत्या घरापासून दर्शन घेऊन शिवगंगा नगर येथील संतोषी माता मंदिर येथे दर्शनासाठी रस्ता ओलांडून जात असताना रिक्षा क्रमांक एम एच १२ व्हीबी २०३९ च्या चालकाने भरधाव वेगाने निष्काळजीपणे वाहन चालवल्याने रत्नप्रभा यांना डोक्याला व चेहऱ्याला मार लागून त्या गंभीर जखमी झाल्या. विजापूर नाका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास फुलारी करत आहेत

# वारशाच्या प्रकाशात उजळला मार्डी; इंटॅकच्या दीपोत्सवातून इतिहास जागा




### मशिदीमध्ये हेमाडपंथी मंदिराचे अवशेष

मार्डी हे केवळ धार्मिक स्थळ नसून स्थापत्यकलेचे एक महत्त्वाचे उदाहरण आहे. गावातील एका मशिदीमध्ये हेमाडपंथी मंदिराचे अवशेष वापरले गेल्याचे दिसून येते. दगडी स्तंभ आणि शिल्पांवरून मध्ययुगीन स्थापत्यकलेचा प्रभाव स्पष्ट होतो. अशा ठेव्यांचे वैज्ञानिक पध्दतीने दस्तऐवजीकरण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त झाले.

## पायऱ्यांच्या विहिरीतून परंपरेचा दीप

## दीपोत्सवातून सांस्कृतिक जतनाचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**

इंटॅकच्या वतीने वारसा संवर्धनाचा संदेश देणारा भव्य दीपोत्सव मार्डी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाशिवरात्रीच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमाने स्थानिक ऐतिहासिक स्थळांना नव्या प्रकाशात आणत सांस्कृतिक जतनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली.

सोलापूरपासून सुमारे १९ किलोमीटर अंतरावर वसलेले मार्डी हे गाव सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जपणारे केंद्र म्हणून ओळखले जाते. हेमाडपंती स्थापत्यशैलीतील मंदिरे, शिलालेख आणि सुबक शिल्पांनी सजलेली प्राचीन विहीर यामुळे या परिसराला ऐतिहासिक महत्त्व लाभले आहे.

येथील यमाई देवी आदिशक्तीची स्वरुप मानली जाते. तिच्या मंदिरांशी दीर्घ धार्मिक परंपरा जोडलेली असून महाराष्ट्रातील विविध भागांतील भाविक येथे श्रध्देने येत असतात. नागनाथ मंदिराच्या परिसरातील दगडी शिल्प, विहिरींचे अवशेष समृध्द स्थापत्य परंपरेची साक्ष देतात.

प्रारंभी नागनाथ मंदिरातील श्री महादेवाच्या दर्शन घेण्यात आले. 'पापनाश तीर्थ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विहिरीसह विविध पवित्र स्थळांना भेटी देण्यात आली. यमाई परिसरातील पायऱ्यांची प्राचीन विहीर 'स्टेप वेल' येथे दीपोत्सव साजरा करण्यात आला.

दीपांच्या मंद प्रकाशात उजळलेली पायऱ्यांची विहीर जणू इतिहासाच्या दालनात घेऊन जाणारा अनुभव ठरली. हजारो वर्षांच्या स्थापत्य परंपरेचा वारसा जपणाऱ्या अशा स्थळांचे संरक्षण हे केवळ प्रशासनाचे नव्हे, तर समाजाचेही कर्तव्य असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या वारसा फेरीत जिल्हा परिषद सदस्य इंद्रजीत पवार, यमाई माता मंदिराचे मुख्य पुजारी रंगनाथ गुरव यांच्यासह प्रा.डॉ. नरेंद्र काटीकर, श्वेता कोठावळे, नितीन अणवेकर, पुष्पांजली काटीकर, श्रीकांत अंजुटगीकर, प्रा.भीमगोंडा पाटील, अच्युत काटीकर, अतुल देशपांडे, डॉ.तळभंडारे आदी सामील झाले होते.

### इंटॅकच्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद

गावातील विविध ठिकाणी विखुरलेल्या मूर्ती, शिलालेख आणि प्राचीन अवशेषांचे एकत्रित संग्रहालय उभारावे, अशी सूचना इंटॅकच्या वतीने करण्यात आली. या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देत इंद्रजीत पवार यांनी मंदिर परिसर सुशोभीकरण, वारसा स्थळांचे संवर्धन आणि संग्रहालय उभारणीसाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

# स्वीकृत नगरसेवक निवड संदर्भात तर्कवितर्कांना उधाण

## विविध क्षेत्रांसह समाजघटकांकडून रेटा

## राजकीय विरहित व्यक्तींच्या निवडीची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**



सोलापूरसह महाराष्ट्रातील विविध महानगरपालिकांमधील स्वीकृत नगरसेवक निवडीसंदर्भात राज्य शासनाच्या नगरविकास खात्याने नव्याने जाहीर केलेल्या निकषाकडे लक्ष वेधताना नव्या निकषानुसार की पुर्वीप्रमाणे राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांना या पदांवर संधी दिली जाणार? याविषयी तर्कवितर्कांना उधाण आल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, नगरविकास खात्याच्या नव्या निकषानुसारच राजकीय विरहित व्यक्तींची या पदावर निवड करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आपल्या क्षेत्रातील, समाजातील व्यक्तींना या पदावर संधी द्यावी, असा रेटा लावण्यात येत आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या एकूण १०२ जागांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करत तब्बल ८७ जागा आपल्या पारड्यात पाडून घेतले. गटनेता, महापौर, उपमहापौर पदाच्या निवडीनंतर आता स्वीकृत नगरसेवक, स्थायी समिती, परिवहन समितीच्या निवडीकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे. स्वीकृत नगरसेवक पदासाठी सत्ताधारी भारतीय जनता पार्टीकडे शेकडो अर्ज आलेले आहेत.

स्वीकृत नगरसेवकपदाच्या एकूण १० जागा असून या पदासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांच्यासह आणखी तीन ते चार जणांची नावे जवळपास निश्चित मानली जात आहे. श्रीसिध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, राष्ट्रीय जलतरणपटू राघवेंद्र मिठ्ठाकोल, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, मातंग समाजाचे राज्य समन्वयक सुरेश पाटोळे, मराठा समाजाचे श्रीकांत घाडगे यांचीही नावे स्वीकृत नगरसेवकपदासाठी पुढे केली जात आहेत. महापौर चषक, क्रीडा स्पर्धा, जलतरण तलाव, क्रीडांगणे, खेळाडुंचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने एखादा क्रीडा प्रतिनिधी असणे गरजेचे आहे. दिव्यांग असूनही राघवेंद्र मिठ्ठाकोल यांनी 'जलतरण'मध्ये राज्य व राष्ट्रीय पातळीवर सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यामुळे राघवेंद्र मिठ्ठाकोल यांना स्वीकृत नगरसेवक पदावर संधी द्यावी, अशी मागणी क्रीडाप्रेमींतून केली जात आहे.

# समाजकार्याचे यशस्वी प्रयोग समाजव्यापी व्हावेत : अतुल लिमये

## 'जनकल्याण'च्या वतीने दादा लाड, महंत भारतभूषणदासजी यांना 'श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान

## समाजाचे शासनावरील अवलंबित्व वाढत चालले

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.१५ फेब्रुवारी-**

प्रत्येक क्षेत्रात परिवर्तनाचे अनेक यशस्वी प्रयोग वैयक्तिक पातळीवर सुरु आहेत. मात्र, हे केवळ व्यक्तीपुरते मर्यादित न राहता समाजव्यापी होण्याची गरज आहे. तसे झाल्यास अशा प्रयोगांतूनच खऱ्या अर्थाने व्यवस्था परिवर्तन घडून येईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या वतीने आयोजित 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी डॉ.अभय फिरोदिया यांची प्रमुख उपस्थिती होती. दादा लाड यांना संशोधन तर महंत भारतभूषणदासजी यांना समाजप्रबोधन क्षेत्रासाठी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.



समाजाचे शासनावरील अवलंबित्व वाढत चालले असून, यामुळे समाज अपंग बनण्याची भीती आहे. हे अवलंबित्व कमी करण्यासाठी समाज बदलवणाऱ्या यशस्वी प्रयोगांचा अनुकरणीय आराखडा तयार करुन आदर्श कार्यप्रणाली विकसित करणे आवश्यक आहे, असेही अतुल लिमये यांनी सांगितले. आजकाल अनेक लोक हिंदुत्वाबद्दल मनात कटुता बाळगून असल्याचे चित्र दिसत आहे असे सांगून डॉ.अभय फिरोदिया म्हणाले, भारतातील बौद्ध, जैन, शीख आणि वैदिक यांची एकत्रित परंपरा म्हणजेच हिंदुत्व होय. हिंदू धर्म ही एक जीवनपद्धती आणि विचारधारा असून, तिला प्रत्यक्ष कृतीत आणण्याची प्रक्रिया म्हणजे हिंदुत्व होय.

आपल्या सन्मानादाखल उत्तर देताना भारतभूषण महाराज म्हणाले, सनातन परंपरा आपल्याला जीवन जगण्याची कला शिकवते. समाजाला वैभवशाली बनविण्यासाठी व्यावहारिक कार्याबरोबरच आत्मिक शांतीसाठीही प्रयत्न करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मूल्यमापन बाहेर राहून करता येणार नाही, त्यासाठी संघात प्रत्यक्ष सहभागी व्हावे लागेल. दादा लाड म्हणाले, संपूर्ण जगाला कापडाची देणगी देणाऱ्या भारताचे कापूस हे मुख्य नगदी पीक आहे. विदर्भातील आत्महत्यांना दुर्दैवाने कापूस पिकाशी जोडले गेले. कापसाचे उत्पन्न वाढवायचे असेल, तर बोंडाचे वजन वाढणे गरजेचे आहे. मी कापूस पिकाची गळफांदी काढून फळफांदी लांबवण्याचे तंत्र विकसित केले. त्यामुळे एकरी उत्पन्न ४ ते ५ क्विंटलवरून थेट १५ क्विंटलपर्यंत पोहोचले. जनकल्याण समितीचे अध्यक्ष डॉ.अजित मराठे यांनी प्रास्ताविक केले. कार्यवाह राजन गोऱ्हे यांनी स्वागत केले. चिंचवडच्या पूर्वांचल छात्रावासमधील विद्यार्थ्यांनी संपूर्ण वंदे मातरम सादर केले. सेवा भारती संस्थेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सचिव प्रदीप सबनीस यांनी आभार मानले. प्रा.डॉ.प्रांजली देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

### एक कोटींची देणगी

जनकल्याणाच्या कामाला प्रोत्साहन देणे, मदत करणे असे महत्त्वपूर्ण काम जनकल्याण समिती करत आहे. समाजाच्या उत्कर्षाचे हे फार मोठे साधन आहे, अशा शब्दात जनकल्याण समितीच्या कार्याचा गौरव डॉ. अभय फिरोदिया यांनी केला. या कार्यासाठी त्यांनी एक कोटी रुपयांची देणगी देत असल्याचे यावेळी जाहीर केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# डम डम डम डमरु बजे, भोलेनाथ शिव शंभो बजे...

**रुद्राभिषेक, बिल्वार्चन, भजनादी कार्यक्रमांची रेलचेल**

**आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुषांनी केली शिवआराधना**

**मंदिर परिसरात थाटली होती पुजा साहित्यांची दुकाने**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**

''ब्रम्ह मुरारी सुरारचित लिंगम्... हे भोळ्या शंकरा, आवड तुला बेलाची... जय जय शिवशंकर... शंकरा नाद स्वरुपा... डम डम डम डमरु बजे, भोलेनाथ शिव शंभो बजे... हर कंकर मे शंकर... शंभो शंकरा... कैलास राणा शिवचंद्रमौळी...'' यांसारख्या एकापेक्षा एक अवीट गीतांचे श्रवण करत महाशिवरात्रीचे औचित्य साधून भगवान शंकराचे दर्शन घेण्यासाठी शिवमंदिरात भक्तांनी गर्दी केली होती.

महाशिवरात्रीनिमित्त त्या-त्या ठिकाणच्या शिवमंदिरात रुद्राभिषेक, बिल्वार्चन, भजनादी कार्यक्रमांची रेलचेल सुरु होती. शिवआराधना करण्याच्या अनुषंगाने आबाल-वृध्द, स्त्री-पुरुष शिवमंदिराच्या दिशेने पायी चालत निघाले होते. शहरतील विविध मंदिर परिसरात पुजा साहित्यांची दुकाने थाटण्यात आली होती. आजच्या दिवशी अनेकांनी उपवासही केला होता.



## 'वीरतपस्वी'च्या प्रांगणात फुलला भक्तीचा मळा





अक्कलकोट रस्त्यावरील वीरतपस्वी मंदिरात 'श्रीं'च्या दर्शनासाठी भाविकांनी अशी गर्दी केली होती. (छायाचित्रः केवल तिवारी)

### १००८ शिवलिंगाचे दर्शन, दीपोत्सव, मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीनिमित्त अक्कलकोट रस्त्यावरील बृहन्मठ होटगी संस्थेच्या वीरतपस्वी मंदिरसह परिसरात भक्तांचा जणू मळा फुलला होता. येथील श्रीशैलपीठाचे आद्य जगद्गुरु पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या लिंगोद्भव मूर्तीचे व तिच्याभोवती असलेल्या १००८ शिवलिंगाचे दर्शन घेताना भक्तगण कृतकृत्य होत होते. महाशिवरात्रीनिमित्त बिल्वार्चना, रुद्राभिषेक, दीपोत्सव, मिरवणूक, महामंगलारती, भजन, शोभेचे दारुकाम आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अक्कलकोट रस्त्यावरील श्री वीरतपस्वी मंदिरातील पंचमुखी परमेश्वर लिंग व बाळीवेस येथील मठात जगद्गुरुंच्या मुर्तीस महारुद्राभिषेक करण्यात आले. सकाळी ८ वाजता थोबडे यांच्या वाड्यातून श्री पंडिताराध्य लिंगोद्भव मुर्तीचे मठात आगमन झाल्यानंतर रथपूजा करुन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. चिटगुपाचे गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सानिध्यात उत्तर कसबा, होटगी मठ, मल्लिकार्जून मंदिर, मंगळवार पेठ पोलिस चौकी, कुंभार वेस, मधला मारुती, कन्ना चौक, जोडबसवणा चौक, अक्कलकोट नाका या मार्गावरुन मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत बैलजोडी, शंकराची मूर्ती, शिवलिंग, रेणुकाचार्यांची मूर्ती, जगद्गुरु पंडिताराध्य, जगद्गुरु



विश्वाराध्य, वीरतपस्वी यांच्या प्रतिमा, सनई, चौघडा, हलगी, बॅन्डपथक, संस्थेच्या विविध प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, अध्यापक व शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे झेंडा, टिपरी, लेझीम, झांज व पारंपारिक वेशभूषेतील नृत्य पथक सामील झाले होते. मधला मारुती व्यापारी संघटना, डी.एन. सुगंधी, हरी ओम विणकर बाग बहुउद्देशीय संस्था आदि सामाजिक संघटनानी उपवासाच्या फराळाचे व पाण्याची व्यवस्था केली होती.

एमआयडीसीस्थित वीरतपस्वी मंदिर येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता संस्थेकडून दर्शनी भागात व मंदिरात बेरीगेट्स लावण्यात आलेले होते. पुरुष व स्त्रिया यांचे स्वतंत्र रांग करण्यात आलेली होती. पार्किंगची व्यवस्था व पोलिसांच्या चोख बंदोबस्ताबरोबरच विविध ठिकाणी संस्थेतील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यामुळे तोबा गर्दी असूनही भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता आल्याचे भाविकांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

**प्रसाद वाटप, रांगोळीतून प्रतिमा, भावगीतांचा कार्यक्रम**

महाशिवरात्रीचे औचित्य साधून श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत श्री वीरतपस्वी अन्नछत्रात प्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली होती. १ लाखापेक्षा जास्त भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला. मल्लिनाथ जमखंडी यांनी वीरतपस्वी मंदिरात १५१५ फूट आकाराचे जटाधारी महादेवाचे तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर येथील वर्षा वाले यांनी १५२२ फूट आकाराचे वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रतिमा रांगोळीतून साकारली होती. संस्थेच्या वतीने प्रसिध्द कलाकार अतुल बेले यांच्या संगीत संध्या या भाव-भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## ग्रामदैवत सिध्देश्वर मंदिरात 'ओम नमः शिवाय'चा गजर





**तभा, वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. १५ फेब्रुवारी-**

'देवाधिदेव महादेव ॐ नमः शिवाय हर हर महादेव!' या जयघोषाने सारा परिसर दुमदुमून गेला होता. निमित्त होते महाशिवरात्रीचे. सोलापूर शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिद्धेश्वर मंदिर येथे पहाटेपासूनच आबालवृध्द भाविकांची दर्शनासाठी एकच मांदियाळी उसळली होती.

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त पहाटे साडेपाच वाजल्यापासून विविध धार्मिक कार्यक्रमांची सुरुवात झाली. काकड आरती, रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक, महाआरती, बिल्वपत्र अर्पण, १०८ नामावली पठण, पालखी प्रदक्षिणा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिराचे पुजारी गुरुराज हब्बू यांनी सांगितले की, यंदा प्रतिवर्षीपेक्षा अधिक भाविकांनी उपस्थिती लावली असून सोलापूर शहर जिल्ह्यासह आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा येथील शिवभक्तांचा मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून आला.





**मल्लिकार्जून मंदिरात गर्दी**

महाशिवरात्रीनिमित्त बाळीवेस परिसरातील मल्लिकार्जुन मंदिरात 'श्रीं'चे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी अशी गर्दी केली होती.





**आर्ट ऑफ लिव्हिंग**

महाशिवरात्रीनिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने जामगुंडी मंगल कार्यालयात रुद्राभिषेक करण्यात आला.

## मुस्लिम तरुणाने खिचडी वाटप करुन दिला ऐक्याचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**



महाशिवरात्री आणि स्वतःचा वाढदिवस यानिमित्त रिहान अन्सारी या मुस्लिम तरुणाने सिध्देश्वर मंदिरात भाविकांना खिचडी वाटप करुन ऐक्याचा संदेश दिला. महाशिवरात्रीच्या दिवशी भक्तगण उपवास करतात; त्यामुळे रिहान अन्सारी यांनी सुमारे वीस किलो शाबुदाणा खिचडी बनवून वाटप केले. याप्रसंगी अजित गव्हाणे, मोसिन अन्सारी, राहुल साळुंखे, सचिन पवार यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता. आपला वाढदिवस महाशिवरात्रीला आला, याचा आनंद आहे. यादिवशी उपवास करणाऱ्या भाविकांना खिचडी वाटप करून वाढदिवस साजरा करावा, असे मनात आले. समाजाला आपण काहीतरी देणे लागतो, ही भावना यातून व्यक्त करायची होती, असे रिहान अन्सारी यांनी सांगितले. आजच्या काळात धर्मभेद आणि जातीय तणावाच्या घटना घडत असताना रिहान अन्सारी याने दाखवलेला हा सामाजिक संदेश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.



## सोरटी सोमनाथ शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीनिमित्त विजापूर रस्त्यावरील सदिच्छा नगर येथील श्री दत्त स्वामी समर्थ मंदिरात प्रति सोरटी सोमनाथ शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी महारुद्राभिषेक, तांदुळ पूजा, नवग्रह, पंचकलश, अष्टदिप्पालक, स्वस्तिक पुण्यवाचन, नंदी समाराधन, शिवपार्वती रुद्रयाग आदी पूजापाठ करण्यात आले.

यावेळी इरेश हिरेमठ, नागनाथ सुरवसे, मोहन भालेराव, रवी कनुरे, फुलसिंग राठोड, इरय्या स्वामी, अंबादास चव्हाण, रामचंद्र भंडारे, गजानन कुंभार, अतुल कंदले, मस्के, इंगळे, सारवाडकर, मिळकुंडे, अशोक तरंगे, लोहार, बिराजदार, मोफरे, राहुल चौधरी, बालाजी आलूरे यांच्यासह भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुळे सोलापुरातील मल्लिकार्जून मंदिरात महाशिवरात्र महोत्सव साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

जुळे सोलापूर श्रीशैल नगरमधील श्री मलिकार्जून मंदिरात महाशिवरात्र भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. रुद्राभिषेक, आरतीने दिवसभरातील कार्यक्रमांना प्रारंभ करण्यात आला. शिवभजनद्वारे मंदिरसह परिसरात भक्तीमय वातावरण बनले होते. मंदिर परिसर आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता.

रात्री बारा वाजता महाआरती संपन्न झाली. यावेळी हर हर महादेवच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. श्री मलिकार्जून मंडळाच्या सहकार्याने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या प्रतिमेला 'भाजपा'च्या कार्यकर्त्यांनी मारले जोडे

**लांगुनचालुन करणे ही काँग्रेसची जुनी सवय**

**मतांसाठी, तुष्टीकरणासाठी अपमान करणे घृणास्पद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टीपू सुलतान यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवन येथे हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मार आंदोलन केले. 'भाजपा'च्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या 'त्या' वक्तव्यावरुन काँग्रेस पक्षाची मूळ भूमिका दिसून येते. राजकीय फायद्यासाठी लांगूलचालन करण्याची काँग्रेसची ही जुनी सवय आहे.

मतांसाठी व तुष्टीकरणासाठी शिवरायांचा अपमान करणे घृणास्पद प्रकार आहे. हा मराठी अस्मितेवर एक प्रकारचा घालाच आहे. छत्रपती शिवरायांचा अवमान केल्याबद्दल हर्षवर्धन सपकाळ यांनी शिवप्रेमींची माफी मागितली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

सभागृह नेते नरेंद्र काळे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपूबरोबर होते तेव्हा काँग्रेसी नीच मानसिकतेचा कडेलोट होतो. ज्यांच्यामुळे स्वराज्य मिळाले, त्या शिवबांचा हा अपमान महाराष्ट्र कधीच सहन करणार नाही.

यावेळी ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, नगरसेविका श्रीकांचना यन्नम, नगरसेवक भारत बडूरवाले, सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, रवी कय्यावाले, नागेश सरगम, अक्षय अंजीखाने, साधना संगवे, सुधा अळ्ळीमोरे आदी उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १३५७

**नेम जया नाहीं एकादशी व्रत ।**
**जाणावें तें प्रेत सर्व लोकीं ।।**

गरीबी श्रीमंतीची दरी अनेक देशात आजही कमी अधीक प्रमाणात अदयापही असल्याचे दिसून येते. एकीकडे अन्नासाठी भटकणारी तर दुसरीकडे अन्नाची नासाडी करणारी मंडळी आहे. ईश्वराजवळ जाण्यासाठी किंवा ईश्वराच्या सहवासात रहायला मिळावे म्हणून मन:पूर्वक उपवास करणारी आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार पोटाला आराम मिळावा म्हणून उपवास करणारीही मंडळी आहे. घरात असूनही किंवा घरात नसूनही भावनेपोटी काही लोक उपवास करण्यात आनंद मानतात. तर दुसरीकडे इच्छा नसतांनाही शरीर मोठ्या प्रमाणावर वाढून रोगराई होऊ नये म्हणून उपवास करतात. कोणत्या का पध्दतीने किंवा कोणत्या का कारणास्तव लोक उपवास करेनात, त्याचा परिणाम हा चांगलाच होतो. उपवासामुळे तेवढे अन्न बचत होते. हे बचत झालेले अन्न भुकेल्याच्या कामी येऊ शकते. उपवास धरणाऱ्याला भुकेचे महत्वही समजते. आपली भूक समजली म्हणजे इतरांच्या भुकेची जाणीव तरी होऊ शकते. अशी कोणती का कारणे



असेनात, पण वारकरी सांप्रदायामध्ये उपवासाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. माणूस दिवसभरातून अनेकवेळा खाण्या-पिण्याचा विचार करीत असतो. खाण्या-पिण्यात बराच वेळ तो घालवतो. पंधरवाड्यातून एखादा दिवसतरी खाण्या-पिण्यात वेळ न घालवता भगवंताचे नामस्मरण करावे म्हणून उपवास धरला तर ते व्रत मानले जाते. या व्रताच्या दिवशी मन अन्नाकडे धांव न घेता ते भगवंत चरणी स्थिर केले जाते. पंधरवाड्याला एखादा दिवस तरी भगवंतासाठी द्यायला मिळावा म्हणून तरी व्रत करायला हवे. कसलाही उपवास, नियम न करता सतत खाण्या-पिण्यावर लक्ष देणाऱ्याला वैद्य उपवासाचा सल्ला देतात. वैद्याचा सल्ला ऐकला नाही तर हा देह मृत्यूकडे, रोगराईकडे लवकर धांव घेऊ शकतो. वैद्याप्रमाणे संतांनीही उपवासाचा सल्ला दिला आहे. वैद्याचा सल्ला शरीरासाठी आहे तर संतांचा सल्ला भावासाठी आहे. उपवासाचे महात्म्य असणारे एकादशी व्रत जो कोणी करीत नसेल त्याचा देह हा प्रेताप्रमाणे आहे, असे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**नेम जया नाहीं एकादशी व्रत ।**
**जाणावें तें प्रेत सर्व लोकीं ।।**

माणसाने आपल्या भावना जोपासण्यासाठी, मनाला स्थिरत्व प्राप्त करुन देण्यासाठी तरी उपवास करायला हवा. वैद्यांचा सल्ला घेण्याची वेळ येऊ देण्यापेक्षा संतांचा सल्ला मानला तर जास्त बरे होईल. मन:पूर्वक एकादशी व्रत केले तर पंचपक्वान्नावर सुध्दा मन जात नाही. अर्थात, अन्नासाठी धावणारे मन, स्थिर होते. मनाला, इंद्रियांना स्थिर करण्यात उपवासाची चांगली मदत होते. उपवासास वैज्ञानिक जोड असल्याने एकादशीचा नियम घालून घेतलेला बरा. उपवासामुळे सात्वीक वृत्ती वाढण्यास मदत होते. उपवासाच्या काळात अन्नावर मन धांव घेणार नाही, असे मनावर नियंत्रण ठेवावे. मनावर नियंत्रण ठेवण्याची सवय इतर बाबतीतही कामी येते. उपवासाच्या, एकादशीच्या निमित्ताने चांगल्या विचारांची आठवण होते. उपवासाची महती ही केवळ सांगण्या, ऐकण्याची नसून ती अनुभवण्याची असल्याने, आपण उपवासाचा अनुभव घ्यावा. उपवासाचा आनंद काही वेगळाच असल्याचे लक्षात येईल. वारकरी मंडळी कसल्याही अडचणीत एकादशी करतातच. आपणही करुन पहावे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस


**वार : सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ चतुर्दशी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- श्रवण (२०.४७)**
**योग - वरियान (२५.४९)**
**करण - चतुष्पाद (२९.३६)**
**राहू काल : सोमवार : स. ७.३० ते ९.००**


**दिनविशेष :**
**सोमवती अमावस्या.**
**(१९४४): भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक धुंडिराज गोविंद फाळके यांचे निधन.**
**लिथुएनिया स्वातंत्र्य (१९१८): लिथुएनियाने रशिया व जर्मनीपासून स्वातंत्र्य जाहीर केले.**
**हिजबोल्ला स्थापना (१९८५): लेबनॉनमध्ये या कट्टरपंथीय शिया मुस्लीम संघटनेची स्थापना झाली.**

## प्रा. डॉ. कुलकर्णी यांना भानुमते स्मृती जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

या वर्षीच्या स्व.प्रा. डॉ. चंद्रकांत भानुमते स्मृती जीवन गौरव पुरस्कारासाठी सांगोला महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्रा.डॉ.बी.एच. कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी माऊली महाविद्यालय, वडाळा येथे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रा.डॉ. शीला भानुमते यांनी पत्रकार परिषदेत दिली.





सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख स्व. प्रा. डॉ. चंद्रकांत भानुमते यांचे ४ जानेवारी रोजी आकस्मिक निधन झाले. सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे ते कार्यकारिणी सदस्य होते. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सपत्नीक सन्मानपूर्वक प्रदान केला जातो. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व पुष्प गुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे, असे निवड समिती सदस्य प्रा. उत्तमराव हुंडेकर यांनी सांगितले. यापूर्वी प्रा.डॉ. दामजी, प्रा.जी एस हरकुड, प्राचार्य डॉ जी. एन. चिट्टे, प्राचार्य डॉ. आ.गो. पुजारी, प्रा. उत्तमराव हुंडेकर, प्रा.पी. के. शहा यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार निवड समितीमध्ये सदस्य म्हणून भानुमते व रामपूरे परिवाराच्या वतीने प्रा. उत्तमराव हुंडेकर, प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी व प्रा. डॉ. संग्राम चव्हाण यांनी काम पाहिले. यावेळी परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. संतोष कदम, परिषदेचे सचिव डॉ. अमोल खाडे, प्राचार्य डॉ. शिरीष भोसले, प्रा.डॉ. शंकर राजे, प्रा.डॉ. अविनाश जम्मा, प्रा. डॉ. बद्रीनाथ दामजी, प्रा. डॉ. संग्राम चव्हाण उपस्थित होते.

# माढ्यात आता सार्वजनिक मिरवणूका होणार डीजे मुक्त

### सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित शिंदे; सर्व जयंती उत्सव मंडळ व नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १५ फेब्रुवारी-**

माढा शहर व परिसरातील गावातील महापुरुषांच्या मिरवणुका डीजे मुक्त करणार असल्याचे माढा पोलीस स्टेशनचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित शिंदे यांनी सांगितले.

माढा पोलीस स्टेशनचे तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांची सातारा येथे बदली झाली असून त्यांच्या जागी सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित शिंदे हे माढा पोलीस स्टेशन येथे शुक्रवारी हजर झाले आहेत. माढा येथे पदभार स्वीकारण्यापूर्वी ते करमाळा येथे कर्तव्यास होते.



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर माढा पोलीस स्टेशन येथे पोलीस पाटील व जयंती मिरवणुकीच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळेस त्यांनी असे सांगितले की न्यायालयाच्या निर्णयानुसार डीजे वापरण्यावर पूर्णतः बंदी आहे. डीजेच्या कर्कश आवाजाचा हॉस्पिटलमधल्या आजारी माणसांना वयोवृद्ध लोकांना त्यांच बरोबर नवजात बालकांना त्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास सोसावा लागतो. अनेक ठिकाणी डीजेच्या आवाजामुळे अनेकांना श्रवणदोष झाले आहे.डीजेचा आवाज नागरिकांच्या आरोग्यासाठी अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे माढा पोलीस स्टेशनने डीजे मुक्त मिरवणुका करण्याचा घेतलेल्या निर्णयाला नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन एपीआय शिंदे यांनी केले आहे.यापुढे कोणत्याही मिरवणुकीमध्ये डीजेच्या कर्कश आवाजावर बंदी असणार आहे. न्यायालयाने आवाजाच्या डीसीबल वर न्यायालयाने घातलेल्या बंदीचे काटेखोरपणे पालन करणार आहोत. महापुरुषांच्या विचारांचा वारसा आपण जपत आहोत त्यांच्या विचारांना शोभेशी जयंती साजरी होण्यासाठी डिजे मुक्त मिरवणूक करून यामध्ये पारंपारिक वाद्याचे समावेश करू मिरवणुका उत्साहात साजऱ्या करू असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपनिरीक्षक मोहम्मद शेख, गोपनीयचे आर. आर. माने, पो हवालदार एन.पी. बोराडे, पो. देविदास शिंदे उपस्थित होते.




## आस्था रोटी बँकेतर्फे गरजूंना फराळ वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

आस्था फाउंडेशन संचलित आस्था रोटी बँक यांच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त गरजू, निराधार व रुग्णांच्या नातेवाईकांना उपवासाच्या फराळाचे वाटप करण्यात आले.

महाशिवरात्र निमित्त भगवान शंकराच्या प्रतिमेचे पूजा करण्यात आले. यावेळी सुनील शरणार्थी, सचिन कुलकर्णी, ॲड. नीता मकणी, ॲड. साधना सांगवी, प्रभा कोडले, आस्था रोटी बँकेचे सल्लागार राजू हौशेट्टी, आस्था रोटी बँकेचे विजय छचुरे उपस्थित होते. सिव्हिल हॉस्पिटल मधील पेशंट व नातेवाईकांना तसेच निराधार वृद्धाश्रम व झोपडपट्टी भाग व इतर गरजूंमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. साबुदाणा खिचडी, राजगिरा लाडू, वेफर्स, खजूर, ताक, शेंगदाणे लाडू व फळांचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्या सिंघम, सविता जोशी, संपदा जोशी, स्नेहा वनकुद्रे, अनिता तालीकोटी, पुष्कर पुकाळे, संगीता छंचुरे, मंगल पांढरे, ज्योत्सना सोलापूरकर, कविता स्नेहा, मेहता, विद्या राऊत उमा शाबादे रुक्मिणी लवटे,गीता दळवी अविनाश मार्चला, सुरेखा पाटील, विनोद भोसले, दत्तात्रय दळवी, प्रकाश डोंगरे, अंजली शिरसी, सचिन शिंदे, विजय छंचुरे आदी उपस्थित होते.

## पालिकेत मातंग समाजाचा स्वीकृत नगरसेवक नियुक्त करावा : पाटोळे

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

नुकत्याच झालेल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये देखील मातंग समाजाने भारतीय जनता पक्षाला भरघोस मतदान केले आहे. भारतीय जनता पक्षाने सोलापूर महानगरपालिकेसाठी मातंग समाजातील अनेक इच्छुक उमेदवार पैकी फक्त एका उमदवारालाच उमेदवारी दिली होती. जो बहुमताने निवडून आलेला आहे. सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये मातंग समाजाची १००० ते २००० पर्यंत निर्णायक लोकसंख्या आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आपण यापैकी किमान एका व्यक्तींला स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्त करावे अशी मागणी मातंग समाजाचे नेते तथा राज्य समन्वयक सकल मातंग समाज सुरेश पाटोळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गोरे यांच्याकडे ईमेलद्वारे केली आहे.



## स्वामी विवेकानंद मंडळातर्फे कक्कय्या जयंती साजरी

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

वीरशैव कक्कय्या ढोर समाजाचे आराध्य दैवत, बसवशरण साहित्याचे रक्षण करणारे संत कक्कय्या महाराज यांच्या जयंतीनिमित्त संत वीरशैव कक्कय्या बहुउद्देशीय सामाजिक संस्था आणि स्वामी विवेकानंद युवक मंडळ, रविवार पेठ, ढोर गल्ली यांच्यावतीने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी सूर्यकांत शेरखाने, संजीव धडके, नागनाथ सोनवणे, मुकुंद शिंदे, ॲड. बाबुराव खरात, सतीश शिंदे, रविंद्र गेंट्याल, चंद्रकांत शिंदे, सुनील इंगळे, सुरेश कटकधोंड, शंकर सोनवणे, उमेश सावळकर, सतीश शिंदे, गुरुनाथ जाधव, प्रकाश धडके, सुंदर शिंदे, विकी शिंदे, वैभव पोळ, गणेश शिंदे, गणेश कटकधोंड, विकी धडके, नारायण बोराडे, अनिल कटकधोंड, शक्ती कटकधोंड, कटके, सोनवणे उपस्थित होते.

## सरकारी कामात अडथळा प्रकरणी निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

सरकारी कामात अडथळा व पोलिसाला धक्काबुक्की, शिवीगाळ केल्या प्रकरणी मुंबई येथील मोठ्या व्यावसायिक आरोपी क्रमांक १ विकास बेटश्वर दुबे यांची निर्दोष मुक्तता झाली.

बाळे हद्दीतील मडकी वस्ती, सोलापूर येथे पोलिसांनी बाळे पोलीस चौकी येथून लँड रोव्हर कारचा पाठलाग करून लँड रोव्हर कार मडकी वस्ती येथे अडकून चौकशी करताना तीन आरोपींनी पोलिसांना धक्काबुक्की ,शिवीगाळ व सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी फिर्यादी पोलिसांनी मुंबई येथील तीन आरोपींना (आरोपी क्रमांक १ हा व्यवसायिक होता तर आरोपी क्रमांक २ हा कस्टम अधिकारी व आरोपी क्रमांक ३ हा त्यांचा मित्र होता) अटक करून मे.कोर्टात सन २०१५ साली दोषारोप पत्र दाखल केले दरम्यानच्या काळात आरोपी क्रमांक २ व ३ (ओमप्रकाश शामबिहारी तिवारी, अनंत देवीप्रसाद त्रिपाठी) हे मयत झाल्याने, आरोपी क्रमांक १ विकास बेटश्वर दुबे यांच्या विरोधात सदर खटला मे. सोलापूर जिल्हा आणि सत्र न्यायालय, आर. जे. कटारिया साहेब यांच्या कोर्टात चालला यात सरकार पक्षातर्फे फिर्यादी,दोन साक्षीदार , पंच व तपासिक अंमलदार तपासण्यात आले. उलट तपासातील मुद्दे,बचाव पक्षाचा युक्तिवाद, व सबळ पुराव्या अभावी आरोपीची जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.जे.कटारिया यांनी तारीख ३१/०१/२०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. युवराज जनार्दन आवताडे, ॲड. दादासाहेब भानुदास जाधव, ॲड. गोरख गवळी, ॲड. मकसूद मोमीन, ॲड. रवी कोळी, ॲड. मकसूद मोमीन यांनी काम पाहिले तर सरकारतर्फे ॲड.पी.एस. जन्नू यांनी काम पाहिले.



## एम्स ही ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची लोकचळवळ आहे : डॉ. इक्बाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

आज गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नितांत गरज आहे, मात्र गरीब व मागास विद्यार्थ्यांसाठी अशा शिक्षणाची सुविधा सहज उपलब्ध नसते. त्यामुळे एम्सच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची रूपरेषा तयार करण्यात आली आहे. 'एम्स ही ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची लोकचळवळ आहे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष डॉ. आसिफ इक्बाल यांनी व्यक्त केले.

एशियन इनोव्हेटिव्ह मॉडर्न स्कूल (एम्स) चा स्नेहसंमेलन सोहळा पार पडला. सुप्रभात शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा बालभारती शिक्षण समूहाचे प्रमुख शब्बीर शेख यांच्या हस्ते रोपांना पाणी देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक इरफान केरुल यांनी एम्सचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. जाकीर अत्तार यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक केले, तर सेवानिवृत्त प्रा. सी. जी. अत्तार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. डॉ. सिराज मोमीन, ॲड. अब्दुल जब्बार शेख, अब्दुल गनी कुरेशी, शेरली शेख, नुसरत शेख, शफी कुरेशी, सद्दाम शेख आणि हन्नान शेख आदी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. यावेळी प्रसिद्ध कवी सिराज सोलापूरी, जुबेर शेख आणि सीए मौलाना शेख यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका मिसबा शेख, शाहीन तोडमोड, परवीन शेख, नूरैन शेख, अश्विनी दीपक, दीपक हवाले, मौलाना सादिक, अ. मजीद मो. इसाक, अल्ताफ कुडले, वाईज शेख आणि जैद शेख यांनी परिश्रम घेतले.

## राजराजेश्वरी प्राथमिक शाळेचे अबॅकस परीक्षेत यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेतील ३५ विद्यार्थ्यांनी अबॅकस परीक्षेत उत्तीर्ण झाले. सोलापूरातील श्रद्धा इन्स्टिटयूट मार्फत घेण्यात आलेल्या नॅशनल लेवलच्या अबॅकसची परीक्षेत शाळेतील संस्कृती उंबरजे,स्वाती लवटे, रुद्र पाटकळे, आदर्श संकण्णा हे चार विद्यार्थी दुसऱ्या श्रेणीत खुशी फुलारी, श्रेया कोळेकर, आर्या ढंगापुरे, हरिष पाटील, आरुषी चाबुकस्वार, रोहन चाबुकस्वार, अनविता संकण्णा हे सात विद्यार्थी तिसऱ्या श्रेणीत व उर्वरित सर्व २१ विद्यार्थी चौथ्या श्रेणीत स्थान प्राप्त करुन यश संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना स्वाती शहा व सुरेखा डबरे यांचे मार्गदर्शन लाभले. सुरेखा डबरे यांना बेस्ट स्कूल टिचर अवार्ड मिळाला. शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, ज्येष्ठ शिक्षिका वैशाली गुजर, लक्ष्मण कांबळे, हणमंत कुरे, श्रेयस बिराजदार आदींच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका वैशाली कुंभार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीला वाव देण्यासाठी, एकाग्रता सुधारण्यासाठी, बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी, गणित विषयात एक्सपर्ट होण्यासाठी, तर्क शक्तीत वाढ होण्यासाठी अबॅकस सारख्या परीक्षेची काळाची गरज बनली आहे.

## शाश्वत विकासासाठी माती व पाणी परीक्षण ही काळाची गरज : कुलगुरु महानवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

शाश्वत विकासासाठी माती व पाणी परीक्षण ही काळाची अत्यावश्यक गरज असल्याचे प्रतिपादन केले. नैसर्गिक साधनसंपत्तीचे योग्य नियोजन आणि वैज्ञानिक पद्धतीने परीक्षण केल्यास पर्यावरण संतुलन राखणे शक्य होईल, असे मत कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोशल महाविद्यालय भूगोल विभाग आणि सोलापूर जिल्हा भूगोल शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोशल महाविद्यालयात एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होत

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी होते. यानंतर मुंबई

### सोशल महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद




विद्यापीठ येथील डॉ. पी. पी.चौधरी यांनी बीज भाषण करताना माती व पाणी संवर्धनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास संवर्धनाच्या प्रक्रियेत निश्चितच सकारात्मक बदल घडू शकतो, असे मत व्यक्त केले. दुसऱ्या सत्रात गोएंका विद्यापीठ, दक्षिण कोरिया येथील प्राध्यापक डॉ. जी. एस. घोडके यांनी आपल्या दूरदृष्टी प्रणालीद्वारे उपस्थित भूगोल तज्ञांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांनी ड्रोन व्यवस्थापनाच्या माध्यमातून शेती, माती व पाणी परीक्षण अधिक अचूकपणे करता येते, असे स्पष्ट केले. समारोप सत्रात व्यासपीठावर भूगोल शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ.एस.सी. आडवीतोट उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी बिगवन महाविद्यालयाचे डॉ. तानाजी मगर होते. परिषदेचे प्रास्ताविक डॉ.सचिन राजगुरू यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दीपक नारायणकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. एम. डी. शेख यांनी करून दिली, तर आभार डॉ. वाहिद जमादार, तबसूम मोमिन यांनी मानले.

## वक्तृत्व स्पर्धेत तेजस पाटील प्रथम

### महर्षी दयानंद सरस्वती यांच्या जयंतिनिमित्त स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

स्व. श्रीकिसन चुनिलाल लाहोटी चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर आणि द. भै. फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षी दयानंद सरस्वती यांच्या जयंतिनिमित्ताने राज्यस्तरीय वक्तृत्वस्पर्धा संपन्न झाली.

अकराव्या वर्षातल्या या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचा तेजस दिनकर पाटील प्रथम क्रमांक, मुंबई विद्यापीठ, मुंबईचा अभय कृष्णकांत आळशी द्वितीय क्रमांक तर दयानंद विधी महाविद्यालय, सोलापूरची विद्यार्थिनी अमृता बचुटे हिला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. तर उत्तेजनार्थ म्हणून हिराचंद नेमचंद महाविद्यालय, सोलापूर येथील शिवप्रसंद दोरनाल आणि द. भै. फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूरची विद्यार्थिनी साक्षी सुराणा यांची निवड करण्यात



आली.

महर्षी दयानंद सरस्वती यांच्या जयंतीनिमित्ताने स्पर्धेसाठी महर्षी दयानंद सरस्वती : जीवन व कार्य, स्वामी विवेकनंदाच्या विचारांची समकालीन उपयुक्ताता, त्रिभाषासूत्र : अंमलाबाजवणीतील अडचणी, बदलत्या राजकारणाचे आणि सत्तेचे स्वरूप,खरेच आपण सुशिक्षित आहोत असे विविध विषय ठेवण्यात आले होते. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष म्हणून प्रा. विजयकुमार उबाळे, प्रमुख अतिथि म्हणून गोविंदप्रसाद लाहोटी आणि बसवराज कुलकर्णी, प्राचार्य बी. एच. दामजी, प्राचार्य एस. व्ही क्षीरसागर, प्राचार्य एस. व्ही. शिंदे, प्राचार्या एस. जे. गायकवाड उपस्थित होते. या स्पर्धेसाठी मुंबई, पुणे, लातूर, छ. संभाजीनगर, अहिल्यानगर आणि स्थानिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. असे प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी यांनी सांगितले आहे. स्पर्धेचे समन्वयक प्रा. आर. व्ही. शिंदे, प्रा. जी. डी.बिराजदार, यांनी काम पहिले. घनाते, डॉ. गडदे, डॉ. बिराजदार, सातालोलू, साखरे, हराळे व चलवादी आदींनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## महत्वाचे...



### मंद्रूपच्या मल्लिकार्जुन मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची गर्दी

**मंद्रुप, दि. १५ फेब्रुवारी-**
मंद्रूप येथील कपिलसिध्द मल्लिकार्जुन मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पहाटे चार वाजता मंदिराचे पुजारी करबसय्या स्वामी यांच्या हस्ते मल्लिकार्जुन देवाच्या मूर्तीचा विधीवत महाभिषेक करण्यात आला. पहाटे सहा वाजल्यापासून दर्शनासाठी भाविकांनी मंदिर परिसरात रांगा लावल्या. मंद्रूप व परिसरातील सुमारे पाच हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. या निमित्ताने कपिलसिध्द मल्लिकार्जुन युवक मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमोद नडविनंगळ यांनी रांगोळीच्या माध्यमातून १२ ज्योतिर्लिंगांचे आकर्षक चित्र साकारले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिवपुत्र जोडमोटे, सातप्पा जोडमोटे, रेवणसिध्द जोडमोटे, बाळासाहेब जोडमोटे, रमेश जोडमोटे, विजय जोडमोटे, कुमार जोडमोटे, महेश लिंबितोटे, नागेश माळी, शंतनु जोडमोटे, निलेश जोडमोटे, सुयेश स्वामी, शेखर स्वामी, विशाल ख्याडे, विरेश जोडमोटे आदींनी परिश्रम घेतले.



### निवृत्त मुख्याध्यापक व्यंकटेश कुलकर्णी यांची प्रतिबिंब प्रतिष्ठानला देणगी

**बार्शी, दि. १५ फेब्रुवारी-**
बार्शी तालुक्यातील उपळाई ठोंगे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे निवृत्त मुख्याध्यापक व्यंकटेश कुलकर्णी यांनी प्रतिबिंब प्रतिष्ठानला दहा हजार रुपयांची देणगी दिली. उच्च तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रेरणा व आश्रयाने पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअरसाठी स्थापन झालेल्या प्रतिबिंब प्रतिष्ठानला निवृत्त मुख्याध्यापक व्यंकटेश कुलकर्णी यांनी दहा हजार रुपयांचा निधी दिला. अ.भा. नाट्य परिषदेच्या बार्शी शाखेचे अध्यक्ष कवी सोमेश्वर घाणेगावकर, पत्रकार सचिन अपसिंगकर व अनिल जोशी यांच्या उपस्थितीत बार्शी येथे पार पडलेल्या छोटेखानी कार्यक्रमात व्यंकटेश कुलकर्णी यांनी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र व प्रतिबिंब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजा माने व प्रतिबिंब प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष दिपक नलावडे यांना देणगीचा धनादेश सुपूर्द केला.



### कोकणच्या मीठमुंब्री मठात अक्कलकोटच्या इंगळेंचा सत्कार

**अक्कलकोट, दि.१५ फेबुवारी-**
येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांचा कोकणातील देवगड तालुक्यातील मीठमुंब्री येथील श्री स्वामी समर्थ मठाच्यावतीने सत्कार करण्यात आला. श्री. इंगळे यांनी येथील श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मीठमुंब्री श्री स्वामी समर्थ मठाच्या वतीने त्यांच्यासह सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी यांचाही श्री स्वामी समर्थाचे प्रसाद, शाल देवून यथोचित सत्कार केला. यावेळी हडपीड श्री स्वामी समर्थ मठाचे अध्यक्ष प्रभाकर राणे, सचिव नंदकुमार पेडणेकर, कोकण कट्ट्याचे संस्थापक कुमार पितळे, प्रा.शिवशरण अचलेर, बाबा सुरवसे, अंकूश केत, ज्ञानेश्वर भोसले, विश्वनाथ देवरमनी, दर्शन घाटगे, सुनिल पवार, डॉ.हिरण्णा पाटील, मनोज इंगुले, सुरेश वाले, संदीप पंडीत, रमेश शिंदे, श्रीकांत मलवे, महेश मस्कले, तुषार मोरे, आदीत्य गवंडी, युवराज सोनटक्के, नंदकुमार कटारे, रामलिंगय्या स्वामी, समर्थ स्वामी, स्वप्निल गायकवाड, धनराज स्वामी, रजत गायकवाड, ओंकार महाडीक, भाई मांजरेकर, झुंजार पेडणेकर, स्वप्निल पिंगुळकर आदींसह भाविक उपस्थित होते.

### ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत निर्णय घेण्यात यावा : सदाशिव बेडगे

**सोलापूर, दि.१५ फेबुवारी-**



महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या वतीने ११ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात यशवंत स्टेडियम ते विधानभवन पर्यंत प्रलंबित मागण्या संदर्भात मोर्चा काढण्यात आला होता.त्यावेळेस राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना निवेदन देण्यात आले तेव्हा त्यांनी शिष्टमंडळाला आश्वासन दिले की आपल्या मागण्याचे निवेदन अगोदरच शासनास पोहोचले आहे आणि त्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चर्चा केली आहे अर्थसंकल्पीय अधिवेशनात ४०% अनुदान वाढ, दर्जा बदल व नवीन ग्रंथालय मान्यता याबाबतीत निर्णय घेण्यात येतील ४०% अनुदान वाढीस पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्वतः मान्यता देऊन अर्थ खात्याकडे पाठवली आहे आणि अर्थ खात्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडेच आहे त्यामुळे राज्यातील ११९५० ग्रंथालयात २१३३५ ग्रंथालय कर्मचारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयाकडे वाट पाहत बसले असल्याचे महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष बेडगे यांनी म्हटले आहे.

# रोटरी रनद्वारे पोलिओ मुक्तीसह कॅन्सर जनजागृतीचा संकल्प

### ८०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१५ फेब्रवारी-**




माळीनगर (ता. माळशिरस) रोटरी परिवार अकलूजच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी मॉडेल मल्टीपर्पज हायस्कूल ग्राउंड, माळीनगर येथे रोटरी रन आणि पोलिओ जनजागृती रॅली उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. यावेळी पोलिओ निर्मूलन आणि कॅन्सर जनजागृती या सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर जनप्रबोधन करण्यात आले.

या रॅलीमध्ये ८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्यदायी समाज - सुरक्षित भविष्य हा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत पोलिओ निर्मूलन आणि कॅन्सरविषयी जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. रेवती राणे यांनी कॅन्सर विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान देत प्रतिबंधात्मक उपाययोजना, लवकर निदानाचे महत्त्व आणि नियमित तपासणीची गरज याबाबत सविस्तर माहिती दिली. या उपक्रमात इंटरॅक्ट क्लब ऑफ गुलमोहर इंग्लिश मीडियम स्कूल, माळीनगर तसेच इंटरॅक्ट क्लब ऑफ मॉडेल मल्टीपर्पज हायस्कूल, माळीनगर यांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रॅली यशस्वी करण्यासाठी सक्रिय योगदान दिले. सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे सचिव अजय गिरमे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच गुलमोहर इंग्लिश मीडियम स्कूल व मॉडेल मल्टीपर्पज हायस्कूल, माळीनगर येथील मुख्याध्यापक कल्लाप्पा बिराजदार व शिक्षकवृंद यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल रोटरी परिवार अकलूजने मनःपूर्वक आभार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब अकलूजचे अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव, प्रकल्प प्रमुख संदीप लोणकर, संचालक मनीष गायकवाड, अभिषेक टेके तसेच सदस्य आशिष गांधी, बबनराव शेंडगे, नवनाथ नागणे, गोमटेश दोशी, स्वप्निल शहा, सी.ए. नितीन कुदळे, दीपक फडे, अजित वीर सर्व शिक्षक शिक्षिका,कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय बांदल केले.



# लव्ह जिहाद विरोधात महिलांचा एल्गार

### अक्कलकोटमध्ये तहसीलदार व पोलिसांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. १५ फेब्रुवारी**
अक्कलकोट येथे लव जिहादच्या विरोधात तालुक्यातील सर्व महिलांनी एकत्रित येत तहसीलदार व दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देऊन शासन निर्णयाच्या फोटो फ्रेमची प्रत भेट देण्यात आली.

हिंदू धर्मातील मुली व महिलांच्या संरक्षणासाठी केलेल्या आगळ्या वेगळ्या आंदोलनामुळे प्रशासन जागे झाले आहे. मैंदर्गीच्या नगराध्यक्षा अंजली बाजारमठ, नगरसेविका सुरेखा होळीकट्टी यांनी जबाबदारीने व प्रभावीपणे हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वामुळे सर्व नियोजन शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले. धर्मो रक्षति रक्षितः साठी आपली एकजूट, सजगता आणि सामाजिक बांधिलकी हीच आपल्या समाजाची खरी ताकद आहे. अशाच प्रकारे अन्यायाविरुद्ध आपण एकत्र येऊन आवाज उठवत राहवा म्हणून नगराध्यक्षा बाजारमठ, नगरसेविका होळीकट्टीसह सर्व जागृत नगरसेविका, धैर्याने सहभागी झालेल्या सर्व महिला भगिनी तसेच उत्स्फूर्त सहभाग नोंदवणाऱ्या युवती वर्गाचे सकल हिंदू समाज, मैंदर्गी यांच्या वतीने स्वागत करून आभार मानण्यात आले.

# बार्शी बसस्थानकात ज्येष्ठ महिला प्रवाशाच्या हातातील सोन्याची पाटली लंपास

### अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ फेब्रुवारी-**
बार्शी शहरातील बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका ज्येष्ठ महिलेच्या हातातील सोन्याची पाटली चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रतिभा सुखदेव जाधव (वय ६३, रा. आशीर्वाद पार्क, मोहम्मदवाडी, पुणे) या आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी बार्शीत आल्या होत्या. दि. १३ फेब्रुवारी रोजी दुपारी त्या बार्शी बस स्थानकातून आरसोली (ता. भूम, जि. धाराशिव) येथे जाण्यासाठी बार्शी-भूम-देवळाली मार्गे जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. बस टिळक चौक परिसरात आल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, त्यांच्या उजव्या हातातील अंदाजे २ तोळे वजनाची सोन्याची पाटली हातातून गायब झाली आहे. त्यांनी तात्काळ बस कंडक्टरला याबाबत माहिती दिली. बस थांबवून शोध घेण्यात आला, मात्र सोन्याची पाटली मिळून आली नाही. त्यानंतर खात्री झाली की, बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या हातातील सोन्याची पाटली चोरुन नेली.

चोरीस गेलेल्या सोन्याच्या पाटलीची अंदाजे किंमत सुमारे २ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे बस स्थानक परिसरातील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# वैराग विद्यामंदिरात वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात

### प्रशासनातील अधिकाऱ्यांनी केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१५ फेब्रुवारी-**



वैराग विद्यामंदिर हायस्कूल, कन्या प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. यावेळी विविध क्षेत्रांत नैपुण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय जीएसटी अधिकारी आनंद खरटमल, धाराशिवचे एपीआय सुदर्शन कासार, विक्रीकर निरीक्षक रोहन गरड आणि नूतन कृषी उपसंचालक प्राची श्याम गोवर्धन उपस्थित होते. वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर अध्यक्षपदी होते. यावेळी स्पर्धा परीक्षा, वक्तृत्व, हस्ताक्षर, चित्रकला आणि निबंध स्पर्धेतील विजेत्यांना तसेच शैक्षणिक गुणवत्ताधारकांना रोख रक्कम, स्मृतीचिन्ह आणि मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शिस्त, मेहनत आणि जिज्ञासा हा विद्यार्थी जीवनाचा खरा पाया आहे. अभ्यासाबरोबरच आपल्या आवडीचे छंद जोपासण्याचा सल्ला श्री.खरटमल यांनी दिला. यशस्वी होण्यासाठी कष्ट आणि सातत्य आवश्यक आहे. आयुष्यात ध्येय गाठण्यासाठी शिक्षकांबद्दल कृतज्ञता बाळगण्याचे आवाहन श्री.कासार (PI) यांनी केले. शालेय जीवनातील अभ्यासाचा मजबूत पाया आयुष्यात मोठे यश सहज देतो असे प्रतिपादन श्री.गरड यांनी केले. भविष्य घडवण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन प्रगतीचा आधार असल्याचे गोवर्धन यांनी सांगितले. कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा वैद्य यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे अध्यक्ष भूषण भूमकर यांनी संस्थेचा अहवाल सादर केला. दोन्ही प्रशालांच्या कामकाजाचा अहवाल सुप्रिया पांगळ यांनी वाचून दाखवला. पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक राम कोळी यांनी करून दिला. पारितोषिक पात्र विद्यार्थ्यांची नावे सचिन डांगे व दत्तात्रय गिड्डे यांनी घोषित केली. कविता कोरशेट्टी यांनी सूत्रसंचालन केले. सचिन रेड्डी यांनी आभार मानले. संस्थेचे सचिव निनाद भुमकर, चेअरमन मृणाल भूमकर, मुख्याध्यापक किशोर इंगळे, अशोक कदम, समद चौधरी, नगरसेवक नागनाथ वाघ, संचालिका प्रेरणा भुमकर, लीना भूमकर, प्राचार्य शाम गोवर्धन आणि समीक्षा भूमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विश्वनाथ बिदरकोते, हरीश उजनकर, बालाजी राऊत, सुनील खेंदाड, प्रवीण क्षीरसागर, देवेंद्र कर्णे आणि प्रताप माने यांनी परिश्रम घेतले.

# साई समर्थच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-**




सांगली येथील श्री साई समर्थ फाऊंडेशनच्या सोलापूर शाखेच्या वतीने देण्यात येणारे विविध स्तरावरील राज्य पुरस्कारांचे मान्यवरांना सन्मानपूर्वक वितरण झाले.

पोलीस उपअधिक्षक प्रताप पोमण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यासाठी नूतन उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, निवृत्त प्राध्यापक भीमाशंकर बिराजदार, निवृत्त प्राचार्य नरेश बदनोरे, निवृत्त प्राचार्य तथा जिल्हा शाखाध्यक्ष डॉ. अजित माणिकशेटे, जिल्हा परिषद सांगलीचे कार्यक्रमाधिकारी संतोष ढवळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते भागीरथी बिराजदार (अंगणवाडी सेविका), बबिता राठोड (अंगणवाडी सेविका), सिद्धारुढ काळे (समाजभूषण), निसार शेख (युवा उद्योजक तथा ग्राम सुधारक), जगदेवी माणकोजी (शिक्षिका), लक्ष्मण हंजगे (समाजभूषण तथा प्रगतशील शेतकरी), रविकुमार सोलापुरे (शिक्षण रत्न), मल्लिकार्जुन पाटील (शिक्षण भूषण), अरुण धुमाळ (जीवनगौरव), राजेंद्र पाटील (अभियंता), तेजश्री तळे (शिक्षिका), नसरीन माशाळकर (शिक्षिका), हेमलता होटकर (शिक्षिका) यांना मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक, स्वागत डॉ. अजित माणिकशेटे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष ढवळे यांनी केले.

### दुचाकी-ट्रॅक्टर अपघात; तरुण जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ फेब्रुवारी**
शेंद्री ते वारदवाडी रस्त्यावर ट्रॅक्टर आणि मोटारसायकल यांच्यात भीषण अपघात झाल्याची घटना घडली. भरधाव वेगात येणाऱ्या दोन ट्रॉली जोडलेल्या ट्रॅक्टरने मोटारसायकलला धडक दिल्याने गणेश दत्तात्रय शिंदे (वय २३, रा. शेंद्री) याचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला आहे. शिंदे हा शनिवारी सकाळीच्या सुमारास मोटारसायकलवरुन बार्शीकडे कामानिमित्त निघाला होता. त्याच दरम्यान शेंद्री ते वारदवाडी रोडवरील श्यामराव वैद्य यांच्या शेताजवळ समोरुन येणाऱ्या ट्रॅक्टरने दुचाकीला धडक दिली आणि गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला आहे.

# शेटफळ प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### शाळा विकासासाठी लोकांमधून ८५ हजार रूपयांची रक्कम जमा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१५ फेब्रुवारी-**



शेटफळ (ता. करमाळा) येथील जिल्हा परिषद शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमातून हुंडाबळी, स्त्रीभ्रूण हत्या या संदर्भात केलेल्या समाजजागृती बरोबरच सादर केलेल्या विविध गीतांना लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

येथील जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलावडे यांनी उद्‌घाटन केले. यावेळी केंद्रप्रमुख वंदना पांडव, मुख्याध्यापक शिवाजी शिंदे, बिजू रणसिंग, महेश दगडे यांचे बरोबरच गावातील सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी चित्रपट गीता बरोबरच गोंधळी गीत, पोतराज गीत, भीमगीत, लोकगीतांचे सादरीकरण करून प्रेक्षकांची दाद मिळवली. यावेळी विद्यार्थ्यांनी केलेल्या संभाजी महाराज बलिदान थरारक जिवंत देखावा कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरला. यावेळी शाळेच्या विकासासाठी लोकांमधून ८५ हजार रुपयांची बक्षीस रक्कम जमा झाली. सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक नंदकिशोर वलटे यांनी केले तर आभार गजेंद्र पोळ यांनी यांनी मांनले.



# वटवृक्ष मंदिर समितीतर्फे आमदार देशमुख यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ फेब्रुवारी-**
येथील श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या वटवृक्ष मंदिरात दर्शनाला आल्यानंतर माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख यांचा मंदीर समितीतर्फे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी आमदार देशमुख यांनी मंदीर समितीचे कौतुक केले. आमदार देशमुख यांच्याबरोबरच सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर देवस्थानचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू यांचाही सत्कार करण्यात आला.

आमदार विजयकुमार देशमुख यांनी श्री स्वामी समर्थांची भक्ती येथे येण्यास प्रेरित करीत असल्यामुळे येथे वेळ मिळेल तेव्हा येऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेण्याचा मानस व्यक्त केला. वटवृक्ष मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेल्या आदरतिथ्यामुळे समितीचे प्रमुख महेश इंगळे यांचे विशेष आभार मानले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश हिंडोळे, माजी नगराध्यक्ष तथा अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, प्रथमेश इंगळे, व्यंकटेश पुजारी, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, काशिनाथ इंडे आदीसह भाविक उपस्थित होते.

# खासगी क्लासेस व कॉलेजची मिलिभगत? तालुक्यात शिक्षण विभागाचे होतेय दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,दि. १५ फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून खाजगी कोचिंग क्लासेस व कॉलेज यांच्यातील मिलीभगतमुळे बारावी परिक्षार्थींना मदत केली जात असल्याचे चित्र आहे.

या मिलीभगतमुळे मोठी आर्थिक उलाढाल होत आहे. दहावीच्या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर अनेकजण खाजगी कोचिंग क्लासेसकडे जातात. त्यांच्याकडून बारावी विज्ञान, सीईटी, नीट व जेईई साठी तयारी करून घेण्याचे आश्वासन दिले जाते. पालक व विद्यार्थी यांना भुरळ घालतात. तभरमसाठ फी घेऊन प्रवेश घेतात. थेट त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश सेटिंग असणाऱ्या कॉलेजमध्ये देतात. तो विद्यार्थी दोन वर्षे कॉलेजमध्ये न जाता खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये असतो. प्रवेश कॉलेजला असला तरी दोन वर्षे बोगस हजेरी लावली जाते. यांचे दोन वर्षांत प्रॅक्टीकल कधीच घेतले जात नाही. विद्यार्थ्यांला ११ वीत उत्तीर्ण केले जाते. तर बारावीसाठी आम्ही लक्ष केंद्रित केले असल्याचे सांगत पालकांकडून लाखो रुपये फी घेतली जाते. त्यातील काही फी कॉलेजला दिली जाते. बारावीचा विद्यार्थी त्या कॉलेजला फक्त प्रॅक्टीकल परीक्षेला जातो. निकाल लावण्यासाठी ते शिक्षकांना मॅनेज करुन चांगले मार्क्स मिळवून देतात. त्यानंतर त्याच कॉलेजवर बारावीचे केंद्र असल्यास विद्यार्थ्यांना संपूर्ण मदत करीत चांगले गुण मिळवून दिले जातात. हा प्रकार शिक्षण क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून तालुक्यात जोरदार सुरु आहे .याची तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. यातुन खासगी कोचिंगवाले व कॉलेज प्रचंड आर्थिक माया गोळा करीत आहेत. या मिलीभगतमुळे ज्या कॉलेजला विद्यार्थी मिळत नाहीत. त्यांच्यासाठी क्लासेसची मदत होते. शासनाने यंदापासून परीक्षेत प्रचंड बदल घडवुन आणले आहेत. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही, ड्रोन, भरारी पथके पण तरीही यावर निर्बंध नाहीत .मग नवीन नियमावलीलासुध्दा असे कॉलेज जुमानत नाहीत. यावर शिक्षण विभाग काही तोडगा काढणार की नाही असा प्रश्न शिक्षणप्रेमीमधुन प्रशासनाला विचारला जात आहे.

> सोलापूर जिल्हा परिषद माध्यमिकचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप तसेच माळशिरस पंचायत समितीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मार्डी परिसरात महाशिवरात्री उत्साहात

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

मार्डी (ता. उत्तर सोलापूर) परिसरात महाशिवरात्री उत्साहात साजरी करण्यात आली. मार्डी, पानेगाव, भोगाव, नान्नज, वडाळा, कारंबा, गुळवंची, खेड आदी सर्व गावांमध्ये महाशिवरात्रीनिमित्त महादेवाच्या मंदिरात सकाळपासून भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. आज सकाळपासूनच विविध गावांमध्ये शिवललामृत यांचे प्रवचन सुरू असल्याचे दिसत होते.



## महत्त्वाचे



### वळसंग ते गुड्डापुर पदयात्रा उत्साहात; ८० जणांचा सहभाग

**वळसंग, दि.१५ फेब्रुवारी-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील धानम्मा देवी भक्त मंडळातर्फे सालाबादप्रमाणे यंदाही वळसंग ते गुड्डापुर पदयात्रा काढण्यात आली. यामध्ये ८० जणांनी सहभाग घेतला. ही पदयात्रा दि.१२ फेब्रुवारीला वळसंगच्या श्री बसवेश्वर मंदिरापासून सुरुवात झाली. तेरामैल, चडचण, उटगी येथील मुक्कामानंतर दि.१५ फेब्रुवारीला महाशिवरात्री दिवशी गुड्डापुर धानम्मा देवीचे पादगट्टी येथे या पदयात्रा सकाळी पोहोचली. सकाळी १० वाजलेपासून देवीच्या मंदिरापर्यंत ४ कि.मी.पालखी सोहळा आणि अनेक भक्त गणातून दंडवत घालत यात्रा संपन्न केली. यामुळे वाजत, गाजत देवीच्या जयघोषात चालत आलेल्या भक्तांचा थकवा निघून गेला. सलग ४ दिवसाची ही पदयात्रा कोणतीही अडचण न येता यशस्वी झाली.सहभागी ७० ते ८० भक्तांची जेवण, आरोग्य सर्व काही व्यवस्था झाल्याची माहिती पदाधिकारी श्रीशैल गाडवे यांनी दिली. विश्वनाथ मोटगी, विनोद सुरपुरे, शरणबसू सुरपुरे, विनोद कुर्ले, शेंडगे मामा, मल्लिकार्जुन खेड, बसय्या स्वामी, ओंकार स्वामी, राजकुमार मणुरे, रवी गायकवाड व बहुसंख्येने महिला मंडळ उपस्थित होते.

### मंडल कृषी अधिकारी मधुकर मारकड यांना तिफन कृषी गौरव पुरस्कार जाहीर

**जेऊर दि. १५ फेब्रुवारी-**



करमाळा तालुक्यातील जेऊरचे मंडल कृषी अधिकारी मधुकर मारकड यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल तिफन कृषी गौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. अहिल्यानगर येथील तिफन फाउंडेशन च्या वतीने दरवर्षी महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी तिफन कृषी गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते यावर्षीचा हा पुरस्कार जेऊर मंडळचे मंडल कृषी अधिकारी मधुकर मारकड यांना जाहीर झाला असून अहिल्यानगर येथे लवकरच एका समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे मारकड यांनी कृषी विभागातील सेवाकाळात शेतकऱ्यांना उत्कृष्ट सेवा देऊन शाश्वत शेती नविन तंत्रज्ञानाचा प्रसार व शेतकऱ्यांशी सुसंवाद साधत त्यांच्या जीवनात बदल घडवण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे कृषी विस्तार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत जेऊर मंडल कृषी अधिकारी कार्यालयाला आयएसओ मानांकन मिळवून दिले आहे. शासनाच्या विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांना व्हावा यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत या पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली आहे.

### पंचायत समिती सदस्य आनंद शेंडगे यांचा पत्रकारांच्या वतीने सन्मान

**माळशिरस, दि.१५ फेब्रुवारी-**

पत्रकार संघाचे सदस्य पत्रकार आनंद शेंडगे हे पंचायत समिती कण्हेर गणातून निवडून आल्याबद्दल त्यांचा तालुका पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष कृष्णा लावंड,किरण जाधव, अनंत दोशी, रामभाऊ मगर, अशोक सिद्वाडकर, लक्ष्मण वाघमोडे, बाळासाहेब कर्चे, नागेश होनराव आदी उपस्थित होते. आनंद शेंडगे यांनी रेडे ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून काम केले आहे. तसेच पत्रकार संघाच्या प्रत्येत कार्यक्रमांत त्यांचा मोलाचा वाटा होता. नुकत्याच झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत ते कण्हेर पंचायत समिती गणातून विजयी झाले बद्दल त्यांचा सन्मान करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आल्या पत्रकार संघाच्या वतीने आनंद शेंडगे यांचा सत्कार करण्यात आला.

### जखमी अवस्थेत आढळला कुदळ्या पक्षी; उपचारासाठी वनविभागाच्या केंद्रात केले दाखल

**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

अवंती नगरमध्ये ओढ्याजवळ एक पक्षी जखमी अवस्थेत दि. १४ फेब्रुवारी रोजी सोलापूर वन विभागाचे रेस्क्यूअर प्रवीण जेऊरे यांना असल्याची माहिती मिळाली असता ुलरी चे अजित चौहान यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. वसंत विहार जवळील



नाल्यात Black-Headed Ibis (काळ्या डोक्याचा शराटी, कुदळ्या) या प्रजातीचा पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला, त्याच्या शारीरिक हालचाली मंदावल्या होत्या. परंतु नाल्यात उतरण्यास अडचण येत असल्याने त्यांनी वन विभागाच्या वनरक्षक अनिता शिंदे यांना फोन करून या पक्ष्याला रेस्क्यू करण्याविषयी मदत मागितली. वन विभागाचे प्रवीण जेऊरे आणि मुन्ना निरवणे यांनी घटनास्थळी धाव घेत निरवणे यांनी ओढ्यात उतरून त्या जखमी पक्ष्याला रेस्क्यू केले व त्याला पुढील उपचारासाठी वनविभागाच्या टीईटी सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. कुदळ्या हा पक्षी साधारणपणे पाणथळ व गवताळ भागात आढळणारा पक्षी असून ढालकीटक, मासे, बेडूक, खेकडे, सरडे हे त्याचे खाद्य आहे. हे पक्षी पाण्यात उभ्या असलेल्या किंवा जवळच्या झाडांवर काटक्या वापरून घरटे बांधतात.







# अकलूज येथे महाशिवरात्री उत्सव उत्साहात

## शंकरनगरच्या मंदिरात मोहिते-पाटील परिवाराकडून रूद्राभिषेक

**अकलूज, दि.१५ फेब्रुवारी-**

अकलूज, शंकरनगर व परिसरात महाशिवरात्री मोठ्या उत्साहात व विविध धार्मिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. सकाळपासूनच अकलूज व परिसरातील महादेव मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी एकच गर्दी केली होती. शंकरनगर येथील शिवपार्वती मंदिरात विश्वतेजसिंह मोहिते-पाटील व त्यांच्या पत्नी शिवांशिका मोहिते-पाटील यांच्या हस्ते मूर्तीस रुद्राभिषेक व महापूजा करण्यात आली. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रसाद कुलकर्णी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी पौरोहित्य केले.

मंदिरात यात्रा समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्यासह माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, व परिवारातील सदस्यांसह असंख्य भाविकांनी शिवपार्वतीचे दर्शन घेतले. पहाटेपासून दिवसभर व रात्री उशिरापर्यंत मंदिरामध्ये दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दर्शनाची अतिशय उत्तम सोय यात्रा समितीकडून करण्यात आली होती. त्यामुळे दहा ते पंधरा मिनिटांत दर्शन सोयीस्कर होत होते. शिवपार्वती मंदिरात हरहर महादेवा पार्वती शंकर सदाशिवा हा शिवनाम जप ही सुरू होता. महर्षी जिमखाना व स्पोर्टस् असोसिएशन यांच्या वतीने भाविकांना खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले. आनंदनगर येथील आनंदी गणेश मंदिराजवळील स्वयं सिद्ध महादेव मंदिरामध्ये अभिषेक व पूजा करण्यात आली. अकलूज येथील पुरातन वीरशैव लिंगायत समाजाच्या विजय चौकातील महादेव मंदिरात ही सकाळची चढावाची महापूजा जालिंदर लिगाडे यांच्या हस्ते झाली. सायंकाळची मानाची पूजा सुनील जठार यांच्या हस्ते करण्यात आली. येथेही समाजाच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले. पुरातन असणाऱ्या विठ्ठल मंदिर परिसरातील बुरुजा महादेव मंदिरात ही सकाळपासून अभिषेकासाठी महिलांनी एकच गर्दी केली होती. तर रामायण चौकातील मल्लिकार्जुन महादेव मंदिरात सकाळची चढावाची महापूजा सतीश कोरे यांच्या हस्ते तर सायंकाळची महापूजा नागेश निगडे यांची झाली. नीरा नदी काठावरील घाटाच्या महादेव मंदिरात कुंभार समाजाच्या वतीने प्रा.रोहित कुंभार, सुभाष कुंभार, सुधाकर कुंभार, संदिप कुंभार व कुंभार समाजाच्या वतीने महापूजा, आरती व दीप प्रजनन करण्यात आले. शंकर नगर येथील महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती व चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने दिनांक ११ ते १६ फेब्रुवारी या कालावधीमध्ये कृषी व औद्योगिक प्रदर्शन, पीक स्पर्धा व दुग्ध स्पर्धा तसेच जनावरांचा बाजार व जंगी निकाली कुस्त्यांचा फड आयोजित केला आहे. यात्रेमधील पीक स्पर्धा, दूध स्पर्धा, उत्कृष्ट जनावरांच्या स्पर्धा यांचे बक्षीस समारंभ मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले सायंकाळी मंगला बनसोडे यांचा तमाशाचा खेळ झाला.



# चिंचोळी(मैं) सोसायटीच्या चेअरमनपदी लक्ष्मीपुत्र आंदेवाडी

**आमदार कल्याणशेट्टी गटाचे वर्चस्व; ५० वर्षात प्रथमच भाजपाचा झेंडा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, ता. १५ फेब्रुवारी -**

चिंचोळी (मै) (ता.अक्कलकोट) येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी लक्ष्मीपुत्र आंदेवाडी यांची निवड झाली आहे. त्यामुळे या सोसायटीवर ५० वर्षात प्रथमच भाजपाचा झेंडा रोवला गेला आहे.

सदर सोसायटी गेल्या ५० वर्षापासून माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांच्या ताब्यात होती. ती आता या निवडीने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या गटाकडे आली आहे. अक्कलकोट येथील सहाय्यक उपनिबंधक कार्यालयात या निवडी संदर्भात विशेष सभा बोलवण्यात आली होती. एकूण ११ संचालक या सोसायटीत आहेत. चेअरमनपदाच्या निवडणुकीत लक्ष्मीपुत्र हणमंत आंदेवाडी यांना सहा मते पडली तर त्यांच्या विरोधात उभे राहिलेले सिद्धण्णा आंदेवाडी यांना पाच मते पडली. त्यामुळे एका मताने लक्ष्मीपुत्र यांचा विजय होऊन चेअरमन पदाची माळ त्यांच्या गळ्यात पडली. यापूर्वीचे चेअरमन श्रीमंत आंदेवाडी हे मयत झाल्याने या निवडीची प्रक्रिया राबवण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून छाया नाटकर यांनी तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून सिद्धेश्वर कुंभार यांनी काम पाहिले. चेअरमन निवडीनंतर अक्कलकोटचे उपनगराध्यक्ष ऋतुराज (बंटी ) राठोड, नागराज कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी चिंचोळी (मै) विकास सोसायटीचे सचिव प्रकाश पाटील यांच्यासह महेश बिराजदार, कल्याणी पाटील, शशिकांत बिराजदार, अल्लाउद्दीन चिद्री, गोपाळ आंदेवाडी, सदानंद जमादार, राजशेखर आंदेवाडी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. निवडीवेळी लक्ष्मीपुत्र आंदेवाडी, पिरण्णा बिराजदार, शामराव आंदेवाडी, श्रीशैल आंदेवाडी, विजयकुमार आंदेवाडी, पार्वती आंदेवाडी ही सहा मते लक्ष्मीपुत्र आंदेवाडी यांच्या बाजूने झाली तर मोनप्पा सुतार, बसण्णा बनसोडे, शंकर राठोड, मंगला बिराजदार, सिद्धण्णा आंदेवाडी ही पाच मते सिद्धण्णा आंदेवाडी यांच्या बाजूने पडली. लक्ष्मीपुत्र आंदेवाडी यांची एका मताने निवड झाली. निवडीनंतर उपस्थित मान्यवरांनीअभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

ही सोसायटी भाजपचे आमदार कल्याणशेट्टी यांच्या गटाकडे आलेली आहे आणि स्थापनेपासून प्रथमच म्हेत्रे यांच्या ताब्यातून ही सोसायटी गेली आहे.

# महाशिवरात्रीला गौडगाव बु. येथे भक्तिसागर

**श्री जागृत हनुमान मंदिरात महारुद्र अभिषेकासह धार्मिक सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१५ फेब्रुवारी-**



महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त येथील गौडगाव बु. (ता. अक्कलकोट) येथील श्री जागृत हनुमान मंदिर परिसरात रविवारी पहाटेपासूनच भक्तिमय वातावरण होते. मंदिरात पहाटे मुख्य पुजारी ज्ञानेश्वर फुलारी यांच्या हस्ते भगवान शंकरांची विधिवत पूजा संपन्न झाली. मंत्रोच्चारांच्या निनादात आणि घंटानादाच्या मंगल ध्वनीत मंदिर परिसर शिवमय झाला होता.

महाशिवरात्री निमित्त महारुद्र अभिषेक, शिवस्तोत्र पठण, लिंगाष्टकम, होम-हवन आदी विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पडले. रुद्राच्या मंत्रांनी वातावरण भारावून गेले असून उपस्थित भाविकांनी 'हर हर महादेव'च्या जयघोषात सहभागी होत आध्यात्मिक आनंदाची अनुभूती घेतली. अभिषेकासाठी दूध, दही, बेलपत्र, फुले अर्पण करून भाविकांनी मनोभावे पूजा अर्चा केली. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. दिवसभर मंदिर दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले होते. सोलापूर, कलबुर्गी, इंडी, अक्कलकोट, अफझलपूर, मणूर, मशाळ, आळंद, सिंदगी आदी विविध भागांतून हजारो भाविकांनी उपस्थिती लावत दर्शनाचा लाभ घेतला. मंदिर परिसरात शिस्तबद्ध रांगा



लावण्यात आल्या होत्या. भाविकांना सुलभ व सुरळीत दर्शन मिळावे यासाठी मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापूरे, विश्वस्त प्रकाश मेंथे, सिद्राम वाघमोडे, शांतय्या स्वामी, प्रकाश सनकळ, परमेश्वर सुतार, मल्लिनाथ म्हेत्रे, श्रीमंत म्हेत्रे, श्रीमंत सवाळतोट आदींनी विशेष परिश्रम घेतले. स्वयंसेवकांनीही दर्शन रांग नियोजन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व सुरक्षा याकडे लक्ष दिले. महाशिवरात्रीच्या निमित्ताने दिवसभर भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिकतेचा संगम अनुभवायला मिळाला. मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

# कडबा अन् ज्वारीला यंदा मिळणार दमदार मार्केट

- रब्बी हंगामातील पिकांची सुगी सुरू
- गोफणगुंडा अन् पहाटेची भलकरी गायब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-**

रब्बी हंगामातील ज्वारीची काढणी आणि मळणीची कामे वेगाने सुरू झाली असून, यामुळेच सोलापूरसह इतर बाजार समित्यांमध्ये ज्वारी, हरभरा आणि गहू पिकाची आवक हळूहळू सुरू झाली असल्याची माहिती काही आडत व्यापाऱ्यांनी दिली. दरम्यान, यंदा ज्वारी पीक कमी असल्याने ज्वारीचा भाव ३ हजार ते ५००० पर्यंत जाण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. इतकेच नाहीतर कडब्याचेही दर यंदा गगणाला भिडणार आहेत. दरम्यान, बळीराजाचा गोफणगुंडा अन् पहाटेची भलकरी मात्र गायबच झाल्याचे दिसून येत आहे.

गतवर्षी सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये अतिवृष्टी झाल्याने आणि महापुराचा फटका बसल्याने रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी जमिनीचा वापसा लवकर झाला नव्हता. यामुळे ज्यांच्या जमिनीचा वापसा लवकर झाला नाही अशा अनेक शेतकऱ्यांनी ज्वारीचा नाद सोडून गहू आणि हरभरा पिकाला मान्यता दिली होती; तर काही शेतकऱ्यांनी उसावर भर दिला. यामुळे यंदा ज्वारीचे क्षेत्र कमी होवून कडबा आणि ज्वारीला



चांगला भाव येण्याचे संकेत मिळत आहेत. सध्या सोलापूर बाजार समितीमध्ये ज्वारीचे दर अडीच ते तीन हजार इतके आहेत. दरम्यान, नवीन ज्वारी आल्यानंतर ही ज्वारी कोल्हापूर, पुणे, मुंबई आदी विविध शहरात आणि काही वेळा तर विदेशातही जाते. यामुळे याचे दर वाढण्याची शक्यता आहे. गहू आणि हरभरा पिकालाही चांगले मार्केट सध्या चालू आहे.

यंदा पिके जोमात असल्याने कडबाही जोरात आला आहे. मुबलक पाणीसाठा असल्याने यंदा ज्वारीला उतारही चांगला पडणार आहे. काही भागांत रोगराईमुळे ज्वारी काळवंडली असून, वाढलेल्या मजुरीचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सध्या मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्याच्या काही भागात ज्वारी पिकाची काढणी सुरू झाली आहे. ज्वारी काढणी, पेंडी बांधणे याचीही मजुरी वाढली असल्याचे सांगण्यात येते. सध्या हळूहळू ज्वारीची आवक सुरू झाली असून, मालाच्या गुणवत्तेनुसार दरात बदल दिसून येत आहेत. काढणीसाठी मजुरांची टंचाई असल्याने मजुरीचे दर दरवर्षी वाढतात मात्र पिकांचे दर वाढत नसल्याने शेतकरी बांधवांतून नाराजी दिसून येत आहे. आजही काही ठिकाणी मजुरांना पैशांऐवजी पिकातील हिस्सा (पायली) देण्याला पसंती दिली जाते.

धुई, चिकटा, करपा आणि बुरशीजन्य रोगांमुळे काही ठिकाणी ज्वारी काळवंडल्याचे सांगण्यात येते मात्र आभाळ मध्यंतरी फिरल्याने कडबा लवकरच काढणीला आल्याचेही सांगण्यात येते. काही भागात पीक चांगले आल्याने जनावरांसाठी मुबलक प्रमाणात कडबा उपलब्ध होणार आहे. एकंदरीत, काढणीनंतर मळणी यंत्रांच्या साहाय्याने मळणीची कामे वेग घेत असल्याने नवीन ज्वारी लवकरच बाजारात येणार असल्याचे दिसून येते.

### ज्वारी पेरणी कमी झाल्याने यंदा भाव कडाडणार

यावर्षी मराठवाड्यासह जिल्ह्यात ज्वारीची पेरणी कमी झाली आहे. यामुळे यावर्षी ज्वारीचे दर कडाडणार आहेत. मागणी जसजसी वाढत जाईल, तसतसा ज्वारीचा भाव वाढत जाणार आहे. यंदा गहू पीक वाढल्याने गव्हाचा भाव स्थिर राहणार आहे म्हणजेच २ ते ३ हजाराच्या आतच भाव गहू पिकाला मिळेल. ज्वारी पिकास मात्र ३ हजार ते ५ हजारापर्यंत विक्रमी भाव मिळण्याची शक्यता आहे. हरभराही सध्या ४८०० ते ५००० इतका आहे मात्र आवक वाढल्यास याचा भाव कमी होण्याचे संकेत आहेत. कारण यंदा हरभरा आणि गहू पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणात झाल्याने उत्पन्नही मोठे निघणार आहे.

**- गणेश शिंदे, आडत व्यापारी, कुडबास, सोलापूर**